१८२२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चारित्र
सं. क्र. ४३०
REFBK-0002082

# नव-रत्नांचा हार.

ग्रंथालय ... क्रं. 208

गुंफणार

**लक्ष्मण बलवंत भोपटकर,**

एम्. ए., एल्एल्. बी.

संपादक—लोकसंग्रह.

प्रथमावृत्ति.

REFBK-0002082

श्रीसरस्वती मंडळ, पुणें शहर.

किंमत एक रुपाया.

पुणें, पेठ शनवार, घ. नं. ५७० येथें **अनंत सखाराम गोखले**
यांनीं आपल्या '**विजय**' छापखान्यांत छापिलें, व
**चिंतामण गणेश कोल्हटकर**, अध्यक्ष, **श्रीसरस्वती मण्डळ**,
**पुणें**, यांनीं ५१२ शनवार, पुणें, येथें प्रसिद्ध केलें.

[ या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें स्वतांकडे ठेविले आहेत. ]



लक्ष्मण बळवंत भोपटकर.

# फक्त दोन शब्द.

या पुस्तकांत मराठ्यांच्या इतिहासांतील नऊ उत्कृष्ट प्रसंगांचें वर्णन दिलेलें आहे. या सर्व गोष्टी पूर्वी "भाला" पत्रांत प्रसिद्ध झालेल्या होत्या. त्या एकत्र करून प्रसिद्ध करण्याविषयीं अनेक मित्रांनीं सूचना केल्यावरून पुस्तकरूपानें मी महाराष्ट्रीय जनतेस त्या सादर करीत आहे. हा "नवरत्नांचा हार" तिला पसंत पडल्यास, आणखी असलेच दोन तीन हार तिला अर्पण करण्याचा माझा विचार आहे.

ता. १ जून १९१२.
पुणें, पेठ सदाशिव,
बलवंताश्रम.

लक्ष्मण बळवंत भोपटकर,
ग्रंथकर्ता.

# अर्पण-पत्रिका.

मराठ्यांच्या इतिहासाबद्दल

व

तत्त्वज्ञानाबद्दल

अभिमान बाळगणाऱ्या

सर्व महाराष्ट्रीयांना

हा

"हार"

अत्यंत प्रेमानें व आदरानें

अर्पण केला आहे.

ल. ब. भोपटकर.

# अनुक्रमणिका.


| रत्न. | नांव. | प्रसंग. | पानें. |
|---|---|---|---|
| १ लें— | श्रीशिवाजी महाराज. | (अफजुलखानाशीं भेट) | १–२० |
| २ रें— | बाजी प्रभु. | (पावनाखिंड) | २१–३५ |
| ३ रें— | मुरार बाजी. | (पुरंदरचा वेढा) | ३६–४६ |
| ४ थें— | भद्र नाईक. | (बेदनूरचा वेढा) | ४७–५६ |
| ५ वें— | सूर्याजी मालुसरे व सूर्याजी पिसाळ. | (सिंहगडचा वेढा) | ५७–६८ |
| ६ वें— | प्रतापराव गुजर. | (जेसरीचा वेढा) | ६९–८२ |
| ७ वें— | येसाजी कंक. | (गोवळकोंडा येथील हत्तीशीं झुंज) | ८३–९४ |
| ८ वें— | धनाजी व हंबीरराव. | (सावनूरची लढाई) | ९५–१०६ |
| ९ वें— | खंडेराव गुजर. | (सातारचा वेढा) | १०७–१२० |

# नव-रत्नांचा हार.

## रत्न पहिलें.

## श्री शिवाजी महाराज.

व्रजन्ति ते मूढधियः पराभवम् ।
भवन्ति मायाविषु ये न मायिनः ॥

( मायावी इसमांबरोबर जे मायावी होत नाहींत ते नाश पावतात ).

यस्मिन् यथा वर्तते यो मनुष्यः ।
तस्मिंस्तथा वर्तितव्यं स धर्मः ।
मायाचारी मायया बाधितव्यः ।
साध्वाचारः साधुना प्रत्युपेयः ॥

( आपल्याशीं जो जसें वर्तन ठेवितो तसें त्याच्याशीं वर्तन ठेवणें ही धर्मनीति होय; मायावी पुरुषांशीं मायावीपणानें आणि साधुपुरुषांशीं साधुपणानेंच व्यवहार केला पाहिजे ).

स्वतंत्रता व परतंत्रता या दोन शब्दांत किती तरी तफावत व केवढें तरी जमीन अस्मानचें अंतर ? स्वतंत्रता व परतंत्रता या दोन शब्दांनीं उद्बोधित केलेल्या कल्पना किती तरी भिन्न व परस्परविरोधी आहेत बरें ! स्वतंत्रता हा चार अक्षरी शब्द उच्चारल्याबरोबर मनांत नाना प्रकारचे सुखमय तरंग उसळतात, अंतःकरण आनंदाच्या लहरींनीं उचंबळून जातें, अंतश्चक्षूंना दिव्य व तेजोमय देखावे दृष्टीस पडूं लागतात, व विश्वांतील सर्व वस्तू शाश्वत व अनुपमेय सुख, आनंद, उत्साह, उन्नति इत्यादींनीं

ओतप्रोत भरून गेल्या आहेत कीं काय, असा भास होतो. पण परतंत्रता हा शब्द तोंडावाटें निघाल्याबरोबर लागलीच अंतःसृष्टींत केवढी तरी प्रचंड घडामोड होऊन जाते? परतंत्रतेची कल्पना मनांत आल्यावर शरीराचीं सर्व अवयवें शिथिल पडतात, इंद्रियें आपापले व्यापार बंद करतात, अंतःकरणांत दुःख, निराशा व नाउमेद यांचें तुफान माजतें, व सृष्टींतील प्रत्येक पदार्थांत स्तब्धता, निरुत्साह, अपकर्ष व नाश दृग्गोचर होऊं लागत त. स्वतंत्रतेच्या व परतंत्रतेच्या निव्वळ कल्पनांचे जर इतके भिन्नभिन्न परिणाम. तर त्या दोन प्रत्यक्ष स्थितींत व त्यांच्या परिणामांत कितीतरी वैचित्र्य व परस्परविरोधित्व असलें पाहिजे? खरोखर परमेश्वरानें सृष्टींतील सर्व पदार्थांतील भिन्नत्व व विरोधित्व एकवटून या दोन स्थितींत सांठवून ठेविलेलें आहे. स्वतंत्रता जर परम सुखाचें स्थान, तर परतंत्रता दारुण दुःखाचें निधान होय; स्वतंत्रता जर उन्नतीची जननी, तर परतंत्रता अवनतीची माता होय; व स्वतंत्रता जर सृष्टीचा जीव, तर परतंत्रता सृष्टीचा मृत्यु होय! स्वतंत्रता स्वार्थाच्या पाशांत गुरफटलेल्या लोकांना स्वार्थत्यागी किंबहुना स्वासुत्यागीही बनविते; ती भीतीनें थरारणाऱ्या अंतःकरणांना दगडाहूनही कठीण करते; ती निस्तेज झालेल्या डोळ्यांत अप्रतिम तेज चमकावितें; ती निकस व ढिल्या पडलेल्या मनगटांत विलक्षण जोर व कणखरपणा उत्पन्न करते; पारतंत्र्याच्या हिममय थंडानें गारठलेल्या शरीरांत देशभक्तीची ज्योत पेटवून ती त्याला चपल व कर्तव्यक्षम करते; ती देशप्रीतीच्या वारुणीनें झिंगलेले बाजी व स्वातंत्र्यवेडानें बहकलेले गाजी उत्पन्न करून त्यांच्या करवीं देशशत्रूंचा व अंतःस्थ रिपूंचा संहार करते, आणि राष्ट्राला उन्नतीच्या अत्युच्च शिखरावर नेऊन बसविते. पण परतंत्रता? नको! तिची कल्पनासुद्धां मनास शिवावयास नको!

परतंत्रता दुसरें तें काय करणार ? थोडक्यांत म्हटलें म्हणजे ती एखाद्या राष्ट्राला प्रतिहिंदुस्थान करून सोडते, व तेथील लोकांना हिंदी लोकांसारखे बनविते !

परतंत्रतेचे इतके भयंकर व अनर्थकारक परिणाम होत असल्या-मुळेंच, परतंत्रतेच्या रौरव नरकांत सडत असलेल्या लोकांनीं तिच्या कचाटींतून सुटून जाण्यासाठीं मृत्यूला देखील आनंदानें व उल्हासानें कवटाळण्यास सिद्ध व्हावें, किंवा स्वातंत्र्यसंपाद-नार्थ स्वतःच्या जीवितावरही पाणी सोडण्यास उद्युक्त व्हावें, यांत नवल तें काय ? पारतंत्र्याचे पाश झुगारून देऊन स्वतःस स्वातं-त्र्याची जोड करून घेण्याकरितां निरनिराळ्या लोकांनीं केलेल्या दीर्घ, घनघोर व तुंबळ प्रयत्नांचे दाखले जगाच्या इतिहासांत अनेक आहेत; व सतराव्या शतकांत मराठ्यांनीं शिवाजीमहारा-राजांच्या अग्रेसरत्वाखालीं केलेला प्रयत्न हा त्यांपैकींच एक होय. इतिहासांतील रम्य स्थलें तीं हींच होत; ह्या प्रयत्नांचा इतिहास तोच खरा इतिहास होय; सद्गुणांचे व नीतितत्वांचे धडे शिक-विणारे खरे शिक्षक हेच आहेत; व अंगांत अपूर्व वीरश्री स्फुर-विणारे हेच वास्तविक प्रसंग समजले पाहिजेत. तेव्हां प्रत्येकानें या प्रयत्नांच्या इतिहासाचें—या स्वातंत्र्याबद्दल केलेल्या युद्धाच्या इतिहासाचें—अध्ययन अवश्यमेव केलें पाहिजे. सर्व इतिहासाचें जरी नाहीं, तरी निदान सतराव्या व आठराव्या शतकांतील मराठ्यांच्या इतिहासाचें अध्ययन करणें हें प्रत्येक अस्सल महा-राष्ट्रीयाचें आद्य व परम पवित्र कर्तव्य आहे. कारण, दुसऱ्या कोणत्याही इतिहासांत न सांपडणारा " आपलेपणा " या इति-हासांत संपूर्णपणें ओथंबलेला आहे. मराठ्यांच्या इतिहासासारखा व विशेषतः सतराव्या व अठराव्या शतकांतील मराठ्यांच्या इतिहासासारखा रमणीय, बोधप्रद, नीतीप्रचुर व वीर्योत्पादक

इतिहास दुसरा कोणता आहे ? या इतिहासांत असे अनेक प्रसंग नमूद केलेले आहेत कीं, ते वाचले असतां आपल्या शूर व स्वातंत्र्यशाली पूर्वजांच्या अचाट व अमानुष कृतीबद्दल अचंबा व अभिमान वाटतो, आणि त्याबरोबरच अवघ्या दोन अडीचशें वर्षांच्या अवधींत त्यांच्या वंशजांची उडालेली दैना व दुर्दशा पाहून काळीज दुःखातिशयानें करपून जातें. अशा प्रसंगांपैकींच एका अत्युत्कृष्ट, आणीबाणीच्या व मनाला चटका लावणाऱ्या प्रसंगाचें वर्णन आम्ही देत आहोंत.

आकाश निरभ्र आहे, प्रातःकाळच्या मंद व शीतळ वाऱ्याची झुळुक मन व शरीर रिझवित आहे, क्षितिजावर आरूढ झालेल्या बालरवीचीं कोमल व रक्तवर्ण किरणें दाही दिशा रंगवीत आहेत, समुद्राचा पृष्ठभाग लहान लहान लाटांनीं विकंपित झाला आहे, त्या लाटांशीं खेळत खेळत एक लहानसें जहाज वाऱ्याच्या झुळके-बरोबर तो जलमय प्रदेश आक्रमित चाललें आहे, व आपण सुरक्षित रीतीनें पैलतीरास जाऊन पोहोंचूं अशी त्या जहाजावरील लोकांना आशा—नव्हे खात्री वाटत आहे, तोंच एकदम एक प्रचंड मेघावडंबर उसळून आकाशमंडळ कृष्णवर्ण मेघांनी काळें-ठिक्कर पडून जावें, त्या बालरवीचा लोप होऊन निबिड अंध-कारानें दशदिशा व्याप्त व्हाव्यात, वाऱ्याच्या सोसाट्यानें तो अफाट दर्या खवळून जाऊन पर्वतप्राय लाटा अस्मानाशीं भिड-ण्याकरितां वर उसळत असाव्यात, व त्या गगनचुंबी लाटांच्या थपडा खात खात तें जहाज झंझावाताच्या माऱ्यानें भिंगरीसारखें इतस्ततः भिरकटत असावें, म्हणजे त्या जहाजावरील लोकांची जी करुणास्पद व संकटपरिप्लुत स्थिति होईल, त्याप्रमाणेंच १६५९ सालीं मराठ्यांची स्थिति झाली होती. १६४६ त शिवाजी महाराजांनीं तोरणा किल्ल्यावर स्वातंत्र्याचा रोपा लावून

बारा वर्षे लोटलीं होतीं. अनेक जवानमर्द मराठे वीरांनीं त्याच्या मुळांशीं आपल्या शुद्ध व सतेज रक्ताचें सिंचन केल्यामुळें तो पल्लवयुक्त झाला होता. चंद्रराव मोरे, बाजी घोरपडे इत्यादींची कीड नाहींशी केल्यामुळें तो सोसाट्यानें वाढत होता; व लवकरच त्याच्या रम्य व शीतल छायेखालीं सुखानें कालक्रमणा करण्याची सुसंधि मराठ्यांना लाधेल, अशी प्रत्येकाला आशा वाटूं लागली होती. पण इतक्यांत तो जोरानें फोंफावणारा स्वातंत्र्याचा रोपा खच्ची करण्याची इच्छा मराठ्यांच्या शत्रूंच्या अंतःकरणांत उद्भवली. तो रोपा अशाच जोमानें व झपाट्यानें वाढत गेल्यास तो विजापुरी राज्याची इमारत पार जमिनदोस्त केल्याशिवाय राहणार नाहीं, अशी विजापुरी दरबारला मोठी काळजी लागून राहिली होती. बेगमसाहेबांची तर पांचावर धारण बसली. त्यांच्या अंतःकरणानें सपशेल ठाव सोडला होता. त्यांना अन्न गोड लागेना व क्षणभरही झोंप येईनाशी झाली. शरीरयष्टि कृश झाली; व अंगावरची कांति नष्ट होऊन तें निस्तेज व पांढरें फिट्टक दिसूं लागलें. आपल्या रोगाचें मूळ नाहींसें करण्यास आपल्या पदरचा एखादा तरी सरदार तयार आहे कीं काय हें पहाण्याकरितां त्यांनीं दरबार भरविला. विजापुरी सरदार स्थानापन्न झाल्यावर बेगमसाहेबांनीं त्यांना एकंदर हकीगत कळविली, व दररोज विजापुरी राज्याचे लचके तोडणाऱ्या शिवाजीचें पारिपत्य करण्याविषयीं त्यांनीं सर्व सरदारांची काकुळतीनें विनंति केली. '**अबला यत्र प्रबला बालो राजा निरक्षरो मंत्री**' या वचनाप्रमाणें विजापुरी दरबारांत त्या वेळीं सर्व गोष्टी जुळल्यावर, पोक्त विचार व योग्य सल्लामसलत यांचा अत्यंताभाव जर दृष्टीस पडला, तर त्यांत आश्चर्य तें काय ? बेगमसाहेबांची ती केविलवाणी स्थिति पाहून व त्यांनीं ती काकुळतीनें केलेली विनंति ऐकून जमलेल्या

सर्व सरदारांचीं अंतःकरणें स्वामिभक्तीनें द्रवून गेलीं, व अफजुलखान ( शिवदिग्विजयकार व अज्ञानदास शाहीर ' अबदुलखान ' असें लिहितात ) नांवाचा एक प्रबल सरदार पुढें होऊन त्यानें ती कामगिरी बजाविण्याची आपली तयारी आहे असें बेगमसाहेबांस कळविलें; एवढेंच नव्हे, तर " डोंगरांतील उंदीर शिवाजी यास जिवंत अगर मेलेला कसा तरी पकडून आणतों " अशी त्यानें भर दरबारांत प्रतिज्ञा ठोकली.

अफजुलखानाचें तें हिंमतीचें व वीररसप्रचुर भाषण आणि त्यानें केलेली ती घनघोर प्रतिज्ञा ऐकून बेगमसाहेबांस अत्यानंद झाला, व ताबडतोब त्यांनीं त्याची त्या कामावर योजना केली. भर दरबारांत सर्वांसमक्ष केलेली प्रतिज्ञा अफजुलखानानें आपल्या उस्तादास ( गुरूस ) व जनानखान्यांतील स्त्रियांस सांगितली. त्याच्या उस्तादानें त्यास सांगितलें कीं, शिवाजी अवतारी पुरुष असल्यामुळें तुझी प्रतिज्ञा शेवटास जाणार नाहीं; इतकेंच नव्हे तर या कामांत तुझ्या जिवालाही अपाय होण्याचा संभव असल्यामुळें तूं यापासून परावृत्त हो. आपल्या उस्तादानें आपल्या उत्साहावर पाणी घालून आपणास नाउमेद करण्याचा प्रयत्न केलेला पाहून अफजुलखानाला अत्यंत वाईट वाटलें. पण जनानखान्यांतील स्त्रियांनींही त्याचप्रमाणें विनवणी केल्यावर त्याला अनिवार संताप आला, व त्या भरांत त्यानें त्यांपैकीं एकुणपन्नास स्त्रियांचा क्रूरपणानें शिरच्छेद केला. एकुणपन्नास खुनांची धुंदी डोळ्यांवर असतांना अफजुलखान बारा हजार निवडक फौज बरोबर घेऊन खां खां करीत विजापुरांतून बाहेर पडला व दख्खनचा रोख धरून तो कुच करूं लागला; व असेंही सांगतात कीं, शिवाजीला धरून आणण्याकरितां त्यानें आपल्याबरोबर एक पिंजराही घेतला होता. पण या मोहिमेंत आंत

शिवाजी असलेल्या अशा लांकडी पिंजऱ्याऐवजीं आपल्या हाडां-चाच पिंजरा विजापुरच्या दरबारांत येऊन थडकणार होता, हें त्या बिचाऱ्याला काय माहीत ? विजापुरच्या दरबारांत केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें अफजुलखान बारा हजार फौजेनिशीं मजल दर-मजल करीत आपणांवर चालून येत आहे, ही बातमी महा-राजांना राजगडीं कळल्यावर ते चिंताग्रस्त झाले. अफजुलखान प्रचंड योद्धा व त्याच्याबरोबर बारा हजार निवडक फौज आणि उघड्या मैदानांत छातीला छाती भिडवून त्याच्याशीं सामना ठोकावा तर आपणांजवळ लोकांचा अतिशय तुटवडा, या विचा-रानें महाराजांचा क्षणभर—फक्त क्षणभरच धीर सुटल्यासारखा झाला. कारण, त्या निधड्या छातीच्या, अचाट कर्तृत्वाच्या व अलौकिक सामर्थ्याच्या नरपुंगवाला भीति आणखी किती वेळ वाटणार ? शत्रूशीं उघड झुंज देण्यांत आपली धडगत लागणार नाहीं, त्याला ताणून फाडून टाकला पाहिजे, असा महाराजांनीं आपल्या मनाचा पक्का निश्चय केला, व त्याप्रमाणें ताबडतोब ते आपल्या सैन्याची जुळवाजुळव व किल्ल्यांची डागडुजी करूं लागले. त्यांनीं प्रतापगड किल्ल्याचा आश्रय करून गनिमी काव्यानें विजापुरी सैन्याचा फडशा उडवून द्यावयाचा असा हुकूम फर्माविला. प्रतापगडाकडे निघण्यापूर्वी त्यांनीं मोरोपंत, चिटणीस वगैरे मुत्सद्यांस बोलावून असें सांगितलें कीं, " आप-णांवर मातबर प्रसंग येऊन ठेपला आहे. शत्रु जोरावर आहे. केव्हां काय प्रसंग गुदरेल याचा नेम नाहीं. पण या मोहिमेंत आमच्या जिवास धक्का लागल्यास तुम्ही डगमगून जाऊं नका. संभाजी लहान आहे तोंपर्यंत मातोश्रींच्या विचारानें हिंदुपद-पादशाही स्थापण्याचें पवित्र काम असेंच नेटानें व जुटीनें पुढें चालवा. माझ्या हातून जर आतांपर्यंत कांहीं महत्कृत्य झालें असेल,

तर तें तुम्हां सर्वांच्या मदतीमुळेंच झालें आहे. वास्तविक रीतीनें मी नुसतां निमित्तमात्र आहे. कार्य करणार खरे लोक तुम्हीच आहांत. तेव्हां आमच्यावर वेडावांकडा प्रसंग आल्यास तुम्ही आपलें धैर्य खचून देऊं नका. सर्वजण एकदिलानें वागा, म्हणजे आई भवानीच्या कृपाप्रसादानें तुमचें प्रत्येक कृत्य यशस्वी झाल्या-वांचून राहणार नाहीं."

महाराजांच्या तोंडून हे किंचित् निराशेचे व निरवानिरवीचे उद्गार बाहेर पडल्यावर सर्व मंडळींचे कंठ गहिंवरानें दाटून गेले, व दुःखामुळें त्यांच्या तोंडून एक अक्षरसुद्धां निघेना. जिजा-बाईंना तर सर्व ब्रह्मांड आठवल्यासारखें झालें, व अंतःकरणांत उसळलेला दुःखोदधि नेत्रावाटें अश्रुधारांच्या रूपानें बाहेर पडूं लागला. पण कसेंही झालें तरी जिजाबाई म्हणजे वीरकन्या, वीरपत्नी व वीरमाता! तेव्हां विसाव्या शतकांतील नादान व नेभळट हिंदु मातेसारखी ती एकसारखी मुळू मुळू रडत बसणार कीं काय, व आपल्या पुत्रानें आरंभिलेल्या मंगलकार्याला आपल्या अमंगल वर्तनानें ती अपशकुन करणार कीं काय? छेः, त्या पुण्यश्लोक व वीर्यशाली माउलीच्या हातून असें कसें होईल? प्रसंगाच्या महत्वाकडे लक्ष देऊन तिनें लागलेंच आपलें दुःख गिळून टाकलें, व ती म्हणाली, "शिवबा, श्री भवानीचा तुझ्यावर वरदहस्त आहे. आमचे पोटीं तूं कुलदीपक निर्माण झाला आहेस. शत्रु मातबर आहे हें ध्यानांत धरून सावध-गिरीनें वाग. चार माणसें जीं जवळ केलीं आहेस त्यांचा विचार घेत जा. दगाफितुरी करून अफझुल यानें संभाजीस, तुझ्या वडील भावास ठार मारलें त्याबद्दल सूड उगीव. मागील माण-सांची काळजी न करतां एकचित्तानें या कामास लाग, म्हणजे भवानीच्या व आमच्या आशीर्वादानें तूं विजयी होशील." काय

हा बाणेदारपणा व कोण ही तेजस्विता? मातेच्या तोंडून असले प्रोत्साहनपर शब्द निघाल्यावर कोणता सुपुत्र प्रत्यक्ष काळाच्या दाढा उपटण्यास मागेंपुढें पाहील? जिजाबाईसारखी ओजस्वी आई व शिवाजीसारखा वीरबाहु पुत्र यांची जोडगोळी सुरू झाल्यावर मुसलमानी रियासतीच्याच काय, पण अखिल ब्रह्मांडाच्या देखील ठिकऱ्या उडण्यास उशीर तो किती लागणार? खरोखर ज्या वेळेस हिंदुस्थानांत पुन्हां अशी अद्वितीय मातापुत्रांची एक तरी दुकल निर्माण होईल, त्यावेळेस हिंदुस्थानचा भाग्योदय होण्यास फारसा वेळ लागणार नाहीं!

पुरंदर किल्ल्यावर मातोश्रीची व्यवस्था करून व त्यांच्या संरक्षणाचा हरएक बंदोबस्त करून इकडे शिवाजीमहाराज प्रतापगडाकडे जावयास निघाले, तों तिकडे अफजुलखान शिवाजीच्या विध्वंसाच्या मनांत नाना युक्तया योजीत व मनःक्षेत्रावर मनोराज्याचे मनोरे उभारीत प्रतापगडाचा रोख धरून झपाट्यानें चाल करीत येत होता. तुळजापुरास येऊन तेथील भवानी शिवाजीची कुलदेवता आहे असें कळल्यावर, त्यानें देवीची मूर्ति छिन्नविछिन्न केली. पण एवढ्यानेंच त्याच्या मनाची तृप्ति न होतां त्या दुरात्म्यानें व नराधमानें त्या मूर्तीचे तुकडे जात्यांत भरडून पीठ नदींत फेंकून देवविलें. जणूं काय भवानीच्या मूर्तीचें पीठ केल्याबरोबर भवानीचें व तिचा निस्सीम उपासक शिवाजी याचें चूर्ण होणारच होतें? पण त्या धर्मवेड्या व इमामदांडग्या अफजुलखानाच्या बथ्थड टाळक्यांत इतके सुविचार कोठून येणार? भवानीनें शिवाजीला दृष्टांत दिला व मला बळी अर्पण करण्याकरितां एक " बत्तीस दांतांचा बोकड " तुझ्याकडे मी पाठवून देत आहे असें सांगितलें. तुळजापुराहून पंढरपुरास आल्यावर अफजुलखानानें श्री विठोबाचें देऊळ भ्रष्ट केलें, व तेथील

पुजाऱ्यांनीं जर दूरदृष्टीपणानें अगोदरच विठोबाची मूर्ति लपवून ठेविली नसती, तर तो चांडाळ तिलाही भरडण्यास कदापिही चुकता ना. तुळजापूर व पंढरपूर येथील हिंदूंच्या आदि देवतांची अफजुलखानानें केलेली विटंबना पाहून शिवाजीच्या व मराठ्यांच्या अंगाची संतापानें लाही उडून गेली, व ज्या नरपशूचे हात असलें घोर कर्म करण्यास रतिभरही कचरले नाहींत त्याचा कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें समूळ उच्छेद करून टाकावयाचा, असा सर्वांनीं संकल्प केला. भवानीचा व विठोबाचा केलेला उपमर्द आपणास मिळणाऱ्या विजयाचें जणूं काय पूर्णगामी चिन्हच, किंवा विजयाच्या मार्गावरील शुभशकुनच आहे असे मनांत मांडे खात, अफजुलखानानें माणकेश्वर, करकमभोसें, शंभुमहादेव, रहिमतपूर या रस्त्यानें येऊन वाईस तळ दिला. प्रतापगडाला केंद्रस्थान करून शिवाजी आसपासच्या मुलखाचा बंदोबस्त करीत आहे, हें वर्तमान अफजुलखानास समजल्यावर त्याला आनंद वाटला, व या मोहिमेंत आपणांस हटकून फत्ते मिळालीच पाहिजे अशी त्याच्या मनाची पक्की समजूत झाली. कारण, प्रतापगडाजवळच्या सर्व प्रांताची खडानूखडा माहिती आपणास असल्यामुळें शिवाजीला चिमट्यांत धरण्यास आपणास बिलकूल जड जाणार नाहीं, अशी आशा त्याच्या मनांत प्रादुर्भूत झाली. आशा ! या आशेनेंच आजपर्यंत कितीतरी लोकांना रसातळास नेलेलें आहे! व जगाची कितीतरी नासधूस केली आहे ! या जगांत आशेसारखा परिणामीं फसविणारा व दगा देणारा कोणीही सांपडणार नाहीं. फसविण्याच्या व तोंडघशीं पाडण्याच्या कामांत आपला हात दुसरा कोणीही धरणार नाहीं, अशी पाश्चात्यांना पुष्कळ घमेंड आहे! पण या पाश्चात्यांनाच

तिनें कितीदां तरी सपशेल चकविलेलें आहे ? मग बिचाऱ्या त्या आडमुठ्या व धोपटमार्गी अफजुलखानाची कथा ती काय ?

शिवाजीवर एकदम तुटून पडल्यास आपल्या सेनासागरापुढें त्याच्या थोड्याशा लोकांना हातटेकीस आल्यावांचून गत्यंतर उरणार नाहीं व आपला इष्ट हेतु सुफलित होईल, अशी त्याला बालंबाल खात्री होती. तरीपण न जाणों मराठ्यांसारख्या कडव्या व पराक्रमी लोकांशीं गांठ आहे, कदाचित् असल्या डोंगराळ प्रदेशांत आपल्या दरबारी व खानदानीच्या सैन्याचा टिकाव लागणार नाहीं, तेव्हां कांहींतरी हिकमत लढवून व फुसलावणी दाखवून शिवाजीला उघड्या मैदानांत आणावें व नंतर विश्वासघातानें त्याचा चक्काचूर उडवून द्यावा, असा त्यानें विचार केला व त्याप्रमाणें तो व्यूह रचावयास लागला. त्यानें वाईचा कुलकर्णी कृष्णाजी भास्कर यास बोलावून आणलें, व आपला मनोदय निवेदन करून त्याला शिवाजीकडे आपला वकील म्हणून पाठविलें. अफजुलखानाच्या सांगीप्रमाणें कृष्णाजी भास्कर महाराजांच्या दरबारीं आला, व शहाजीराजे व खानसाहेब यांचा निकट मित्रभाव असल्यामुळें खानसाहेबांची आपल्या जीवश्चकंठश्च मित्राच्या धैर्यशील व प्रतापी पुत्रास भेटण्याची व त्याला दोन सलोख्याच्या गोष्टी सांगण्याची मनापासून इच्छा आहे असा त्यानें महाराजांपुढें अफजुलखानानें पढविलेला पाढा वाचून दाखविला. पण असल्या मायावीपणानें व नाटकी आविर्भावानें फसून जाण्यास शिवाजी महाराज कांहीं दुधखुळे नव्हते. त्यांनीं लागलेंच ताडलें कीं, जो मनुष्य आपणांस जिवंत अगर मेलेला धरून आणण्याकरितां भर दरबारांत प्रतिज्ञा ठोकतो, जो हिंदूंच्या देवता विच्छिन्न करण्यास यत्किंचितही मागें पुढें पहात नाहीं, व ज्यानें आपणांवर मोर्चे बांधण्याचा सुद्धां धूमधडाका

पुजाऱ्यांनीं जर दूरदृष्टीपणानें अगोदरच विठोबाची मूर्ति लपवून ठेविली नसती, तर तो चांडाळ तिलाही भरडण्यास कदापिही चुकता ना. तुळजापूर व पंढरपूर येथील हिंदूंच्या आदि देवतांची अफजुलखानानें केलेली विटंबना पाहून शिवाजीच्या व मराठ्यांच्या अंगाची संतापानें लाही उडून गेली, व ज्या नरपशूचे हात असलें घोर कर्म करण्यास रतिभरही कचरले नाहींत त्याचा कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें समूळ उच्छेद करून टाकावयाचा, असा सर्वांनीं संकल्प केला. भवानीचा व विठोबाचा केलेला उपमर्द आपणास मिळणाऱ्या विजयाचें जणूं काय पूर्णगामी चिन्हच, किंवा विजयाच्या मार्गावरील शुभशकुनच आहे असे मनांत मांडे खात, अफजुलखानानें माणकेश्वर, करकमभोसें, शंभुमहादेव, रहिमतपूर या रस्त्यानें येऊन वाईस तळ दिला. प्रतापगडाला केंद्रस्थान करून शिवाजी आसपासच्या मुलखाचा बंदोबस्त करीत आहे, हें वर्तमान अफजुलखानास समजल्यावर त्याला आनंद वाटला, व या मोहिमेंत आपणांस हटकून फत्ते मिळालीच पाहिजे अशी त्याच्या मनाची पक्की समजूत झाली. कारण, प्रतापगडाजवळच्या सर्व प्रांताची खडानूखडा माहिती आपणास असल्यामुळें शिवाजीला चिमट्यांत धरण्यास आपणास बिलकूल जड जाणार नाहीं, अशी आशा त्याच्या मनांत प्रादुर्भूत झाली. आशा ! या आशेनेंच आजपर्यंत कितीतरी लोकांना रसातळास नेलेलें आहे ! व जगाची कितीतरी नासधूस केली आहे ! या जगांत आशेसारखा परिणामी फसविणारा व दगा देणारा कोणीही सांपडणार नाहीं. फसविण्याच्या व तोंडघशीं पाडण्याच्या कामांत आपला हात दुसरा कोणीही धरणार नाहीं, अशी पाश्चात्यांना पुष्कळ घमेंड आहे ! पण या पाश्चात्यांनाच

तिनें कितीदां तरी सपशेल चकविलेलें आहे? मग बिचाऱ्या त्या आडमुठ्या व धोपटमार्गी अफजुलखानाची कथा ती काय?

शिवाजीवर एकदम तुटून पडल्यास आपल्या सेनासागरापुढें त्याच्या थोड्याशा लोकांना हातटेकीस आल्यावांचून गत्यंतर उरणार नाहीं व आपला इष्ट हेतु सुफलित होईल, अशी त्याला बालंबाल खात्री होती. तरीपण न जाणो मराठ्यांसारख्या कडव्या व पराक्रमी लोकांशीं गांठ आहे, कदाचित् असल्या डोंगराळ प्रदेशांत आपल्या दरबारी व खानदानीच्या सैन्याचा टिकाव लागणार नाहीं, तेव्हां कांहींतरी हिकमत लढवून व फुसलावणी दाखवून शिवाजीला उघड्या मैदानांत आणावें व नंतर विश्वासघातानें त्याचा चक्काचूर उडवून द्यावा, असा त्यानें विचार केला व त्याप्रमाणें तो व्यूह रचावयास लागला. त्यानें वाईचा कुलकर्णी कृष्णाजी भास्कर यास बोलावून आणलें, व आपला मनोदय निवेदन करून त्याला शिवाजीकडे आपला वकील म्हणून पाठविलें. अफजुलखानाच्या सांगीप्रमाणें कृष्णाजी भास्कर महाराजांच्या दरबारीं आला, व शाहाजीराजे व खानसाहेब यांचा निकट मित्रभाव असल्यामुळें खानसाहेबांची आपल्या जीवश्चकंठश्च मित्राच्या धैर्यशील व प्रतापी पुत्रास भेटण्याची व त्याला दोन सलोख्याच्या गोष्टी सांगण्याची मनापासून इच्छा आहे असा त्यानें महाराजांपुढें अफजुलखानानें पढविलेला पाढा वाचून दाखविला. पण असल्या मायावीपणानें व नाटकी आविर्भावानें फसून जाण्यास शिवाजी महाराज कांहीं दुधखुळे नव्हते. त्यांनीं लागलेंच ताडलें कीं, जो मनुष्य आपणांस जिवंत अगर मेलेला धरून आणण्याकरितां भर दरबारांत प्रतिज्ञा ठोकतो, जो हिंदूंच्या देवता विच्छिन्न करण्यास यत्किंचितही मागें पुढें पहात नाहीं, व ज्यानें आपणांवर मोर्चे बांधण्याचा सुद्धां धूमधडाका

चालविला आहे, त्याच्या मनांत शुद्धभाव व कळकळीची प्रीति रेसभरही वसत नसली पाहिजे, व उघडचा मैदानांत आपणांस आणण्याचा त्याचा हा कांहींतरी डाव असला पाहिजे. महाराजांचा असा समज होण्यास आणखी असेंही एक कारण होतें कीं, त्यांच्या हेरांनीं त्यांना यापूर्वींच अशाच अर्थाच्या बातम्या कळविल्या होत्या.

कृष्णाजीपंताकडून अफजुलखानाचा निरोप कळल्यावर महाराजांनींहि अवतरणांतर्गत वचनाप्रमाणें मानभावीपणा स्वीकारून अफजुलखानास भेटण्याची आपली खुशी आहे असें कृष्णाजीपंतास सांगितलें, व गडावरील सदरेंत त्यांचा सन्मानपूर्वक पाहुणचार करण्याविषयीं आज्ञा केली. दरबार आटोपला, दिवसभर श्रमला भागलेला दिनमणि पश्चिम दिशेच्या दरवाजांतून आपल्या मंदिरांत शिरला, सूर्याच्या प्रखर तेजानें संतप्त झालेली पृथ्वी निद्रिस्त होऊं लागली, व चोहोंकडे अगदीं सामसूम झालें. बाह्यसृष्टींत अशा रीतीनें शांततेचें साम्राज्य स्थापित झालें असतां, महाराजांच्या अंतःसृष्टींत मात्र भयंकर हलकल्लोळ माजून राहिला होता. गडावरील मराठे गडी निद्रावश झालेले पाहून ते कृष्णाजीपंताच्या सदरेंत येऊन दाखल झाले. कृष्णाजीपंत त्यावेळेस सुखकर विचारांत गढून गेल्यासारखे दिसत होते, व आपण हातीं घेतलेल्या कामगिरींत बहुतेक यशःप्राप्ति झाल्याबद्दल त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचें तेज खेळत होतें. महाराजांची स्वारी आलेली पाहून ते उठून उभे राहिले, व त्यांनीं खालीं बसण्याविषयीं प्रार्थना केली. खालीं बसल्यावर महाराजांच्या-त्या वाग्देवीकंठमणीच्या—वक्तृत्वाचा असा अस्खलित प्रवाह वाहूं लागला कीं, "खानाचें आमचेविशीं अगत्य फार आहेच. मागें अपराध केले, ते क्षमा करून पुढें मसलत सांगणार, अशीं त्यांचीं सफाईचीं

बोलणें बोलतां. ऐशास तुम्ही हिंदु आहांत, ते यवन. त्यांचें अन्न खादलें म्हणोन, तुमचा आमचा धर्म एक आहे, त्या अर्थी निष्कपटतेनीं सांगावें. आमचा विचार कायावाचा धर्मस्थापना करावी, दुसरा किमपि नाहीं. मग तुम्हांला कलियुग माहात्म्यानुरूप बुद्धि उत्पन्न होऊन भ्रष्ट करणें आहे, तरी तुमची मर्जी. खानास येथें आणावें, त्याची आमची मेढच्यावरी भेट होऊन किलाफ दूर करावे, म्हणजे नेतील तिकडे येऊं. इष्टाचे दास आहोंत. येणें करून आमचे मनांत किंतु वाटत नाहीं. त्याजला आगत्यच तरी ते बेकिलाफ येऊन भेटतील. नसल्यास जसें त्यांच्या मनांत तसें आमचेही चित्तांत. येथें येऊन भेटावें, हें बोलणे आमचे स्नेहभावें सिद्ध करावें."

महाराजांच्या या रसाळ, वक्तृत्वपूर्ण व रात्रींच्या प्रशांत वेळीं केलल्या भाषणाचा कृष्णाजीपंताचे मनावर इतका परिणाम झाला कीं, महाराज ईश्वरी अवतार आहेत असें वाटून त्यानें त्यांना खानाची सर्व मसलत सांगितली, व या कामांत आपल्या हातून होईल तितकी मदत करूं असें त्यानें आश्वासनही दिलें. महाराजांचा निरोप घेऊन कृष्णाजीपंत परत अफजुलखानाकडे गेल्यावर महाराजांनीं गोपिनाथपंत हिवरकर यांस खानाकडे आपला वकील ह्मणून पाठविलें. कृष्णाजीपंतानें सांगितल्याप्रमाणें गोपिनाथपंतांनीही कळविल्यावर अफजुलखानानें असा विचार केला कीं, आपण शरीरानें धिप्पाड, कुवतदार, जवानमर्द व फौजबंद, तेव्हां भेटींत शिवाजीला आपण सहज चिरडून टाकूं व कपटाच्या जोरावर विशेष प्राणहानि न करतां आपला हेतु सिद्धीस नेऊं; म्हणून राजे म्हणतात त्या ठिकाणीं भेट घेण्यास आपण तयार आहोंत, असें त्यानें गोपिनाथपंतांस कळविलें. त्यावर पंतांनीं सांगितलें कीं, " आपली स्वारी तिकडे निखालस

येणार, मार्ग नीट नाहीं, सरंजाम चालला पाहिजे, त्यापक्षीं मास-पक्ष मुक्काम करावा. रस्ता चांगला करवून सेवेशीं हजर होईन." गोपिनाथपंतानें घडलेली सविस्तर हकीकत महाराजांस निवेदन केली. त्यावरून व "**वहेदमित्रं स्कंधेन यावत्कालस्य पर्ययः। ततः प्रत्यागते काले भिन्द्याद्धट मिवाश्मनि ॥**" ( प्रसंग आला तर शत्रूला डोक्यावर घेऊन नाचावें; परंतु योग्य वेळ आली म्हणजे मातीची घागर दगडावर आपटून जशी फोडून टाकतात, त्याप्रमाणें त्याला एकदम झुगारून देऊन त्याच्या चिंधड्या उडवाव्यात ) या 'कणिकनीतीं'तील वचनाला अनुसरून महाराजांनीं रस्ता साफ करण्यास, जागजागीं विहिरी बांधण्यास, दुकानें घालण्यास, मंडप उभारण्यास, सारांश. अफजुल-खानाची व त्याच्या सैन्याची बडेजाव ठेवण्याचीं साधनें एकत्र जुळविण्यास प्रारंभ केला, व थोड्याच दिवसांत उत्तम व्यवस्था करून टाकली. प्रतापगडच्या एका बुरुजाखालीं खानाच्या भेटी-करितां एक भव्य, चित्रविचित्र व रंगी सुरंगी मंडप उभारला. आबाजी रघुनाथ नांवाच्या एका बहुत इतबाऱ्याचा कामदारास त्यांनीं चौक्यांचा बंदोबस्त करावयास सांगितलें. मध्यंतरीं विश्वास नानाजी मुसेखोरेकर म्हणून एक प्रभु ज्ञातीचा सरदार शिवाजी-जवळ होता, त्यानें फकीराच्या वेषानें खानाच्या छावणींत वारं-वार जाऊन तेथील बित्तंबातमी महाराजांस आणून दिली. सत-राव्या शतकांत मराठ्यांनीं स्वातंत्र्याबद्दल जें युद्ध केलें व त्यांत त्यांना जी यशःप्राप्ति झाली त्याचें कारण हेंच कीं, त्या वेळेस ब्राह्मण, प्रभु, मराठे, शूद्र, इत्यादि अनेक जातींच्या लोकांनीं आपण सर्वजण एकाच धर्माचे व एकाच हाडामांसाचे आहोंत, असा उज्वल भाव आपले ठायीं बाणून घेऊन शिवाजीमहाराजांना हिंदुपदपादशाहीची इमारत उठविण्याच्या कामांत एकदिलानें

व एकाग्र चित्तानें मदत केली. त्यावेळेस मराठे वेदोक्ताबद्दल भांडत तंडत बसले नाहींत, प्रभूंनीं ब्राह्मणांचा द्वेष केला नाहीं, किंवा ब्राह्मणांनीं आपल्या उच्च वर्णाच्या तोऱ्यांत क्षत्रियांना साहाय्य करण्यास कांकूं केलें नाहीं. सर्व महाराष्ट्रीय एकीच्या अभेद्य बंधनांनीं एकत्र जखडून गेले होते, व यवनी राज्याच्या ठिकऱ्या उडविण्यास प्रत्येकजण अटोकाट प्रयत्न करीत होता. महाराष्ट्रीयांत जोंपर्यंत एकी होती, तोंपर्यंत मोठे मोठे मी मी म्हणणारे तिस्मारखान सुद्धां त्यांना वचकून होते. पण त्या एकीची बेकी झाल्याबरोबर त्यांचा पार विचका उडून गेला, व सध्यां आमच्यांत तिचा अभाव असल्यामुळेंच अजूनही होत आहे. ज्या वेळेस सर्व महाराष्ट्रीय एकीनें एकत्र केले जातील, तो खरोखर सुदिन होय! सर्व व्यवस्था झाल्यावर महाराजांनीं गोपिनाथपंतांस खानाकडे पाठविलें, व गोपिनाथपंतानें भेटीला निघण्याविषयीं त्याची लीनपणानें विनंति केल्यावर खान आपल्या सैन्यासह प्रतापगडाकडे निघाला. मार्गावरील चोख व्यवस्था पाहून खान व त्याचें सैन्य दिलखुष झालें, व शिवाजीचा पाहुणचार खात व नाचरंगांत दंग होत विजापुरी मंडळी प्रतापगडाखालीं येऊन पोहोंचली. गोपीनाथपतानें दुसरें दिवशीं भेटीचा नेम ठरविला.

तोच दिवस. तोच मोठा आणीबाणीचा दिवस. तोच मराठ्यांच्या इतिहसांतील अत्यंत महत्वाचा दिवस होय. महाराष्ट्रभूनें स्वातंत्र्याची शाल परिधान करावयाची, कां नग्नावस्थेंत राहून यवनी अमलाचे तीव्र तडाखे खात रहावयाचें, हें त्याच दिवशीं ठरणार होतें. त्याच दिवसाच्या परिणामावर महाराष्ट्रीयांची भावी स्थिति अवलंबून होती, व म्हणून तोच दिवस हिंदु पंचांगांत सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेविला पाहिजे. मराठी सूर्य व विजापुरी

केतु अगदीं सन्निध येऊन तर ठाकले, व कोण कोणाचा काय-मचा लोप करून टाकतो, हें त्याच दिवशीं जा ीर करण्यांत येणार होतें. रात्र संपली. दिवस उजाडला. त्या दिवसाचा तो विरुद्ध शक्तींचा योगायोग अवलोकन करण्याकरितां भगवान सूर्य-नारायण नभोमंडळाच्या मध्यभागाकडे जोरानें आपला रथ हांकूं लागले. ठरल्याप्रमाणें मराठे वीर दऱ्याखोऱ्यांतून लपून छपून बसले. येसाजी कंक, हिरोजी फर्जंद, निराजी सांवत, बाळोजी जगताप वगैरे रणशूर व हिंमतबहाद्दर मराठे सरदार महाराजांच्या आज्ञेवरून आपल्या प्राणप्रिय समशेरींचा त्याग करून चवरी, मोरचल, पानदान, सरपोस घेऊन खानाला खडी तार्जीम देण्या-करितां मंडपांत येऊन दाखल झाले. खानाला वर्दी देण्यांत आली. त्यान दोन हजार विजापुरी सैन्याला आपणाबरोबर येण्याविषयीं हुकूम केला पण इतकें सैन्य बरोबर घतल्यास शिवाजी भेट घेण्यास तयार होणार नाहीं असें कृष्णाजीपंतानें सांगितल्यावर, तो अगदीं थोडे लोक बरोबर घेऊन मेण्यांत बसून निघाला. मंडपांत आल्यावर गोपानाथपंतानें उच्चासनावर बसण्याविषयीं खानास विनंति केली व अत्तरगुलाब, हारतुरे वाटण्यांत आले. विजापुरी राज्याच्या कुशींत सलणारा कांटा आज आपण कपट-भावाने व बिनप्रयासाने खास उपटून काढणार, म्हणून खान मोठ्या खुषींत होता. पण विजापुरी राज्याच्या कंबरेचा कांटा आज सपशेल मोडला जाणार आहे, हें त्याला काय माहीत ! खान अशा रीतीनें आनंदसागरांत गटंगळ्या खात असतां, शिंग, भेरी व नौबद यांचा प्रचंड आवाज त्याच्या कर्णपथावर येऊन आदळला, व त्याच्या अंतःकरणांतील आनंदोदधि जास्त जास्त उसळूं लागला. भवानीचें दर्शन घेऊन महाराजांची स्वारी खानाच्या भेटीकरितां खालीं उतरूं लागली. महाराष्ट्रीयांच्या सद्गुणांचें

तें मूर्तसर्वस्व पाहून मराठ्यांच्या चेहेऱ्यावर अभिमान व कौतुक यांची छटा पसरली, व भारतीय काळांतील अर्जुन अवतीर्ण झाला आहे असें प्रत्येकाला वाटलें. महाराजांनीं त्या वेळेस आपल्या बचावाचा सर्व पोषाख चढविला होता. अंगांत चिलखत व त्यावर अंगरखा, डोक्यास शिरस्राण व त्यावर शंभर हात लांबीचें पागोटें, उजव्या हातांत भवानी तलवार व बाहींत बिचवा, डाव्या हातांत जहर विषाचें पाणी दिलेलीं वाघनखें, याप्रमाणें त्यांचा पोषाख होता. त्यांचा चेहेरा भव्य, गंभीर व तेजःपुंज दिसत होता. ते निश्चयानें आणि धैर्यानें गडाखालीं उतरत होते. शिंगें व नौबदी यांचा आवाज जवळ जवळ येऊं लागला व खानाची तळमळ वाढूं लागली. तो आवाज आतां अगदींच जवळ आला व थोडयाच वेळानें महाराज मंडपांत येऊन पोहोंचले.

महाराज दृष्टीस पडतांच अफजुलखान आपल्या आसनावरून उठून त्यांना आलिंगन देण्याकरितां धांवत गेला, व महाराजही पुढें सरसावले. वेडया अफजुलखाना! तूं प्रत्यक्ष काळाला आलिंगन देण्यास पुढें जात आहेस, हें तुझ्या ध्यानांत कसें आलें नाहीं? तूं महाराजांना आलिंगन देणें म्हणजे नवनीतानें रसरसित निखाऱ्याला, किंवा शलभानें प्रदीप्त ज्योतीला कवटाळण्यासारखें होय, ही साधी गोष्ट तूं कसा विसरलास? घेतली. पतंगानें दिव्यावर झांप घेतली. महाराजांची व अफजुलखानाची छातीला छाती भिडली. सूर्याचा व केतूचा संयोग झाला. अफजुलखानानें महाराजांचें डोकें बगलेंत धरलें. सूर्याला केतूनें क्षणभर ग्रासून टाकलें. अफजुलखान म्हणजे उंचा पुरा व खंदा जवान! तो आतां आपल्या डोक्याचा खास भुगा करणार, तों इतक्यांत प्रसंगावधान दाखवून महाराजांनीं डाव्या हातांतील वाघनखें त्याच्या पोटांत खुपसलीं व त्याचा कोथळा बाहेर काढला. आपला बेत

तर काय, व आपणावर किती विपरीत प्रसंग येऊन ठेपला आहे, याविषयीं खानाच्या डोक्यांत लक्कन् उजेड पडला. तरी पण त्यानें आपलें धैर्य खचूं दिलें नाहीं. डाव्या हातानें बाहेर आलेली आंतडीं आंत खुपसून त्यानें महाराजांवर समशेरीचा वार केला. महाराजांनीं सफाईनें तो वार चुकवून त्याच्यावर तलवारीचा प्रहार केला. खानाचें मृत शरीर धाडकन् जमिनीवर पडलें व शून्य दृष्टीनें खानाच्या प्रेताकडे पहात महाराज उभे राहिले. खानावर ओढावलेला प्रसंग पाहून सय्यद बंडा महाराजांवर धांवून गेला, व तो त्यांच्यावर पट्टयाचा वार करणार तों जिवा महाला नांवाच्या एका जवानमर्दानें वरच्यावरती त्याचा हत्यारबंद हात कलम करून त्यास जमिनदोस्त केलें. त्यावेळेस जिवा जर जवळ नसता, तर त्या नोडग्याच्या शस्त्राला महाराज कदाचित् बळी पडले असते; तेव्हां " होता जिवा म्हणून वांचला शिवा " असें जें म्हणतात तें यथार्थ होय. विजयसूचक शिंगें कडकडूं लागलीं व नौबदी झडूं लागल्या. लपून बसलेलें मराठी सैन्य आपल्या जागेंतून उठून त्यानें अचानक विजापुरी सैन्यावर हल्ला केला, तेव्हां विजापुरी सैन्याला घेमार घेमार करीत पळतां पळतां भुई थोडी झाली.

ही लढाई प्रतापगडची लढाई या नांवानें प्रसिद्ध आहे. मराठ्यांनीं आपल्या समशेरी शत्रूच्या रक्तानें रंगविल्या, व पुष्कळसे उंट, हत्ती व घोडे काबीज केले. अफजुलखानाचा मुलगा फाजल मोठ्या मिनतवारीनें या दंगलींतून निसटून गेला. एकंदरींत, मराठ्यांवरचें हें भयंकर अरिष्ट महाराजांच्या अलोट बुद्धिचातुर्यामुळें टळलें. केतूचा नाश होऊन सूर्य पुन्हां प्रखरतेनें तळपूं लागला. " जशास तसें " या तत्त्वाची यथार्थता सिद्ध करून दाखविण्यांत आली, व डोक्यावर घेऊन नाचविलेल्या शत्रूच्या चिंधड्यान् चिंधड्या उड-

विण्यांत आल्या. अफजुलखानाचें प्रेत जमिनीवर पडलेलें पाहून खानाच्या भोई लोकांनीं तें नेण्याविषयीं उचल केली. पण मराठ्यांनीं त्या सर्वांना कांपून काढलें. महाराजांनीं खानाचें शीर कांपून घेतलें, आणि एका हातांत तें शीर व दुसऱ्या हातांत लालभडक झालेली ती भवानी तरवार घेऊन ते गडावर जावयास निघाले. आवेशानें इंगळासारखे लाल झालेले डोळे, शत्रूच्या रक्तानें नखशिखांत माखलेलें शरीर, आणि उजव्या हातांत भवानी तरवार व डाव्या हातांत विजयाचें चिन्ह म्हणून धरलेलें खानाचें शीर, अशी महाराजांची ती उग्र, आवेशयुक्त व नारसिंही मूर्ति दृष्टीस पडतांच, गडावरील मराठे गडी आज प्रत्यक्ष कर्दनकाळाचा अवतार झाला आहे कीं काय, अशा बुचकळ्यांत पडले. महाराजांनीं तें शीर भवानीपुढें ठेवून संकटांतून सुरक्षितपणें निभाविल्याबद्दल देवीचे धन्यवाद गाईले. विजापुरी सैन्याचा फन्ना उडविल्यावर मराठे वीरही गडावर जमा झाले. त्या वेळेस त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. महाराजांच्या अलौकिक सामर्थ्याच्या व असामान्य पौरुषाच्या स्तुतिपाठांनीं तो गडच नव्हे, तर सारें महाराष्ट्र दुमदुमून गेलें, व हिंदुपादशाही स्थापन करून हिंदुधर्मावर आलेली ग्लानि घालविण्याकरितां अवतीर्ण झालेला हा कोणी तरी दैवी पुरुष असला पाहिजे, अशी प्रत्येकाची खात्री झाली. आपल्या पुत्राच्या पराक्रमानें जिजाबाईस तर केवढी धन्यता वाटली असेल व तिनें कितीतरी प्रेमाश्रू ढाळले असतील? शिवबा, प्रतापगडच्या माळावर तुम्ही जो अतुल पराक्रम गाजविला व अद्वितीय प्रसंगावधान दाखविलें, त्याचें यथार्थ वर्णन आमची ओबडधोबड लेखणी ती काय करणार? तुम्ही प्रत्यक्ष शिवाचे अवतार व तुमच्या ठायीं दिव्य तेज असल्यामुळें, अफजुलखानासारख्या घुंघुरट्यांनीं पंचत्वाप्रत जावें, यांत कांहीं नवल नाहीं! या प्रसंगाप्रमाणेंच अनेक

वेळीं संकटांत उडी घेऊन तुम्ही आणि तुमच्या धाराशूर व रणझुंझार मराठे लढवय्यांनीं हिंदुधर्माची संस्थापना व हिंदुपादशाहीची उभारणी केली, व इतिहासाच्या पटावर आपलीं नांवें रक्तानें लिहून ठेविलीं. पण ती हिंदुपदपादशाही आतां कोठें आहे? तुमच्या विजवट्या वंशजांनीं ती विलयाला नेलेली पाहून तुमचे सर्वांचे आत्मे स्वर्गांत कितीतरी तळमळत असतील! व आपले पोटीं असले कुलांगार निपजावेत म्हणून दुःखानें ते कितीतरी विव्हळत असतील बरें? तुम्ही गाजविलेल्या शौर्याचीं, स्वार्थत्यागाचीं, बुद्धिमत्तेचीं व स्वातंत्र्यप्रियतेचीं शेंकडों स्थलें आमच्या दृष्टीसमोर असतांनाही आम्ही कितीतरी भेकड, स्वार्थलोलुप व बेअकली बनलों आहोंत? तेव्हां महाराज, तुम्ही दयार्द्र दृष्टीनें आपल्या वंशजांकडे पाहून त्यांच्या ठायीं शूरत्वाची, स्वार्थत्यागाची व पौरुषत्वाची ज्योत प्रज्वलित करा!



# रत्न दुसरें.

## बाजी प्रभु.

To every man upon this earth
Death cometh soon or late.
And how can man die better
Than facing fearful odds,
For the ashes of his fathers
And the temples of his Gods.

( जन्मास आलेल्या प्रत्येक इसमास आज नाहीं उद्यां मरण हें येणारच. परंतु आपल्या देवतांचीं देवळें व पूर्वजांची परंपरा कायम राखण्यासाठीं जबरदस्त शत्रूला तोंड देऊन आलेल्या मरणापेक्षां जास्त स्पृहणीय मरण तें कोणतें असणार बरें ? )

" मरणं प्रकृतिः शरीरिणाम् " या न्यायानें जन्मास आलेला प्राणी हा केव्हांना केव्हां तरी नाशाप्रत गेलाच पाहिजे. कोणत्याही प्राण्याला अमरपट्टा दिलेला नसल्यामुळें त्याचें या मृत्युलोकीं जगत्प्रलयावधि वास्तव्य होण्याचा बिलकुल संभव नाहीं. जन्मास यावयाचें याचाच अर्थ मृत्यूच्या मार्गास लागावयाचें. जन्म आणि मृत्यू, स्थिति आणि लय, हीं एकाच नियमित कालाचीं दोन टोकें आहेत. वास्तविकरीत्या जन्म आणि मृत्यू या दोहोंत मुळींच फरक नाहीं. जन्म म्हणजेच मृत्यू आणि मृत्यू म्हणजेच जन्म होय. जन्मास आलेला प्राणी कालवशात् मृत्यूच्या तडाक्यांत सांपडलाच पाहिजे, व मेलेला प्राणी कालेंकरून जन्मास आलाच पाहिजे. अशी ह्या अखिल विश्वाची घटना आहे; अशा रीतीनें विश्वाचें रहाटगाडगें फिरत आहे; व असा

हा सृष्टीचा अप्रतिहत नियम आहे. जन्मास आलेल्या मनुष्याचा काळाच्या तीव्र आघातानें जो चक्काचूर होऊन जातो, तो **" न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः । अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो । न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ "** अशा त्याच्या अविनाशी व अमर्त्य आत्म्याचा होत नाहीं; तर त्या आत्म्यावरील औट हात लांबीच्या मृण्मय कवचाचाच होतो. मनुष्याचा आत्मा मरणाधीन नाहीं, व त्याचें शरीर मरणमुक्त नाहीं. आत्मा हा शाश्वत व 'ईश्वरीय' तत्त्वांपासून झालेला असल्यामुळें त्याच्यापुढें मृत्यूचें कांहींही चालत नाहीं. पण शरीर हें नश्वर व भंगूर द्रव्यांच्या एकीकरणानें बनलें असल्यामुळें त्याचें मृत्यूपुढें कांहींही चालत नाहीं. शरीर हें आत्म्याचें वेष्टन होय. जोंपर्यंत तें वेष्टन चांगलें धडधाकट असतें, तोंपर्यंत त्याच्यांत आत्म्याची वस्ती असते. पण तें जर कां जीर्ण व टाकाऊ झालें, तर तो लागलीच त्यांतून आपलें ठाणें उचलून दुसऱ्या एखाद्या सुयंत्र व सुव्यवस्थित वेष्टनांत प्रवेश करतो. आत्म्यानें अशा एखाद्या वेष्टनाचा त्याग केला, कीं त्या वेष्टनाला मृत्यू येतो; व त्याला मृत्यू आल्यावर त्याची धूळ होऊन धुळींत धूळ मिसळून जाते.

जर काळगतीनें अंतर्गत आत्मा निघून जाऊन शरीराचा विध्वंस हा व्हावयाचाच, तर मनुष्यानें आपल्या शरीराची वाजवी-पेक्षां फाजील रीतीनें उगीच बडेजाव किंवा जोपासना करणें, हें केव्हांही योग्य होणार नाहीं. नित्य आत्म्याशीं तुलना केली असतां अनित्य शरीर त्याच्या पासंगालाही पुरत नाहीं असें जर प्रमाणसिद्ध आहे, तर प्रत्येक मनुष्यानें आपल्या आत्म्याच्या उन्न-त्यर्थ अविश्रांत श्रम करून आपली ' दो दिवसांची तनु ' एखाद्या सत्कार्यी झिजवावयास नको काय? जर आज नाहीं उद्यां

करुणाविमुख मृत्यूची झडप आपल्या शरीरावर येऊन पडावयाचीच, तर त्या शरीराचा उपयोग आपल्या स्वतःची तुंबडी भरण्याच्या क्षुद्र कामाकडे करण्यापेक्षां आपल्या धर्मबांधवांची प्रगति करण्याकडे केला, तर तो निःसंशय जास्त श्रेयस्कर व कीर्तिप्रद होईल. स्वार्थासाठीं अहोरात्र धडपड करणारे लाखों लोक सांपडतील; किंबहुना स्वार्थ साधण्यासाठीं हाडांचीं काडें करणें हा जन्मसिद्ध मनुष्यस्वभावच असल्यामुळें सारें जग स्वार्थाच्या मार्गे लागलें आहे, असेंही म्हटलें असतां चालेल. या जगांत पहिल्यापासूनच स्वार्थसाधु लोकांचें मनमुराद पीक येत आहे; व जोंपर्यंत मनुष्यस्वभाव सध्यां आहे तसाच कायम राहील, तोंपर्यंत तें असेंच येत जाणार. असल्या स्वार्थपरायण लोकांनीं कितीही द्रव्यसंचय केला, किंवा ऐहिक सुखाचा व वैभवाचा कितीही उपभोग घेतला, तरी त्यांनीं आपल्या देहाचें, उमेदीचें व उत्साहाचें सार्थक केलें, असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं. आपणांला, आपल्या मुलाबाळांना व आपल्या इष्टमित्रांना इहलोकचीं याला सुखानें कंठितां यावी, अशा स्वार्थैकपर बुद्धीनें प्रेरित होऊन नाना तऱ्हेचीं संकटें सोसणारा व प्रसंगीं मृत्यूलाही कवटाळणारा मनुष्य आपल्या देहाचें चीज करतो, अशांतली मुळींच गोष्ट नाहीं. अशा मनुष्याच्या आयुष्यक्रमांत व एखाद्या क्षुद्र कीटकाच्या आयुष्यक्रमांत यत्किंचित्‌ही अंतर दृष्टीस पडत नाहीं. दोन्हीही एकाच योग्यतेचे प्राणी आहेत. असले स्वार्थाच्या जाळ्यांत पूर्णपणें गुरफटून गेलेले लोक मेले काय किंवा जिवंत असले काय, या दोन्ही गोष्टी मानव्याच्या दृष्टीनें सारख्याच किंमतीच्या आहेत. अशा लोकांच्या मरणाबद्दल त्यांचे देशबांधव हळहळत नाहींत, व राष्ट्राचा आत्मा तळमळत नाहीं. अशा लोकांना परलोकीं सद्गति मिळत नाहीं व त्यांना अक्षय्य

सुखाची जोड होत नाहीं. असले लोक गतप्राण झाल्याबरोबरच विस्मृतीपथाला जाऊन पोहोंचतात, व मागें त्यांचा मागमूस सुद्धां रहात नाहीं. पण जे लोक स्वार्थावर लाथ मारून स्वधर्मासाठीं, स्वदेशासाठीं व स्वराज्यासाठीं आपल्या अंगास झीज लावून घेतात, किंवा वेळ पडली तर आनंदानें मृत्यूच्या जबड्यांत उडी घेण्यास तयार होतात, तेच जन्मास येऊन आपल्या देहाचें सार्थक करतात, तेच नरजन्माची योग्यता सिद्ध करून दाखवितात व तेच सगळ्या जगास वंद्य व पूजनीय होतात. असले लोक स्वधर्मासाठीं आपले देह कष्टवितात; पण आपल्या धर्मबांधवांचीं मनें तोषवितात! ते स्वदेशासाठीं स्वतःस झिजवितात, पण आपल्या देशबांधवांचीं अंतःकरणें रिझवितात! ते आपल्या सत्कृत्यांनीं परमेश्वरास आळवितात व स्वतःस स्वर्गीय सुख मिळवितात! खरोखरच धर्मासाठीं व देशासाठीं शत्रूच्या अफाट सेनासमूहाला तोंड देऊन रणकुंडांत आपल्या प्राणांची पूर्णाहुति देणाऱ्या नरपुंगवांचें मरण कितीतरी बोधपर व स्पृहणीय असतें? असले नर-शार्दूल रणांगणीं मरतात, पण प्रलयकालपर्यंत कीर्तिरूपानें उरतात. हे स्वतः मृत्यू पावतात; पण आपल्या धर्माला, आपल्या राज्याला व आपल्या देशबंधूंना जिवंत ठेवितात. हेच लोक आपल्या जन्माचें सार्थक करतात, व नरदेह सफल करतात. एकंदरींत, हेच खरे योगी, हेच खरे महंत व हेच खरे मर्दानी साधु होत. महाराष्ट्राच्या इतिहासांत असले जे अनेक मर्दानी साधू होऊन गेले आहेत, त्यांपैकींच एकाच्या अद्वितीय पराक्रमाचें पुढील वर्णन आम्ही वाचकांस सादर करीत आहोंत.

सन १६६० अर्धा अधिक लोटला होता. मराठी स्वराज्याचें तोरण बांधून अजून पुरीं पंधरा वर्षेंही झालीं नव्हतीं.

महाराष्ट्राच्या राजकीय नभोमंडळाच्या क्षितिजावर मराठ्यांचा स्वातंत्र्यरवि आपल्या आरक्त बालकिरणांनीं प्रकाशूं लागला होता; व अफजुलखानरूपी केतूचा नाश होऊन महाराष्ट्रभूवर स्वातंत्र्याचें आल्हादजनक व जीवनदायक ऊन पुनरपि पडण्याचा रंग येऊन टेपला होता. पण इतक्यांत एक प्रचंड मेघावडंबर उसळून मराठ्यांच्या स्वातंत्र्यरवीचा लोप होऊन जातो कीं काय, व महाराष्ट्रभूमीला पुनरपि पारतंत्र्यानें गारठून जाऊन मृतप्राय होण्याचा प्रसंग येतो कीं काय, अशी सर्वांना मोठी भीति पडली. अफजुलखान मरण पावला व रुस्तुमुज्जमानचा पराभव होऊन पन्हाळा किल्ल्यावर जेव्हां मराठ्यांचा भगवा झेंडा फडफडूं लागला, तेव्हां आपला व आपल्या राज्याचा उन्हाळा होऊन जातो कीं काय, अशी आदिलशहास मोठी धास्ती पडली. शिवाजीनें आपल्या राज्यावर यथेच्छ हात मारण्याचा सपाटा चालविला आहे, ही वार्ता ऐकून त्याची पांचावर धारण बसली व तो चिंताग्रस्त झाला. शिवाजीचा जर वेळींच बंदोबस्त केला नाहीं, तर तो अल्पावकाशांतच आपल्या राजवाड्यावर मराठ्यांचें निशाण रोवून आपल्या राज्याचीं पाळेंमुळें खणून टाकल्याशिवाय राहणार नाहीं, असा दुःखमय विचार मनांत येऊन आदिलशहाचे डोळे पाण्यानें भरून आले; व शिवाजीचें पारिपत्य करण्यास समर्थ असा एखादा सरदार आपल्या पदरीं आहे किंवा नाहीं, याविषयीं तो विचार करूं लागला. पण इतक्यांत त्यानें आनंदाच्या भरांत टाळी वाजविली व त्याचा चेहेरा प्रफुल्लित दिसूं लागला. शिवाजीची हड्डी नरम करण्यासारखा शिद्दी जोहार नांवाचा प्रबल योद्धा आपल्या पदरीं आहे अशी त्यास आठवण होऊन त्याचें मन हर्षभरित झालें व आपण आतां वीतचिंत झालों असेंही त्यास वाटूं लागलें. लागलीच त्यानें शिद्दी जोहार यास

शिवाजीची खोड मोडण्याकरितां जावयास सांगितलें. शिद्दी जोहार यानें ती गोष्ट तावडतोब मान्य केली. दहा हजार स्वार व चौदा हजार पायदळ इतकी निवडक फौज बरोबर घेऊन त्यानें पन्हाळा किल्ल्याकडे आपल्या सैन्याचा मोर्चा फिरविला. ही बातमी कळ-तांच अफजुलखानाचा मुलगा फाजल हा आपल्या बापाच्या वैऱ्याचा सूड घेण्याकरितां शिद्दी जोहारास जाऊन मिळाला, व ती प्रचंड सेना शिवाजीस जमिनदोस्त करण्याचा उद्देशानें पन्हाळा किल्ल्याचा रोंख धरून मजल दरमजल करीत निघाली.

इकडे महाराजांनीं किल्ल्याच्या आजूबाजूच्या प्रांताचा चांगला बंदोबस्त करून या यावनी सेनारूप वावटळीला तोंड देण्या-करितां किल्ल्याच्या डागडुजीचें काम नेटानें चालविलें. शिद्दी जोहार थेट पन्हाळ्यापर्यंत येऊन थडकला, व पावसाची झिमड चालली असतांना देखील त्यानें किल्ल्यास वेढा दिला, मोर्चे बांधिले व तोफा डागल्या. शिद्दी जोहार यानें वेढ्याचें काम इतक्या दक्षतेनें व चतुराईनें चालविलें कीं, किल्ल्यांतील लोकांचें दळणवळण अगदीं बंद पडून ते नामोहरम झाले. आतां थोड्याच दिवसांत किल्ला यवनांच्या हस्तगत होऊन मराठ्यांच्या भगव्या झेंड्याऐवजीं तेथें मुसलमानांचा चांद चमकूं लागणार, अशा विचारांनीं किल्ल्यावरील मराठे गड्यांचीं डोकीं भणाणून गेलीं, व त्यांचें धैर्य सुटत चाललें. आतां इतके दिवस अनेक संकट-परंपरा सोसून रचलेली स्वराज्याची इमारत पार ढांसळून जाणार व महाराष्ट्रांतून स्वतंत्रतेचा कायमचाच लोप होणार असें वाटून, किल्ल्यावरील मराठे वीरांचीं अंतःकरणें निराशेनें व नाउमेदीनें व्याप्त होऊन गेलीं. त्यांना दाही दिशा भयाण भासूं लागल्या, व चोहोंकडे भयसूचक चिन्हें दिसूं लागलीं. पण त्यांच्या अंतःकरणा-वर आलेलें निराशेचें, नाउमेदीचें व निरुत्साहाचें पटल दूर

साऱण्याकरितां तेथें एक चंडांशू तळपत होता. त्या किल्ल्यावर धैर्याचा मेरू व शौर्याचा हिमाचल असे जे शिवाजी महाराज ते हजर होते. त्यांनीं आपल्या वीरश्रीयुक्त भाषणानें व शूर कृत्यांनीं आपल्या लोकांच्या खचलेल्या अंतःकरणांस टेंका दिला व त्यांच्यांत धैर्य व उत्साह जागृत केला. किल्ला लढविण्यांत कांहींही अर्थ नाहीं, तो सोडून जाणें हा सगळ्यांत उत्तम मार्ग, अशी शिवबांच्या मनाची खात्री झाल्यावर त्यांनीं तो बेत आपल्या लोकांस कळविला व तो त्यांनाही पसंत पडला.

एके दिवशीं ऐन मध्यरात्रीं महाराज आपल्याबरोबर एक निवडक मावळ्यांची टोळी घेऊन अंधारांतून शत्रूच्या चौक्या चुकवीत व कांपीत किल्ल्यावरून खालीं उतरले, व त्यांनीं थेट रांगणा किल्ल्याची वाट धरली. ज्याच्यासाठीं आपण ऋतुमानाकडे लक्ष न देतां एवढ्या निकडीनें वेढा देऊन बसलों आहों, तो आपल्या हातावर तुरी देऊन पार निघून गेला, ही खबर शिद्दी जोहारास बराच वेळ कळली नाहीं. परंतु ती लागतांच फाजल व शिद्दी जोहारचा मुलगा शिद्दी अजीज हे ताबडतोब घोडेस्वार घेऊन महाराजांच्या पाठलागावर निघाले. सकाळच्या आठ नऊ वाजेपर्यंत त्यांना महाराज मुळींच दिसले नाहींत. पण दहाच्या सुमारास रांगण्या जवळील पावन खिंडीजवळ ते त्यांना दिसले. आपल्या मावळे लोकांसह शिवाजी महाराजांस पळतांना पाहिल्याबरोबर फाजल व शिद्दी अजीज यांनीं आपले घोडे भरवेगानें, वायुवेगानें दवडले. पुढें महाराज व त्यांचे लोक, आणि मागें ते विजापुरी सरदार व त्यांचे घोडेस्वार, अशा रीतीनें ती एक शर्यतच लागली होती. प्रत्येकजण आपली अगदीं शर्थ करीत होता. महाराज व त्यांच्याबरोबर असलेले लोक आपणांमधील व आपल्या शत्रूमधील अंतर वाढविण्याकरतां पराकाष्ठा

करीत होते, तर विजापुरी सैन्य तें अंतर कमी करण्याकरतां आपल्या जिवाकडे पहात नव्हतें. अशा रीतीनें ही पळापळी व धांवाधांवी सारखी चालू होती. होतां होतां दोन सैन्यांतील अंतर कमी होत चाललें. दर क्षणास विजापुरी सैन्य महाराजांच्या जवळ येत चाललें. त्यानें बरेंच अंतर तोडलें. तें आतां अगदींच जवळ येऊन ठेपलें. तें क्षणार्धांत महाराजांस व त्यांच्या लोकांस घेरून त्यांची एकसहा कत्तल करणार, तोंच मराठ्यांच्या त्या चिमुकल्या सैन्यानें ती खिंड ओलांडली व त्यांच्या तोंडावर एकदम आनंदाची छटा दिसूं लागली. निमिषमात्रांत मराठे पठ्ठ्यांनीं आपलीं तोंड शत्रूकडे वळवून आपले भाले त्या दिशेकडे रोंखिले.

महाराजांचा आनंद तर गगनांत मावेनासा झाला. आज आपल्या सुदैवानें आपणास अचाट पराक्रम व अलौकिक करामत करण्यास संधि मिळाली म्हणून त्यांच्या तोंडावर दिव्य तेज झळकूं लागलें, व त्यांच्या सर्वांगाभोंवतीं एक प्रकारची विलक्षण प्रभा फांकली. ते आनंदाच्या भरांत खिंडीचें रक्षण करण्याकरितां आपल्या सैन्याची व्यवस्था करूं लागले. इतक्यांत यवन तर अगदीं अंगाशीं येऊन भिडले! 'दीन' 'दीन' अशी रणगर्जना करून आतां ती यवनांची प्रचंड सेना खिंडींतील मराठ्यांच्या टोळीवर तुटून पडणार, तोंच मराठ्यांकडील बाजी प्रभू नांवाचा सरदार महाराजांजवळ गेला व त्यानें बोलण्यास सुरुवात केली. "महाराज, शत्रूकडील सैन्य अफाट व आपल्याजवळ तर अतिशयच थोडे लोक आहेत. शत्रूच्या खवळलेल्या सेनासमुद्रापुढें आज या मराठे वीरांचा फार वेळ टिकाव लागेल असें वाटत नाहीं. आज ही खिंड शत्रूच्या ताब्यांत जाणारच. तेव्हां महाराजांनीं येथें राहून आपला जीव धोक्यांत घालूं नये. महाराजांना उपदेश करण्याचा माझा अधिकार नाहीं व तशी

माझ्या अंगीं योग्यताही नाहीं. महाराजांना सर्व कांहीं समजत आहेच. तरीपण महाराजांनीं येथें राहूं नये अशी या सेवकाची मनापासून इच्छा आहे. येथें राहून जर महाराजांवर बरावाईट प्रसंग आला, तर आज मराठ्यांना कोणीही वाली उरणार नाहीं, व महाराष्ट्राचा पाठीराखा नाहींसा होईल. महाराजांनीं येथून त्या पलीकडच्या रांगण्या किल्ल्यावर जाऊन ह्या खिंडीचें रक्षण करण्याचें काम माझ्यावर सोंपवून द्यावें, अशी महाराजांच्या चरणांजवळ या नम्र सेवकाची विनंति आहे. माझ्या भाग्यानें महाराजांच्या इतके दिवस खाल्लेल्या अन्नाचें चीज करून दाखविण्याचा जो प्रसंग आला आहे, त्याला महाराजांची अनुज्ञा असावी. महाराजांच्या सेवेंत आज हा देह खिंडींत पडावा अशी माझी इच्छा आहे; व महाराज या गोष्टीला आपली संमति देतील, अशी मला आशा आहे."

बाजी प्रभूचें तें आवेशयुक्त व स्वामिनिष्ठापूरित भाषण ऐकल्यावर इतका वेळ चित्राप्रमाणें तटस्थ असलेल्या मराठे गड्यांनीं महाराजांचा जयजयकार करून बाजी प्रभूच्या भाषणास अनुमोदन दिलें. आपल्या हाताखालील लोकांची ती अढळ प्रीति व अलोट स्वामिभक्ति पाहून शिवाजीमहाराजांचा कंठ दाटून आला. त्यांच्या नेत्रांवाटें प्रेमाश्रू वाहूं लागले. त्यांचे ओंठ थरथर कांपूं लागले. त्यांच्या हृदयांत दुःख व आनंद या दोन विकारांचें एकसमयावच्छेदेंकरून काहूर उसळलेलें आहे, असें त्यांच्या मुखचर्येवरून स्पष्ट दिसूं लागलें. आपल्या लोकांचें आपल्याविषयींचें प्रेम व पूज्यभाव पाहून त्यांना अतिशय आनंद झाला खरा; पण ते आज त्या खिंडीचें रक्षण आपणांस करून देत नाहींत, निदान त्यांची तशी इच्छा तरी नाहीं, हें पाहून त्यांना दुःखही झालें. आनंद व दुःख ह्या मनोवृत्ति त्यांच्या हृदयांत

एकसारख्या उचंबळत असल्यामुळें त्यांनीं क्षणभर त्यांच्या विचार-शक्तीवर पगडा बसविला, व ते गोंधळल्यासारखे झाले. इतक्यांत बाजी प्रभूनें व मराठे गड्यांनीं महाराजांस लवकरच तेथून निघून रांगणा किल्ल्याकडे जाण्याविषयीं निकड केली. कारण, खिंडीच्या तोंडाशीं शत्रूच्या सैन्याचा समुद्र आतां फारच खवळला होता, आणि त्याच्या प्रचंड व पर्वतप्राय लाटांपुढें ती मावळ्यांची टोळी केव्हां साफ धुवून रसातळास जाईल याचा कांहीं नेम नव्हता. यवनांची ती अफाट सेना पाहून तर महाराजांच्या बाहूंस विल-क्षण स्फुरण चढलें! त्यांच्या अंगांत वीरश्री पूर्णतेनें संचारली. त्यांचे डोळे खदिरांगारासारखे लाल झाले. यवनांचे कंठनाळ चिरून त्यांच्या रक्ताचें आकंठ प्राशन केव्हां करतों, असें त्यांस होऊन गेलें. ते आतां खिंडीच्या तोंडाशीं जाऊन उभे राहणार, तोंच बाजी प्रभूनें त्यांना पुनः एकदां तेथून जाण्या-विषयीं विनंती केली. ती विनंती ऐकतांच महाराज भानावर आले. त्यांच्या विचारशक्तीचा त्यांच्या मनोवृत्तींवर अंमल बसला. व या खिंडींत आपल्या टोळीसमवेत शत्रूशीं झुंजून रणांगणावर आपला देह ठेवण्यांत परिणामीं हित होणार नाहीं. असा विचार करून त्यांनीं बाजी प्रभूस आपल्याजवळ बोलाविलें, त्यास आपला हेतु कळविला व त्याच्या कानांत कांहींसें कुजबुजून त्यांनीं रांगणा किल्ल्याची वाट धरली. महाराजांस रांगण्याची वाट चालतांना पाहून बाजी प्रभूला अत्यंत हर्ष झाला, व तो लागलीच खिंडीच्या तोंडाशीं येऊन उभा राहिला. इकडे शिवाजी रांगण्या-कडे पळत आहे असें यवनांस समजल्यावर त्यांना दुप्पट जोर आला, व खिंडींतील मावळ्यांना चीत करून त्यांना केव्हां गांठतों, असें त्यांस होऊन गेलें.

खरोखरच त्या वेळेस रांगणा किल्ल्याकडे शिवाजीमहाराज पळत नसून मराठ्यांची स्वतंत्रतादेवीच पळत होती, असें म्हटलें पाहिजे. मराठ्यांची राज्यलक्ष्मी यवनांच्या जनानखान्यांत खेंचली जाते कीं रांगण्याचा आश्रय करून कालांतरानें सर्व महाराष्ट्रभर अनिरुद्ध संचार करते, हाच त्या वेळेस मुख्य प्रश्न होता. परंतु तिच्यासाठीं स्वतःचा प्राण वेंचण्यास सिद्ध असलेल्या बाजी प्रभूसारखा तिचा पाठीराखा असल्यावर ती जाणार कां व कशी ? तिला नेण्यास कोण समर्थ होता ? यवनी घोडेस्वारांनीं खिंडींतील मराठ्यांवर जोराचा हल्ला केला, आणि एकदांचें लढाईचें तोंड लागलें. उभयपक्षांमध्यें धुमश्चक्री सुरू झाली. 'दीन' 'दीन' व 'हर हर महादेव' या रणगर्जनांनीं दाही दिशा दणाणून गेल्या. सर्वत्र मारामारी, कांपाकांपी व छाटाछाटी सुरू झाली. यवनांच्या समशेरी व मराठ्यांचे भाले एकमेकांवर घांसून त्यांतून ठिणग्या निघूं लागल्या. हजारों लोकांचीं शिरकमलें हवेंत चेंडूप्रमाणें उडूं लागलीं ! स्वामिभक्तीच्या वारुणीनें पुरा झिंगलेला बाजी प्रभू यवनांस प्रत्यक्ष कर्दनकाळासारखा दिसूं लागला. त्यानें आपल्या शूर व जवानमर्द मावळ्यांशीं शत्रूवर असा निकराचा मारा केला कीं, ते त्यांच्या तीक्ष्ण भाल्यांपुढें भुसाप्रमाणें उडून गेले व त्यांची अगदीं दाणादाण झाली. इतक्यांत विजापुरकरांचें पायदळ तेथें येऊन पोहोंचलें. पायदळाची कुमक मिळाल्यावर पराजित झालेल्या घोडेस्वारांना पुनः दम आला व त्यांनीं खिंडींतील लोकांना जागच्या जागीं गारद करून टाकण्याचा दृढ निश्चय केला. शत्रूकडील सैन्याला अशी आयत्या वेळीं मदत मिळालेली पाहूनही तो धाराशूर व कजागदार बाजी प्रभू रतिभरही डगमगला नाहीं किंवा ढळला नाहीं. उलट त्याचें धैर्य व शौर्य द्विगुणित झालें. त्याच्या अंगांत दैवी वीरश्रीचा

संचार होऊन तो प्रत्यक्ष ‘ दिनप्रभू ’सारखा तळपूं लागला. पायदळाची कुमक मिळाल्यावर विजापुरकरांच्या त्या अफाट सैन्यानें मावळ्यांवर दोन हल्ले केले. पण दोन्हीही हल्ले बाजीनें मोठ्या शौर्यानें मागें हटविले. हल्ले मागें हटवितांना दुपार झाली व भगवान् सूर्यनारायण आकाशमध्यांत आरूढ होऊन आपल्या तेजःपुंज नेत्रांनीं मराठ्यांच्या अद्वितीय पराक्रमाचें कौतुक अवलोकन करूं लागला.

शेवटल्या हल्ल्यांत यवनांचा धुव्वा उडवून दिल्यावर बाजी प्रभूनें रांगण्याकडे दृष्टि फेंकली, व त्याचा चेहरा एकदम चिंताग्रस्त झाला. क्षणार्धापूर्वीं वीरश्रीच्या अपूर्व तेजानें चकाकणाऱ्या बाजीच्या चेहऱ्यांत हा फरक एकाएकीं कशानें पडला बरें ? शत्रूंच्या सेनेची दाणादाण केल्याबद्दल त्याचा चेहरा सानंद अभिमानानें उल्हसित दिसण्याऐवजीं तो असा म्लान काय म्हणून झाला असावा ? त्याच्या हाताखालील मावळे आतां कच खाऊं लागले काय ? ते शत्रूवर तुटून पडण्यास मागें पुढें पाहूं लागले काय ? छेः, तशांतला मुळींच प्रकार नव्हता. समरभूमीवर शत्रूची भीति बाळगणें किंवा मरण्याची पर्वा करणें हें सतराव्या शतकांतील मराठ्यांचें ब्रीदच नव्हतें. त्याचा चेहरा चिंताग्रस्त होण्याचें कारण निराळेंच होतें. शिवाजीमहाराज रांगण्यावर सुखरूप पोहोंचल्याबद्दलची सांकेतिक खूण त्याच्या दृष्टीस पडली नाहीं म्हणूनच त्याचा चेहरा इतका फिक्का पडलेला दिसत होता. तो रांगण्याकडे एकसारखा टक लावून बसला. दर क्षणास त्याची चिंता वाढूं लागली. त्याला कांहींही सुचेनासें झालें. तो विचारांत गढून गेला. इतक्यांत फाजलखान ताज्या दमाची टोळी घेऊन त्याच्यावर चाल करून आला. त्याबरोबर तो चित्त्याप्रमाणें खवळून शत्रूच्या अंगावर तुटून पडला. यापूर्वी जरी त्याचे बरेच

लोंक रणांगणीं पडले होते, तरी राहिलेल्या लोकांनिशीं तो मोठ्या आवेशानें लढूं लागला. दोन्ही पक्षांकडील लोकांनीं लढण्याची अगदीं कमाल केली. यवनांनीं मराठ्यांचा खरपूस समाचार घेतला, तर बाजी प्रभु यवनांचा सप्पा उडवीत व मधून मधून रांगण्याकडे दृष्टि फेंकीत थेट शत्रूच्या सैन्याशीं जाऊन भिडला. त्याच्या भाल्याच्या तीक्ष्ण टोंकानें व पट्टयाच्या सफाईदार फेंकीनें शत्रूकडील हजारों लोकांस त्या दिवशीं यमसदनास पाठविलें. अशा रीतीनें कृतांताप्रमाणें शत्रूचा नाश करीत असतां तो गोळी लागून जमिनीवर घायाळ होऊन पडला. आपला मोहरा पडला असें मराठ्यांनीं पाहिल्यावर त्यांचा जरा धीर सुटला व ते मागें सरूं लागले. मराठ्यांच्या नांवाला व ब्रीदाला कलंक लावणारें हें त्यांचें कृत्य पाहून बाजीच्या अंगाचा तिळपापड होऊन त्यानें आपल्या लोकांची निर्भर्त्सना केली. त्याचे ते निंदाव्यंजक शब्द मराठ्यांच्या हृदयांत शल्याप्रमाणें टोंचले व ते अतिशय निकरानें लढूं लागले. यवनांची व मराठ्यांची अशी खडाजंगी चालली असतांना बाजीचें लक्ष रांगणा किल्ल्याकडे सारखें लागलें होतें, व तो एक विवक्षित आवाज ऐकण्याचा प्रयत्न करीत होता. असा तो आसन्नमरण वीर भूमातेच्या मांडीवर पडला असतां त्याला रांगण्यावर कांहींही दिसलें नाहीं व त्याला पाहिजे होता तो आवाज ऐकूंही आला नाहीं. प्रतिक्षणीं त्याचा जीव जास्त जास्त व्याकूळ होत चालला. त्याचे डोळे पाण्यानें डबडबले. त्यानें दीर्घ उसासे टाकले. तो आतां शेवटचे डोळे मिटणार तोंच त्याला तो विवक्षित आवाज ऐकूं आल्यासारखा भास झाला. म्हणून डोळे उघडून पाहतो तों त्याला रांगण्यावर ज्वाला दृष्टीस पडल्या व तोफेचे आवाज ऐकूं आले. महाराज रांगण्यावर सुखरूप पोहोंचल्याच्या सूचक अशा त्या ज्वाला पाहिल्यावर व तोफा

ऐकिल्यावर त्याला अत्यंत समाधान वाटलें, व मी "आपली कामगिरी बजावली" असे उद्गार काढून त्यानें तत्काळ प्राण सोडला.

बाजी प्रभु गतप्राण झाला ही बातमी लागतांच कांहीं मावळ्यांनीं त्याचें प्रेत शत्रूच्या हातीं लागूं न देतां मोठ्या शिताफीनें तें किल्ल्यावर महाराजांकडे पोंचतें केलें. बाजी प्रभूचे तें मृत शरीर पाहिल्याबरोबर शिवबांच्या मनाची काय स्थिति झाली असेल याचें वर्णन करणं अगदीं अशक्य आहे; त्याची वाचकांनीं कल्पनाच केली पाहिजे. अशा रीतीनें तो पावनखिंडीचा रणशूर वीर पतन पावला व आपला प्राण खर्ची घालून त्यानें शिवाजी-महाराजांचा—महाराष्ट्रभूच्या सौभाग्यतिलकाचा—बचाव केला. शंगणयाच्या खिंडींत बाजी प्रभूनें केलल्या या अद्वितीय पराक्रमाला मार नाहीं व जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. महाराष्ट्राच्या इतिहासपटावर त्यानें आपल्या रक्तानें आपलें नांव लिहून ठेविलें आहे; व जोंपर्यंत या पृथ्वीच्या पाठीवर एकतरी अस्सल बीजाचा मराठा जिवंत राहील, तोंपर्यंत तें नांव पुसलें जाणार नाहीं किंवा धुतलें जाणार नाहीं. बाजी! शिवाजी-महाराजांसाठीं स्वतःच्या जीवितावर तिलांजलि सोडून तूं खरोखरच अखिल महाराष्ट्रावर उपकाराचें ओझें करून ठेविलें आहेस. शत्रूच्या असंख्य सेनेला मावळ्यांच्या अल्पशा टोळीनिशीं तोंड देऊन तूंच मराठ्याचें वीर्य व तेज प्रगट केलेंस. "तेजस्विनः सुखमसूनपि संत्यजन्ति। सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम्।" या वचनाची सार्थकता तूंच करून दाखविलीस. जगाला खऱ्या राजनिष्ठेचा धडा तूंच शिकविलास. खरी देशसेवा तूंच केलीस. आपल्या हाडामांसानें व रक्तानें तूंच मराठी राज्याची टोलेजंग इमारत दृढ व भरभक्कम केलीस. तूंच महाराष्ट्रधर्म जागविलास.

तूंच अक्षय्य व स्वर्गीय सुखांचा ठेवा कमविलास. तुझ्यासारखे धर्मवेडानें पछाडलेले गाजी व देशवेडानें बहकलेले बाजी जर पुन्हा या आर्यभूत निपजूं लागतील, तर तिला दास्यत्वरूपी रौरव नरकांत कुजत पडावें लागेल काय ?

# रत्न तिसरें.

# मुरार बाजी.

On, on, if needed, freely bleed;
For, a patriot's blood is freedom's seed.

( संकटांना न जुमानतां धैर्यानें पुढें पाऊल टाक व जरूर पडल्यास देहार्पण करण्यास सिद्ध हो; कारण कीं, देशभक्ताचें रक्त म्हणजे स्वातंत्र्याचें बीजच होय.)

मनुष्यास काय अगर राष्ट्रास काय, उन्नतावस्था किंवा विपदवस्था केव्हां व कशी प्राप्त होईल, ह्याचा कांहीं नेम नाहीं. आधिभौतिक वैभवाच्या मदानें धुंद होऊन आज ज्या राष्ट्रांना स्वर्ग दोन बोटेंच उरल्यासारखा झाला आहे, त्यांचा काळाच्या वज्रप्राय तडाख्यापुढें केव्हां चक्काचूर उडून जाईल, हें आजच निश्चयानें सांगतां यावयाचें नाहीं. पण " **नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण** " ह्या न्यायानें ती केव्हांना केव्हां तरी धुळीस मिळून जाऊन नामशेष होणार हें मात्र खास ! प्राचीन इतिहासाचें आपण जरी नुसतें वरवर अवलोकन केलें, तरी असें एक महत्त्वाचें तत्त्व आपणांस दृग्गोचर झाल्यावांचून राहत नाहीं कीं, अमकें एखादें राष्ट्र वैभवाच्या उच्च शिखरावर जाऊन तें आजपावेतों त्या स्पृहणीय जागेवर बिलगून बसलेलें आहे, अशांतली मुळींच गोष्ट नाहीं. प्राचीन काळीं अतिशय नांवाजलेल्या राष्ट्रांची काळानें केव्हांच विल्हेवाट लावून टाकिलेली आहे. मॅसिडोनिया, बॅबिलॉन इत्यादि राष्ट्रांचा कांहीं तरी मागमूस राहिलेला आहे काय ? हरएक सुधारणेचें माहेरघर म्हणून

प्रख्यात असलेलें ग्रीक राष्ट्र काळाच्या प्रचंड उदरांत लुप्तप्राय झालेलें नाहीं काय ? ‘ जगज्जेता ’ ही अमूल्य पदवी संपादण्यासाठीं मनगटाच्या जोरावर तत्कालिन राष्ट्रांना पादाक्रांत करणाऱ्या मूठभर रोमन लोकांचा आज एकतरी अस्सल बीजाचा वंशज पाहूं गेल्यास, गगनांत विहार करणाऱ्या रजनीनाथाला हातांत धरून भूतलावर आणण्याइतकेंच आपल्या प्रयत्नाला यश येईल. ज्या भरतभूमींत एके काळीं लक्ष्मी, सरस्वती व विजयश्री सुखानें मनसोक्त विहार करीत होत्या, त्याच आपल्या आर्यभूमध्यें दारिद्र्य, अज्ञान आणि कमकुवतपणा यांनीं जसें काय कायमचेंच ठाणें दिल्यासारखें नाहीं का दिसत ? पण फार लांब कशाला ? अवघ्या शेंदोनशें वर्षांपूर्वी ज्या शूर मराठे पठ्ठयांचा भाला सगळ्या हिंदुस्थानभर थयथय नाचून आपल्याला सार्वभौमपदत्वाची जोड करून घेतो कीं काय अशीं स्पष्ट चिन्हें दिसत होतीं, त्याच शूर वीरांच्या आम्ही अस्सल वंशजांनीं एवढ्याशा अवधींत अगदीं नादान व निःसत्व होऊन, अडीच आणे साहेबाच्या देखील पायाची धूळ चाटण्याइतकें निर्लज्ज, निरभिमानी व बेवकूब बनावें, व एकंदरींत आजमितीस “ **हरेरद्य द्वारे शिव शिव शिवानां कलकलः** ” अशी सार्वत्रिक स्थिति असावी, हें नवल नाहीं काय ? अथवा नवल तें कसलें ? हा काळाचा महिमा आहे; ही जगाची रहाटी आहे; दैवाच्या विचित्र खेळांतील हा एक डाव आहे !

जन्म आहे तेथें मृत्यु हा ठेवलेलाच. उत्पत्तीच्या मागोमाग लय हा असावयाचाच. ह्यालाच स्पेन्सरनें एके ठिकाणीं लिहिल्याप्रमाणें “ विश्वाची उत्पत्तिलयात्मक स्थिति ” असें म्हणतात. उत्पत्ति आहे तेथें लय आहेच, व जननामागून मरण हें असावयाचेंच, हें जसें सत्य आहे, तसेंच लयामागून उत्पत्ति,

मरणापासून जनन असतें, हेंही त्याबरोबरच खरें आहे. म्हणजे उत्पत्ति आणि लय व लय आणि उत्पत्ति अशा रीतीनें विश्वाचें रहाटगाडगें फिरत आहे; व ह्या त्रिकालाबाधित तत्त्वाला एखादाही अपवाद सांपडणें ही मनुष्याच्या संकुचित शक्तीच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. ह्या न्यायानें आज जीं राष्ट्रें दारिद्र्य, गुलामगिरी व अज्ञान यांच्या अंधारमय व दुर्गंधियुक्त गर्तेंत कुजत पडलेलीं आहेत, तीं कालांतरानें ऐश्वर्याच्या उन्नतम शिखरावर जाऊन ज्ञान, संपत्ति व स्वातंत्र्य यांचा उपभोग घेतील, यांत तिलप्रायही संदेह नाहीं. आज ज्या राष्ट्रांचे डोळे ऐहिक वैभवानें व ऐश्वर्यानें उपरांढलेले आहेत, तीं काळाच्या तीव्र आघातांनीं सकाळच्या धुक्याप्रमाणें पार हवेंत विरघळून जाऊन केव्हां तरी विस्मृतिपथाला जाऊन पोहोंचणारच! मग त्यांनीं एवढा गर्व तो कशाला वाहायाला पाहिजे! व एवढा उद्दामपणा दाखविण्यांत अर्थ तो कोणता?

जर उन्नतीमागें अधोगति व अधोगतीमागें उन्नति ही असायाचीच, तर मग अधोगतीच्या कोंदट व मारक हवेंत कुजत पडलेले आम्ही हिंदुस्थानवासी लोक कालेंकरून स्वतंत्रतेच्या शुद्ध व पोषक हवेंत विहार करणार, हें ठाम ठरल्यासारखेंच दिसत आहे. तरीपण स्वतंत्रता देवीच्या पवित्र आवारांत आपला लवकर प्रवेश करून घेण्याकरितां आपल्याला कांहींतरी प्रयत्न करावयासच पाहिजे. अमकी एखादी गोष्ट अनायासें व दैवयोगानें पदरांत येऊन पडणार म्हणून चोहोंचा आंकडा टोकून खुशाल बिनघोर मनानें कालक्रमणा करीत बसणें हें खास माणुसकीचें लक्षण नाहीं. तर ती गोष्ट आपल्याला होतां होईतों लवकर प्राप्त करून घेण्याकरितां नुसता उद्योग नव्हे, तर दीर्घोद्योग करणें ह्यांतच जीविताचें खरें रहस्य आहे. उद्योगी पुरुष-

सिंहाजवळच येऊन स्वतंत्रता चिरकाल वास करते; अंग मोडून मेहनत न करणाऱ्या एखाद्या बशा नवरदेवाच्या गळ्यांत ती कधींही माळ घालीत नाहीं; व यदाकदाचित् तिनें त्याला वरिलेंच, तरी अल्पावधींतच त्या निरुद्योगी मनुष्याचा तिला अगदीं वीट येऊन ती त्याला झिडकारून पार निघून जाते. एकंदरींत, अंतिम हेतु साध्य करून घेण्याकरितां आपल्याला हाडाचीं काडें करावयास पाहिजेत. नुसता दैवावर हवाला ठेऊन स्वस्थ घोरत पडलेल्या मनुष्यास किंवा राष्ट्रास सुखाचा असा एकही दिवस मिळणार नाहीं. तेंच उद्योग केल्यास, श्रम घेतल्यास व कष्ट सोसल्यास नुसतें सुखच काय, पण अखिल जगाचें स्वामित्व देखील त्यास प्राप्त होईल.

इंग्रजी राज्याच्या छत्राखालीं स्वराज्याचा उपभोग घेण्याकरितां आपण मेहनत करीत आहोंत व कालांतरानें ती मेहनत फलप्रद होईल, असें मानण्यास कोणत्याही प्रकारची हरकत दिसत नाहीं. तरीपण ती जितक्या नेटानें व हिंमतीनें व्हावयास पाहिजे, तितक्या नेटानें व हिंमतीनें ती आजमित्तीस आपल्या हातून होत नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. राष्ट्रमालिकेंत हिंदुस्थानची प्रमुखत्वानें गणना व्हावी अशी आपली मनापासून इच्छा असल्यास आपण हरएक बाबतींत अटोकाट श्रम करावयास पाहिजेत. व्यापार वाढविला पाहिजे, धार्मिक सुधारणा केली पाहिजे, लोकांच्या नीतिमत्तेची इमारत भरभक्कम पायावर उभारली पाहिजे, व त्याप्रमाणेंच लोकांच्या मनांत स्वदेशाभिमानाचें वारें बाणून टाकण्याकरितां ऐतिहासिक जागृतिही करावयास पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं कसकशा लढाया मारल्या, राज्याची स्थापना कोणत्या उदात्त तत्त्वांवर केली, राजकारणपटुत्वानें आपल्या समकालीन मुत्सद्यांच्या कुटिल राजनीतीचा

रोख त्यांनीं कोणत्या शिताफीनें ध्यानांत आणून त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेविलें, अशा एक ना दोन हजारों गोष्टींचें अध्ययन आपण साल्हाद व साभिमान चित्तानें केलें पाहिजे; तरच आपल्या इतर प्रयत्नांना दुजोरा मिळून आपला इष्ट हेतु साध्य होईल. एवढेंच नव्हें, तर आपल्या अंतःकरणावर सांचलेलें नादान-पणाचें व कमकुवतीचें कीट नाहींसें होऊन, आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या तोडीचे पराक्रम आपल्याही हातून होतील. हें सगळें खरें, पण ही जागरूकता, ही मनाची उचल, उत्पन्न होणार केव्हां? तर जेव्हां आपल्या पूर्वजांनीं केलेल्या शूर कृत्यांची व अचाट पराक्रमाची आमच्या देशबांधवांच्या मनांत बालंबाल खात्री होईल तेव्हांच! पण आज हिंदुस्थानांत असे हजारों हरीचे लाल सांपडतील कीं, ज्यांना त्यांच्या पूर्वजांनीं केलेल्या अलौकिक कृत्यांची केवळ स्मृति सुद्धां नाहीं; एवढेंच काय, पण ज्यांचा कल असा झाला आहेसा दिसतो कीं, हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे निव्वळ गुलामगिरीचा इतिहास, त्यांत वर्णन करण्याजोगें व साभिमान मनानें ध्यानांत ठेवण्याजोगें कांहींचें सुद्धां नाहीं. पण असल्या पढतमूर्खांना आम्ही एवढेंच सुचवितों कीं, त्यांनीं निदान महाराष्ट्राचा इतिहास तरी एकदां मनःपूर्वक वाचावा, आणि जर तो अद्भुत व अलौकिक कृत्यांनीं ओथंबलेला असा त्यांच्या दृष्टीस पडला नाहीं, तर आपल्या कमनशिबामुळें ईश्वरानें आप-ल्यास दिलेल्या दृष्टिमांद्याबद्दल व बुद्धिमांद्याबद्दल स्वतःची कींव करावी. आमची तर अशी पक्की खात्री आहे कीं, क्षणोक्षणीं दृष्टीस पडणारीं मर्दुमकीचीं हजारों रम्य स्थळें असलेल्या मरा-ठ्यांच्या इतिहासाच्या तोडीचा दुसरा इतिहास सांपडणें फार मुष्किलीचें जाईल. शौर्याच्या, साहसाच्या किंवा तडफीच्या कृत्यांचीं वर्णनें वाचून मनांत स्वाभिमानाची व स्वदेशाभिमानाची

काट उसळण्याकरितां आपणांस दुसऱ्या देशांच्या इतिहासाकडे पाहण्याची मुळींच जरूरी नाहीं. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता एडमंड बर्क यानें एके ठिकाणीं आपल्या देशबांधवांस उद्देशून जें म्हटलें आहे कीं, " We want no foreign example to rekindle in us the flame of liberty; the example of our own countrymen is abundantly sufficient to maintain the spirit of freedom in its full vigour." ( स्वातंत्र्याची ज्योत प्रदीप्त करण्यास आम्हांस परकीयांच्या उदाहरणांची गरज नाहीं. स्वातंत्र्यवृत्ति पूर्णपणें जागृत ठेवण्यास आमच्याच पूर्वजांचीं उदाहरणें बस्स आहेत. ) त्याचप्रमाणें आमचेंही मत आहे. असो.

शिवाजीचा तो काळ म्हणजे मराठ्यांच्या स्वातंत्र्यरवीचा उषःकाल! अर्थात् प्रभातकाळच्या कोंवळ्या व सुवर्णमय किरणांप्रमाणें मनाची उल्हसित वृत्ति करणारा असा होता. ज्याप्रमाणें दिनमणीच्या माध्यान्हकाळच्या तेजोमय किरणांपेक्षां प्रभातकालचे आरक्त व बालकिरण मनांत जास्त आनंद, उल्हास व उमेद उत्पन्न करतात, त्याचप्रमाणें शिवाजीमहाराजांच्या कारकिर्दीच्या इतिहासाचें अध्ययन केल्यावर वाचणाराच्या मनांत कितीतरी सुखकर विचारांचें एकच काहूर उसळून जाऊन त्यांची त्याच्याशीं तादात्म्यवृत्ति होऊन जाते? आणि त्यांनीं व त्यांच्या कट्टया चेल्यांनीं केलेल्या अनुपमेय पराक्रमाचें वर्णन वाचल्यावर मन स्वदेशाभिमानाच्या सागरांत यथेच्छ पोहूं लागतें! तोरणा किल्ला काबीज करून स्वराज्याचें तोरण बांधल्यापासून १६६२ पर्यंत शिवाजीमहाराजांचे सर्व प्रयत्न विजापूरकरांचा नायनाट करून टाकण्याविषयींचे होते. अगदीं दारांत असलेल्या शत्रूला नामशेष केल्याशिवाय स्वराज्याचा आणि स्वधर्मस्थापनेचा पाया मजबूत होणार नाहीं, आणि हिंदु धर्माचा व हिंदु लोकांचा कट्टा

दुस्मान् जो औरंगजेब याच्याशीं दोन हात करून त्याचीं हशी नरम करितां येणार नाहींत, म्हणून अगदीं पहिल्यापासूनच शिवाजीमहाराज विजापुरशाही हाणून पाडण्याच्या तयारीस लागले व १६५२ पासून तों १६६२ पर्यंत विजापूरकरांशीं झगडा करून अखेरीस त्यांनीं विजापुरशाही तर बहुतेक रसां-तळास नेऊन पोहोंचविली; आणि कल्याणपासून गोव्यापर्यंतचा सर्व देश आपल्या ताब्यांत आणला. आदिलशाही संपुष्टांत आणून जरा कोठें विश्रांति घेण्यास व राज्याचा पाया बळकट करण्यास फुरसत मिळते न मिळते तोंच, ज्या युद्धाच्या परिणामावर त्यांनीं इतक्या दिवस रचलेल्या स्वराज्याच्या इमारतीचें अस्तित्व अव-लंबून होतें, असे मोंगलांशीं युद्ध करण्याकरितां महाराजांना दंड ठोकून उभें राहणें भाग पडलें. अगोदरच औरंगजेबासारखा हाडाचा हिंदुधर्मद्वेष्टा, व त्यांतल्यात्यांत शिवाजीसारख्या आपल्या एका ‘ पुंड व गैररहा वागणुकीच्या ’ मांडलिक राजानें हिंदु-धर्माच्या व हिंदुपदपादशाहीच्या संस्थापनेसाठीं चालविलेला प्रयत्न आणि त्यांत त्याला येत चाललेलें यश; मग काय विचारतां ? राजेश्रींच्या अंगाचा अगदीं तिळपापड होऊन गेला. आगेंमागें हा काफीर राजा प्रबल व बलाढ्य होऊन आपल्याच राज्याचे लचके तोडण्यास कधींही मागेंपुढें पाहणार नाहीं, तेव्हां त्याची सत्ता रूढ झाली नाहीं तोंच त्याचा नाश करून त्यानें उभार-लेल्या हिंदुशाहीची इमारत जमिनदोस्त करण्याची वेळ हीच आहे असा विचार मनांत आणून बादशाहानें मराठ्यांशीं युद्ध करण्याचा निश्चय केला. उघडच आहे कीं, “ **परवृद्धिभिरा-हितव्यथः स्फुटनिर्भिन्नदुराशयोधमः** ” या नियमाप्रमाणें औरंगजेबासारख्या जातिवंत यवनाला मराठ्यांचा उत्कर्ष सहन तो कसा व्हावा ? नवीन स्थापित झालेल्या मराठी राज्याचा

पुरा बीमोड करण्याचा निश्चय केल्याबरोबर औरंगजेबानें १६६२ सालीं शिवाजीचा पाडाव करण्याकरितां दक्षिणेचा सुभेदार शाएस्तेखान यास निकर्डाचे हुकूम पाठविले व त्यांअन्वयें खान बरोबर मोठी फौज घेऊन पुण्यावर चाल करून आला. लवकरच यशवंतसिंग खानाच्या मदतीस म्हणून दक्षिणेंत आला. पहिल्या धडाक्यासरशीं खानानें चाकण किल्ला तर सर केला व त्याचा नीट बंदोबस्त केल्यावर खानसाहेब पुण्यास येऊन शिवाजी-महाराजांच्या वाड्यांत उतरले. ही बातमी सिंहगडावर महाराजांस कळतांच त्यांनीं रात्रीच्या वेळीं खानावर छापा घातला, व त्यांतून त्या बिचाऱ्याची पळतां पळतां जी कांहीं तिरपीट उडाली ती विचारूंच नये.

पहिल्या मोहिमेंतच अशी फट्फजिती झाल्यावर औरंगजेबानें शाएस्तेखानास दक्षिणेंतून उचलून बंगालचा सुभ्यावर पाटविलें व त्याच्या जागीं आपला मुलगा मुअज्जम याची दक्षिणेंत रवानगी केली. इकडे खानसाहेबांची अशी त्रेधा उडाल्यावर महाराजांनीं सुरत शहरावर चाल करून सहा दिवसपर्यंत तें लुटलें, व मुअज्जम याचीही डाळ शिजूं दिली नाहीं. आपण पाठविलेल्या सरदारांचा शिवाजीपुढें टिकाव लागत नाहीं हें पाहिल्यावर औरंगजेब फार चिंताक्रांत झाला, व शिवाजीस जेरीस आणण्याचा उपाय त्यास सुचेना. सरतेशेवटीं बादशहानें यशवंतसिंग व मुअज्जम यांस परत बोलावून, त्यांचे जागीं जयसिंग व दिल्लीरखान यांची योजना केली. हे दोघेही सरदार महान् पराक्रमी म्हणून नांवाजलेले होते. हे दोघे सरदार १६६५ च्या एप्रिल महिन्यांत आपल्या प्रचंड चमूसह पुण्यांत येऊन दाखल झाले, व मुळींच विलंब न करतां त्यांनीं मराठ्यांचा देश काबीज करण्यास आरंभ केला. त्या वेळीं पुरंदर व सिंहगड हे दोन किल्ले

पुणें प्रांताचीं नाकीं म्हणून फार प्रख्यात् होते. जर हे दोन किल्ले आपल्या हस्तगत झाले, तर सगळा पुणें प्रांत मिळाल्या-सारखा होऊन मराठी राज्याला बराच जबर धक्का बसण्याचा संभव आहे असा विचार करून, त्या दोन सरदारांनीं आपला मोर्चा त्या किल्ल्यांकडे वळविला व लागलीच दिल्लीरखानानें पुरंदरास वेढा देऊन जयसिंगानें सिंहगडाजवळ जाऊन तळ दिला. ह्या वेळेस शिवाजीमहाराज हे दक्षिण किनाऱ्याचे स्वारींत गुंतले असल्यामुळें, किल्ल्याचें संरक्षण करण्याचें काम दिल्लीर-खानानें मोठ्या नेटानें चालविलें व किल्ला लवकरच आपल्या हस्तगत होईल अशी त्याला आशा व उमेद वाटूं लागली. पण महाराजांच्या अस्सल चेल्यांपैकीं एक चेला त्या किल्ल्याचा संरक्षक असल्यामुळें त्याचा आशाभंग व्हावयाचा होता, हें त्या बिचाऱ्याला काय माहीत? "बाजी" पंचायतनापैकीं मुरार बाजी हा महाराजांच्या तालमींत कसलेला खंदा वीर! तो कां दिल्लीरखानासारख्या जनानी सरदाराला दाद देणार? मुळींच नाहीं. आपल्या अंगांत खेळत असलेल्या स्वदेशप्रीतीला व स्वामि-निष्ठेला कसोटीला लावण्याची सोन्यासारखी संधी आलेली पाहून तो मोठ्या आनंदानें किल्ला लढविण्याच्या व दिल्लीर-खानास चांगलाच हात दाखविण्याच्या तयारीस लागला. लाग-लीच आपल्याजवळ असलेल्या निवडक दोन हजार मावळे व हेटकरी लोकांना त्यानें किल्ला शिकस्तीनें लढविण्याविषयीं वीरश्रीचा उपदेश केला; मोंगल लोकांना दाणावैरण मिळूं नये अशी तजवीज केली; व त्यांचा दारूगोळा पेटवून दिला. दिल्लीरखानानेंही किल्ल्यासभोंवार मोर्चे बांधून तो सर करण्या-विषयीं जय्यत तयारी चालविली.

एकदांचें मराठे व मोंगल यांच्यामधील लढाईस तोंड लागलें. तोफांच्या व बंदुकीच्या आवाजांनीं व 'हरहर महादेव' व 'दीन' 'दीन' ह्या रणगर्जनांनीं दशदिशा दणाणून गेल्या, व आसपासच्या दऱ्याखोऱ्यांतून उद्भवणाऱ्या प्रतिध्वनींत "वीरांनों लढा, मरेपर्यंत लढा, मेलां तरी बेहेत्तर आहे; पण आज शिकस्तीनें लढून आपल्याला स्वर्गीय सुखाची जोड करून घ्या" असे प्रोत्साहनपूर्वक शब्द निघताहेत, असा भास होत होता. मराठ्यांनीं लढण्याची तर कमाल करून सोडली. मोंगलांनीं शिकस्त करून खालचा कोट स्वाधीन करून घेतला. तेव्हां मावळे लोक वरच्या कोटांत गेले व आपल्या छात्यांचा अभेद्य कोट करून ते लढूं लागले. खालचा कोट तर शत्रूच्या स्वाधीन झाला, आतां वरचा कोटही शत्रूच्या हस्तगत होण्याचा संभव आहे, असें पाहिल्याबरोबर त्या रणशूर जवानमर्दांनीं वरून मोंगल लोकांवर असा जोराचा भडिमार केला कीं, बहुतेक लोक भयग्रस्त होऊन सैरावैरा धांवूं लागले. मोंगल सैन्याची ही दैन्यावस्था पाहिल्यावर शत्रूचा धुव्वा उडवून स्वराज्याची प्रचंड इमारत जास्त बळकट व जोरदार करण्याची हीच उत्तम वेळ आहे असें वाटून तो पुरंदरचा रणधुरंधर मुरार बाजी स्वदेशासाठीं व स्वधर्मासाठीं गाजी होऊन मोंगलांचा पाठलाग करीत आणि त्यांच्या शरीरांचे पर्वतप्राय ढीग पाडीत थेट दिल्लीरखानाच्या तंबूपर्यंत येऊन थडकला. स्वदेशप्रीतीच्या वारुणीनें बहकलेला तो, त्याच्यापुढें कोण मायेचा पूत एक क्षणभर तरी दम धरणार ? दिल्लीरखानाच्या तंबूजवळ आल्यावर त्याची व खानाची चांगलीच जुंपली. दोघेही मोठ्या शौर्यानें व आवेशानें लढत होते. लढतां लढतां मुरार बाजीची ढाल तुटली, व क्षणमात्र त्याच्या मनास चटका बसला. आज अविंधांना नामशेष करून आपल्या उज्वल कीर्तीनें

प्रफुल्लित झालेला आपला चेहरा महाराजांना दाखवून महाराजांच्या तोंडून 'शाबास, धन्य आहेस मुरार बाजी' असे शब्द ऐकण्याचा सुखकर प्रसंग येत नाहीं म्हणून त्या शूर 'विंचव्याला' जरा वाईटही वाटलें. पण यत्किंचितही न डगमगतां एकीकडे शत्रूचा खरपूस समाचार घेत घेत त्यानें आपल्या कमरेचा शेला हातास गुंडाळला, व शत्रूचे वार हातावर झेलून तो कर्दनकाळाप्रमाणें मोंगलांची कत्तल करूं लागला. त्या झपाट्यांत खानानें सोडलेला बाण त्याला लागून त्याचें शीर उडालें व तो गतप्राण झाला! मुरार बाजीचें शीर तुटून पडल्यावर त्याच्या धडानें शेंकडों शत्रूंना यमसदनास पाठविलें, अशी आख्यायिका आहे. मराठ्यांनीं त्याचें शव मुसलमानांचे हातीं लागूं न देतां तें शिवाजीकडे पाठविलें. 'जीवित्व तृणवत् मानावें' हा समर्थांचा बिनमोल उपदेश मनांत पूर्णपणें बिंबून स्वदेश व स्वधर्म यांसाठीं धारातीर्थीं पतन पावलेल्या मुरार बाजीचें मृत शरीर पाहिल्यावर सहृदय शिवबांच्या मनाची काय स्थिति झाली असेल व त्यांना कितीतरी धन्यता वाटली असेल? मुरार बाजी पडला तरी वरचा किल्ला मोंगलांस मिळाला नाहीं; व अखेरीस किल्ला घेण्याचा नाद सोडून देऊन दिलेरखान वेढा उठवून चालता झाला. मुरार बाजी सारख्यांच्या अद्वितीय पराक्रमाचें वर्णन वाचल्यावर आमच्या वाचकांच्या मनांत आपल्या पूर्वजांविषयीं अभिमान व पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं, अशी आमची पक्की खात्री आहे.

## रत्न चवथें.

# भद्र नाईक.

Be just and fear not.
Let all the ends thou aimst at,
Be thy Country's, thy God's and Truth's!
Then if thou fallest, O Cromwell,
Thou fallest a blessed martyr.

( न्यायानें वाग म्हणजे मग तुला कशाचीही भीति वाळगावयास नको. देशाचा, सत्याचा व परमेश्वराचा जयजयकार होण्याविषयीं मनापुढें स्पष्ट उद्देश ठरून तो तडीस नेण्याकरितां सतत परिश्रम कर. आणि तें करीत असतां, कामवेळा, जरी तुझ्या पदरीं अपयश येऊन मृत्यु आला, तरी तुझी गणना वीरांच्या कोटींत निःसंशय होईल.)

वरील अवतरण एका अतिशय विख्यात् अशा इंग्लिश कवीच्या ग्रंथांतील आहे. त्यांत नमूद केलेले विचार इतके सत्य व उपयुक्त आहेत कीं, त्यांप्रमाणें हातून आचरण झाल्यास राजकीय दृष्ट्या अधोगतीस पावलेल्या कोणत्याही राष्ट्राची उन्नतावस्था आगेंमाग झाल्यावांचून राहणार नाहीं. मनुष्यप्राणी उत्क्रांतितत्त्वाचा अत्युच्च परिपाक होय! त्याची रचना अशाच रीतीनें झाली आहे कीं, निसर्गांतील प्रत्येक सचेतन प्राण्यावर त्याला आपली सत्ता गाजवितां यावी. इतर सर्व प्राण्यांप्रमाणें त्याच्या ठायीं कित्येक प्रवृत्ति आढळून येतात. पण त्या प्रवृत्तींना योग्य मर्यादेंत ठेवून त्यानें जगाला वरच्या पायरीस न्यावें व परमेश्वराचा हेतु थोड्या प्रमाणानें तरी साध्य करावा, असा परमेश्वरी संकेतच दिसतो. नाहींतर मनुष्यप्राण्याचें मन, बुद्धि, आत्मा वगैरे गोष्टींचें

प्रयोजनच रहात नाहीं. मनुष्याचा स्वार्थ साधण्याकडे साहाजिक ओढा असावा, यांत मुळींच वावगें नाहीं. कारण, विश्वाचें अस्तित्व तुलनात्मक दृष्ट्या शाश्वत करणारी व त्याला उन्नत स्वरूपाला पोहोंचविणारी एकच गोष्ट म्हटली म्हणजे ही स्वार्थी प्रवृत्ति होय! मनुष्यानें आपला स्वार्थ साधला पाहिजे व संसारही केला पाहिजे. साधुसंत कांहींही म्हणोत, पण जोंपर्यंत दुपारचे बारा वाजल्याचा ठोका पडला कीं, मनुष्याचे क्षुधेनें बारा वाजण्याची पाळी येत आहे, व बायकामुलांच्या प्रेममय सहवासानें मन आनंदिलें व रिझविलें जात आहे, तोंपर्यंत संसार हा असार आहे, मायेचा बाजार आहे, किंवा मोहाचा पसारा आहे, हें म्हणणें साधारण मनुष्याला कधींही पटणार नाहीं, व पटल्यास तें कृतींत कदापिही वठणार नाहीं. अमेरिकन कवि लॉंगफेलो म्हणतो त्याचप्रमाणें संसार सत्य आहे असेंच म्हटलें पाहिजे.

आपला व आपल्या पोराबाळांचा योगक्षेम उत्तम रीतीनें चालावा, याबद्दल प्रत्येकानें अवश्य प्रयत्न केला पाहिजे. पण हा प्रयत्न केल्यानंतर मनुष्याच्या कर्तव्याची सीमा संपली, असें मात्र म्हणतां येत नाहीं. बुद्धिहीन व उदात्त मनोविकारविरहित जनावरेंही आपला व आपल्या कच्चाबच्चांचा संसार करीत असतात; आणि मनुष्यप्राणी जर आपल्या कुटुंबापलीकडे नजर फेंकूं न लागला, तर त्याच्यांत व इतर प्राण्यांत अंतर तें कोणतें राहील? मनानें, बुद्धीनें व आत्म्यानें विशिष्ट असलेल्या मनुष्यप्राण्याला उत्पन्न करण्यांत विश्वकर्त्याचा खास इतका संकुचित हेतु नसला पाहिजे. तसा तो असता, तर खात्रीनें त्यानें मनुष्यप्राणी निर्माण करून प्राणिमात्रांच्या संख्येंत उगीच भर घातली नसती. स्वार्थ साधून किंबहुना प्रसंगानुसार स्वार्थावर पाणी सोडून मनुष्यानें इतर वरिष्ठ दर्जाचीं कर्तव्येंही केलीं पाहिजेत; या हेतूनेंच परमेश्वरानें

यां विश्वांत मनुष्यरूपी आपली प्रतिमा उत्पन्न केली आहे. कौटुंबिक कर्तव्यांपेक्षां हीं उच्च प्रतीचीं कर्तव्यें कोणतीं, याचें दिग्दर्शन कवीनें वरील अवतरणांत फारच उत्कृष्ट रीतीनें केलें आहे. तो म्हणतो कीं, मनुष्यानें राष्ट्रार्थ व परमार्थ साधण्यासाठीं, आणि सत्याचा व न्यायाचा विजय करण्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे, व तो करीत असतां जरी त्याला मरण आलें, तरी इहलोकीं त्याचा नांवलौकिक होऊन परलोकीं त्याला सद्गति मिळाल्यावांचून राहणार नाहीं. भगवंतांनीं देखील भगवद्गीतेच्या द्वारें जगाला असेंच उपदेशिलें आहे कीं, "**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदा च न।**" मनुष्य कर्माचा अधिकारी आहे, फलाचा नाहीं. उदात्त उद्देश डोळ्यांपुढें ठेवून तें साध्य करून घेण्याकरतां अश्रांत व अविरत श्रम करणें इतकेंच मनुष्याचें कर्तव्य होय. तें यशस्वी करावयाचें किंवा नाहीं, ही सर्वस्वीं परमेश्वरी इच्छेची व कृपेची गोष्ट होय. मी किंवा माझें कुटुंब एवढेंच माझ्या कर्तव्याचें क्षेत्र नसून, तें माझा देश, हें जग किंबहुना हें विश्व इतकें विस्तीर्ण आहे, व त्या देशाच्या, जगाच्या व विश्वाच्या प्रगतीच्या मार्गांत आडव्या येणाऱ्या अडचणींचा नाश करणें माझें आद्य व परम पावन कर्तव्य होय, अशी मनुष्याच्या अंगीं वृत्ति संचारून तो तिजप्रमाणें कृति करूं लागला, तरच तो आपल्या जीविताचें साफल्य व देहाची सार्थकता सिद्ध करून दाखविणार आहे. आपलें व आपल्या कुटुंबाचें पालनपोषण करून स्वस्थ बसणाऱ्या इसमाची योग्यता उकिरडा फुंकून गुजारा करणाऱ्या कोंबड्यापेक्षां जास्त आहे, असें म्हणतां येत नाहीं. तर ज्या देशांत व धर्मांत ईश्वरी संकेतानुरूप आपण जन्मास आलों आहोंत, त्या देशाला परवशतेच्या नरकांतून वर काढून स्वतंत्रतेच्या पोषक हवेंत नेण्याविषयीं, व त्या धर्माला

इतर धर्मरूपी राहूंच्या जबड्यांतून सोडविण्याविषयीं झटणारा इसमच " नर " होय, व अशा इसमालाच " मनुष्य " असें म्हणतां येईल! बाकी सर्वजण स्वार्थाच्या कूपांत लोळणारे निव्वळ मंडूक होत! स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं किंवा धर्मस्थापनेसाठीं केलेले सर्वच प्रयत्न यशस्वी होतात असें नाहीं. त्यांपैकीं पुष्कळसे प्रयत्न निष्फळ होऊन, ते करणाऱ्या इसमांना इहलोकीं अत्यंत हाल सोसावे लागतात. तरीपण त्यांना परलोकींही यातना भोगाव्या लागतात, असें समजणें चुकीचें होय. यशस्वी किंवा अयशस्वी प्रयत्नांचे भिन्नभिन्न परिणाम या लोकीं घडून आले, तर परलोकीं दोन्ही प्रकारांचे प्रयत्न एकाच मापानें मोजले जातात. परमेश्वरी दरबारांतील न्यायाचा कांटा या प्रयत्नांचे दृश्य परिणाम तोलीत नसून, त्यांतील अतस्थ हेतू तोलीत असतो; व त्या-प्रमाणें तो ते करणाऱ्या इसमांना स्वर्गीय सुखाचें बक्षीस किंवा नरकीय यातनांचें शासन देतो. अशा पवित्र हेतूनें प्रेरित होऊन स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं सतराव्या शतकांत करण्यांत आलेल्या, पण दुर्दैवानें फसलेल्या, एका प्रयत्नाची हकीगत आम्ही खालीं देत आहोंत.

विजापूरचा महंमद बादशहा मरण पावून व त्याच्या जागीं अली आदिलशहा तक्तनशीन होऊन सहा वर्षें झालीं होतीं. मुसलमानांच्या धर्मच्छळामुळें सर्व प्रजा संत्रस्त झाली होती. हिंदु राजांचीं भंगलेलीं सिंहासनें व उध्वस्त केलेलीं देवालयें यवनी राज्याच्या जुलमाची व बेफामपणाची साक्ष पटवीत होतीं. मुसलमान सरदारांनीं जबरदस्तीनें जनानखान्यांत ओढून नेलेल्या हिंदु स्त्रिया वरकरणी मंद व स्मित हास्य करून, आंतून आपलें पातिव्रत्य हिरावून नेणाऱ्या त्या सैतानांची आपल्या क्रोधाग्नींत राखरांगोळी करून टाकण्याविषयीं कारस्थानें रचित होत्या.

[library stamp]

योग्यतेनें कमअस्सल ठरलेल्या, पण धर्माच्या जोरावर वरिष्ठ पदवीला चढलेल्या मुसलमानी मानकऱ्यांना व दरकदारांना पाहून दरबारांतील हिंदु सरदारांचा आंतून तिळपापड चालला होता; व हिंदु राज्याची पुनः स्थापना झाल्याशिवाय आपल्या गुणांचें चीज होणार नाहीं, अशा राजद्रोही विचारांनीं त्यांच्या मनांत काहूर उसळून दिलें होतें. तोरणा किल्ल्यावर शिवाजी महाराजांनीं स्वातंत्र्याचा भगवा झेंडा उभारून त्याच्या शीतल, पोषक व उन्नतिकारक छायेखालीं स्वातंत्र्यभक्तांच्या झुंडीच्या झुंडी जमूं लागल्या होत्या. महाराजांचे प्रयत्न बाल्यावस्थेंतच हाणून पाडून त्यांनीं रोंविलेला स्वराज्याचा झेंडा जमिनदोस्त करण्याविषयीं अल्ली आदिलशहानें आपल्या सरदारांकरवीं प्रचंड धडपड चालविली होती. पण शिवाजी महाराजांच्या हाताला दिवसें दिवस जास्त जास्त यश येत जाऊन विजापुरी राज्याला ओहोटी लागली होती. आपण बादशहाचें निमक खात असून त्या निमकाला जागणें आपलें ब्रीद व कर्तव्य होय, या विलक्षण व आत्मघातकी कल्पनेमुळें कित्येक मराठे सरदारांनीं भरदरबारांत चंग बांधून महाराजांना व त्यांच्या मूठभर अनुयायांना चौगीर्द तंग देऊन ताणून फाडण्याची शिकस्त केली होती. पण शिवभक्तांचीं मनें स्वातंत्र्यभक्तीनें बेहोष झालीं असल्यामुळें, व महाराजांच्या प्रयत्नांवर परमेश्वरी कृपेची सांवली असल्याकारणानें, त्या राजनिष्ठ व मातृद्रोही मराठे सरदारांची महाराजांनीं मुळींच डाळ शिजूं दिली नाहीं. मध्यंतरीं सिद्दी जोहार ऊर्फ सलाबतखान नांवाच्या विजापुरी सरदारानें बंड करून विजापुरी राज्यांचीं हाडें बरींच खिळखिळीं केलीं होतीं.

विजापूरच्या राज्याचे अशा रीतीनें आंतून व बाहेरून लचके तोडले जात असतां, बंड करून स्वराज्याची स्थापना करण्यास

ही उत्तम संधी होय, असा विचार करून बेदनूरच्या भद्र नाई-कानें बंडाचें निशाण उभारलें, व विजापुरी मुलुखांत धुमाकूळ उडवून देण्यास त्यानें सुरुवात केली. त्याकरितां भद्र नाईकानें बेदनूर येथें युद्धाची सामुग्री, दारूगोळा व फौजफांटा जमवून जय्यत तयारी केली होती. भद्र नाईकाच्या बंडाची बातमी समजतांच अल्ली आदिलशहा अतिशय चिंतातुर झाला; व अशा प्रकारें चोहों बाजूंनीं आपली लांडगेतोड झाल्यास आपली खास धडगत नाहीं, अशा घोर विवंचनेंत तो पडला. पण अल्ली आदिलशहाची ही चिंता व विवंचना फार वेळ टिकली नाहीं. भद्र नाईकाशीं साम करून त्याला राजनिष्ठेच्या मार्गावर आणावें, या हेतूनें त्यानें मुल्ला खुरम याला मध्यस्तीकरतां बेदनूरला पाठविलें; व हिंदुधर्माचा त्याग करून मुसलमानी धर्माची दीक्षा घेतल्यास सर्व अपराध माफ केले जातील, असा निरोप कळविण्याविषयीं त्याला सांगितलें. बादशहाच्या हुकुमाप्रमाणें मुल्ला खुरम बेदनूर मुक्कामीं येऊन दाखल झाला, व त्यानें आपली गांठ घेण्याविषयीं भद्र नाईकाला निरोप धाडला. त्याप्रमाणें भद्र नाईकानें आपला दरबार भरवून व मुल्ला खुरम याला त्यांत मानमरातबानें बोलावून आणून उच्चस्थानीं बसविलें. आपला सन्मानपूर्वक पाहुणचार केलेला पाहून मुल्ला खुरमला आपली कामगिरी फत्ते होईलशी आशा वाटूं लागली, व त्यानें बादशहाचा निरोप भद्र नाईकाला मोठ्या ऐटीनें निवेदन केला. आपला प्राणप्रिय हिंदुधर्म सोडून इस्लामी धर्मांत येण्याविषयींचा बादशहाचा तो निरोप ऐकून भद्र नाईकाच्या अंगाचा संतापानें भडका उडाला, व त्या भरांत त्यानें बादशहाची सडकून निंदा केली. एवढेंच नव्हे, तर क्रोध अनावर झाल्यामुळें त्यानें मुल्ला खुरमला बेदम चोप देऊन दरबारांतून हांकलून दिलें. बिचारा

मुल्ला खुर्रम तेथून जो तडक निघाला तो थेट विजापुरास येऊन दाखल झाला, व त्यानें बादशहास इत्थंभूत सर्व हकीगत कळविली. ती ऐकून बादशहा रागानें लालबुंद झाला व भद्र नाईकाची पाळेमुळें खणून काढण्याविषयीं त्यानें आपल्या मनाचा पक्का निर्धार केला. त्याप्रमाणें १६५५ सालीं तो आपल्या अफाट सेनासमुद्रासह भद्र नाईकाच्या पारिपत्यास निघाला. त्यानें आघाडीस सय्यद अल्ली व सर्जाखान या दोन प्रबल योद्धयांस पाठवून दिलें, व कर्नाटकांतील मोहिमेवर गेलेल्या बहिलोलखान व शहाजी राजे यांना बेदनूरवर ताबडतोब चाल करून जाण्याविषयीं हुकूम केला. स्वराज्यासाठीं धडपड करणाऱ्या भद्र नाईकाचा चक्काचूर उडवून आदिलशाहीचा पाया मजबूत करण्यासाठीं बादशहाचा शहाजी राजाना हुकूम ना! हिंदुस्थाना! हा आत्मघातकीपणा तुझ्या इतिहासाशिवाय अन्यत्र कोठें दृष्टीस पडणार बरें? असो. सय्यद अल्ली व सर्जाखान या सरदारांनीं नाईकाच्या ताब्यांतील बंकापूर किल्ल्यास वेढा देऊन त्याच्यावर असा जोराचा हल्ला चढविला कीं, त्यांनीं एका तडाक्यासरशीं तो सर केला. नंतर त्यांनीं निऱ्हा नांवाच्या किल्ल्यावर चढाई करून तो काबीज केला. हे दोन किल्ले हस्तगत करून घेऊन सय्यद अल्ली व सर्जाखान आपल्या सैन्याला थोडी विश्रांति देत आहेत नाहींत, तोंच बादशहाची स्वारी अबदुल महंमद, मुल्ला अहंमद, मुजफरखान वगैरे रणझुंजार सरदारांसह व प्रचंड फौजेसह तेथें येऊन पोहोंचली. बादशहानें तेथून जें कूच केलें, तें मुलूख मारीत मारीत व किल्ले सर करीत करीत तो सौंध्यास आला. व तशीच नेटानें चाल करीत जाऊन त्यानें भद्र नाईकाचें मुख्य ठिकाण जें बेदनूर त्याला अचानक वेढा दिला.

बादशहाची दिमाखी व डामडौली फौज इतक्या लौकर येऊन

पोहोंचेल, अशी नाईकाला कल्पना नव्हती. म्हणून बेदनूरच्या आसपास बादशहाचा सेनासागर खवळलेला पाहून त्याचें सर्व अवसान गळालें व पुढें काय करावें हें त्याला बिलकूल सुचेना. त्याच्या सरदारांनीं त्याच्या अधीर झालेल्या मनाला धीराच्या चार गोष्टी सांगून त्याला कर्तव्योन्मुख करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण बेदनुरास राहिल्यास बादशहाच्या त्वेषाला आपला खास बळी पडणार, असें वाटून तो कायलदुर्गाच्या किल्ल्यांत पळून गेला. बेदनूर सोडून भद्र नाईक कायलदुर्गांत गेल्याची वर्दी बादशहास लागतांच तो आपल्या सैन्यासह तिकडे गेला व त्यानें त्या किल्ल्याला सर्व बाजूंनीं जेरबंद लाविले. बादशहाच्या कांहीं लोकांनीं किल्ल्यावर हल्ले करण्याचा सपाटा चालविला व बाकीच्यांनीं किल्ल्याचा आसपासचा सर्व प्रांत बेचिराख करून गडावर दाणागोटा जाणार नाहीं असा बंदोबस्त केला. बादशाही सैन्यानें लागोपाठ चालविलेल्या हल्ल्यांमुळें गडावरील शिबंदी पातळ होत चालली, व धान्याचा तुटवडा पडल्यामुळें भद्र नाईकाच्या लोकांची अन्नान्नदशा झाली. अशा रीतीनें चार दोन महिने काढावे लागल्यास आपणां सर्वांस निःसंशय गडावर स्थलसमाधि मिळणार, हा विचार भद्र नाईकाच्या मनाला विंचवाप्रमाणें नांगी मारूं लागला व तो सर्वस्वीं हतबुद्ध झाला.

वास्तविक रीतीनें भद्र नाईकानें स्वतःस कायलदुर्गाच्या किल्ल्यांत कोंडून न घेतां बादशहाशीं गनिमीकाव्यानें त्याच्याच प्रांतांत लढावयास पाहिजे होतें. महाराष्ट्रांत शिवाजी महाराजांनीं या मार्गाचाच अवलंब केल्यामुळें ते विजापुरी सैन्याच्या कचाटींत विशेषेंकरून सांपडले नाहींत. दक्षिण हिंदुस्थानांत भद्र नाईकानें ही धूर्तता व हा पोंच दाखविला नाहीं, म्हणूनच त्याच्यावर वरीलप्रमाणें घोरतर प्रसंग गुदरला. किल्ल्यासभोंवार विजापुरी

सैन्यरूपी मृत्यूचा जबडा दूरवर पसरलेला पाहून व त्यांत आज नाहीं उद्यां सर्वजण कोंबले जाणार अशी बालंबाल खात्री होऊन भद्र नाईकाचा निरुपाय झाला व शहाजीराजे यांच्या-मार्फत त्यानें बादशहाशीं तहाचें बोलणें लाविलें. आपलें हिंदुत्व कायम राखण्याविषयीं बादशहाचें अभिवचन घेऊन वेढा उठविल्यास आपण त्याचे मांडलिक होऊं व दरसाल त्यास अमुक रक्कम खंडणीदाखल देत जाऊं अशी त्यानें बादशहास विनंति केली; व शहाजीराजे यांच्या भिडेखातर आणि लढाईचा कंटाळा आल्यामुळें बादशहानें ती तात्काळ मान्य करून आपल्या फौजेचा मोर्चा परत विजापुराकडे वळविला. अशा रीतीनें भद्र नाईकानें स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं केलेल्या प्रयत्नाचा शेवट झाला. या प्रयत्नाचा अखेरीस भद्र नाईकानें जरी वीराला अनुचित असा मार्ग स्वीकारून स्वहस्तानें आपल्या पायांत गुलामगिरीच्या शृंखला अडकावून घेतल्या, तरी तो प्रयत्न स्वातंत्र्याच्या कमाईबद्दल असल्यामुळें स्तुत्यर्ह होता, यांत बिलकुल संदेह नाहीं. बादशहाला शरण जाण्याऐवजीं जर त्यानें स्वातंत्र्याचा व स्वधर्माचा गजर करीत मरण पत्करिलें असतें, तर इतिहासांत त्याच्या नांवाभोंवतीं धैर्य, धाडसीपणा, धर्मभक्ति, स्वातंत्र्यलालसा वगैरे सद्गुणांची देदीप्यमान प्रभा फांकलेली दृष्टीस पडली असती. पण ती मुळींच फांकलेली नाहीं, असें मात्र नाहीं. शिवाजी महाराजांप्रमाणेंच स्वराज्याची व स्वधर्माची स्थापना करण्याविषयींचा त्याचा तो प्रयत्न होता. महाराजांच्या अंगीं अद्वितीय धोरणीपणा, आटोकाट प्रसंगावधान व लोकोत्तर छातीठोकपणा असल्यामुळेंच त्यांचा प्रयत्न यशस्वी होऊन महाराष्ट्रभूच्या पांढऱ्या फटफटित भालप्रदेशावर ते स्वातंत्र्याचा तिलक लावण्यास समर्थ झाले. भद्र नाईकाच्या ठायीं वरील सद्गुण तितक्या अंशांनीं

वास करीत नसल्यामुळेंच त्याचा प्रयत्न फसला जाऊन, दास्याच्या दडपणाखालीं स्वातंत्र्याची ज्योत विझवून टाकणें त्याला भाग पडलें. ऐहिक दृष्ट्या या दोन प्रयत्नांचे जरी दोन भिन्न भिन्न परिमाण झाले, तरी परमेश्वरी कायद्याप्रमाणें दोघांनाही स्वर्गांत एकाच प्रकारचें, परंतु कमी अधिक प्रमाणानें पारितोषिक खास मिळालें असलें पाहिजे. कारण, परमेश्वराला अत्यंत प्रिय असें स्वातंत्र्य कमविण्याविषयींचे दोन्हीही प्रयत्न झालेले होते!



## रत्न पांचवें.

# सूर्याजी मालुसरे व सूर्याजी पिसाळ.

Look here, upon this picture, and on this.
(हें चित्र पहा, व तें चित्र पहा.)

देशसेवेसारखें पुण्य नाहीं व देशद्रोहासारखें पाप नाहीं. ब्राह्मणभोजनें घालणें, देवालयें बांधणें, धर्मशाळा उभारणें, वेदशाळा स्थापन करणें इत्यादि अनेक पुण्यकर्मे निरनिराळ्या स्मृतिकारांनीं सांगितलीं आहेत; व हीं पुण्यकर्में केलीं असतां इहलोकांतील जीवनयात्रा सुखकर होऊन या मृत्युलोकांत देह ठेविल्यावर परलोकींही अशा पुण्यकर्में करणाऱ्या विभूतीच्या आत्म्याला सद्गति मिळते. सुरापान, परस्वहरण, गुरुस्त्रीगमन इत्यादि घोर पातकें करणाऱ्या नराधमाचें अंतःकरण या लोकीं तिळ तिळ झिजून, पृथ्वीवरील मूळची शुद्ध हवा त्याच्या पापी श्वासोच्छ्वासांनीं दूषित होण्याचें बंद झाल्यावर, परमेश्वरी दरबारांत त्याचा न्याय होऊन त्याच्या पापाप्रमाणें त्याला शिक्षा मिळते. पुण्यवान् मनुष्याला कवटाळतांना जगदीशाच्या हृदयांत जें प्रेम वसत असतें, तें प्रेम पापी माणसाला झिडकारतांना पार नाहींसें होतें. तो पुण्यवान् महात्म्यांना स्वर्गीय सुखाचे वांटेकरी करतो, तर पापी दुरात्म्यांना "नरकीय" यातनांनीं जर्जर करून सोडतो. परमेश्वर न्यायी आहे, तो दयाळू नाहीं. मनुष्याच्या पापपुण्याप्रमाणें तो त्याला शिक्षा किंवा सुख देतो. पण तो कधीं कोणावर दया करीत नाहीं. त्याच्या हातांत न्यायाचा कांटा आहे,

त्याचे हात दयेच्या नवनीतानें माखलेले नाहींत. म्हणून पुण्य-वान् मनुष्याला त्याच्या पुण्याप्रमाणें सुख मिळतें, व पापी मनुष्याला त्याच्या पापाप्रमाणें शिक्षा होते. पुण्य व पाप हीं दोन्ही सान्त असल्याकारणानें, त्यांच्याबद्दल मिळणारें सुख किंवा दुःख हीं सुद्धां मर्यादित आहेत. पुण्याला शेवट आहे व पापालाहीं शेवट आहे. म्हणून पुण्यजन्य सुखाला व पापजन्य दुःखाला शेवट आहे. असें जरी आहे, तरी असें एक पुण्य आहे कीं, जें लाधलें असतां पुढें मिळणाऱ्या सुखाचा कधींही अंत होत नाहीं; व असें एक पाप आहे कीं, जें केलें असतां होणाऱ्या भावी दुःखाचा कधींही शेवट होत नाहीं. असें अंतरहित पाप म्हटलें म्हणजे देशद्रोह होय. देशसेवेच्या पुण्याबद्दल परमेश्वराकडून मिळणारें सुख अक्षय्य असतें; देशद्रोहाच्या पातकाबद्दल मिळणारें दुःख निरन्त असतें. जन्मास आल्यावर मनुष्यानें हें देशसेवेचें पुण्यकर्म केल्याशिवाय राहूं नये, व देशद्रोहाचें पापकर्म आपल्या हातून होऊं देऊं नये. जर हें पुण्यकर्म करण्याची व हें पापकर्म टाळ-ण्याची पूर्ण खबरदारी त्यानें घेतली, तर मग त्याला इहलोकीं किंवा परलोकीं कशाचीही भीति बाळगावयास नको. इतर पुण्य-कर्में किंवा पापकर्में स्थलविशेषानें, कालविशेषानें व व्यक्तिविशे-षानें बदलतात; पण हें देशसेवेचें पुण्य व देशद्रोहाचें पातक कधींही बदलत नाहीं. हीं त्रिकालाबाधित असतात. परमेश्वरानें जी कांहीं आयुर्मर्यादा आपणास दिली आहे, तींत ज्या भूमीनें आपणास जन्म दिला तिची मनोभावें व इमानेंइतबारें सेवा करणें हें प्रत्येक जातिवंत पुत्राचें पहिलें व शेवटलें कर्तव्यकर्म आहे. आपल्या जन्मदात्या व अन्नदात्या मायभूशीं मात्रागमनीपणा करून तिच्या मऊ मांडीवर ममतेनें लोळण्याच्या ऐवजीं तिच्या छातीवर पिशाचाप्रमाणें थयथय नाचणें हाच देशद्रोह होय ! हें

देशद्रोहाचें पातक करणाऱ्या नीचात्म्याला मिळणारी ईश्वरीय शिक्षा कधींही संपत नाहीं; अशा अधमाला कधींही मुक्ति मिळत नाहीं; व त्याच्या आत्म्याला छळणाऱ्या दैविक यातना कधींही संपत नाहींत. उलटपक्षीं, देशसेवेचें अक्षय्य पुण्य ज्या भाग्यवान् मनुष्यानें एकदां गांठीं बांधलें, त्यानें कायमचें ऋण जगदीशाच्या गळ्यांत बांधलें, असें म्हणावयास हरकत नाहीं.

देशसेवेचें हें भांडवल कितीही स्वर्गीय सुखोपभोग मिळाला तरी एक पैनेंही कमी होत नाहीं. देशसेवेच्या भांडवलावरील व्याज फेडतां फेडतां परमात्म्याला जड जातें. हें पुण्य पदरीं पाडण्यास पैसा लागत नाहीं व विद्वत्ता लागत नाहीं. याला कुलीन घराणें लागत नाहीं किंवा उत्तम पदवी लागत नाहीं. या पुण्याची जोड होण्यास फक्त देशभक्तीनें थबथबलेल्या हृदयाची अवश्यकता आहे. असें हें ओलें हृदय असल्यास त्यांतून पसरणाऱ्या ओलाव्यानें इतर इंद्रियांतील काठिण्य नाहींसें होऊन तीं कार्यक्षम होतात, व मग ही देशसेवा घडून पदरीं अविनाशी पुण्याची सांठवण होते. हें पुण्य एकदां पदरीं पडल्यावर कशाचीही अपेक्षा नको. आत्म्याच्या नित्यत्वाप्रमाणें हें पुण्य नित्य आहे. असें पुण्य ज्या महात्म्यांनीं आपल्या आयुष्यांत संपादन केलें, ते खरोखरच भूदेव होत. त्यांच्या देशसेवेच्या कथा गंगायमुनेप्रमाणें पवित्र व पावन होत. या कथासरितांत गाढ अवगाहन करून भेकड माणसानें आपल्या भीरुत्वरूपी दोषाचें क्षालन करून टाकावें. देशसेवारत महात्म्यांच्या या उन्नतिकारक कथाश्रवणानें प्रत्येक मनुष्यानें आपले कर्ण व हृदय पुनीत करून घ्यावें. या कथामृतानें अमर झालेलीं हृदयें देशसेवेंत झिजवून आयुष्याचा शेवट गोड करून घ्यावा. देशभक्तांचीं जीवनचरित्रें जितकीं गोड आहेत, त्यांपेक्षां देशभंजकांचीं जीवनचऱ्हाटें जास्त कडू आहेत.

पहिलीं मन रिझवितात, तर दुसरीं मन झिजवितात! पहिलीं मनांत आशातंतू उत्पन्न करतात, तर दुसरीं मनांतील आशातंतू तोडून टाकतात! पहिलीं खरा मार्ग दाखवितात, तर दुसरीं तो मार्ग दडवून ठेवतात! पहिलीं हृदयें तोषवितात, तर दुसरीं हृदयें दूषवितात! देशभक्तांचीं जीवनचरित्रें तारक आहेत, तर देशभंजकांचीं जीवनचऱ्हाटें मारक आहेत! हीं जीवनचरित्रें वाचकांच्या मनांत नवीन जीव घालतात, तीं जीवनचऱ्हाटें वाचकांच्या गळ्यांना गळफांस लावतात. म्हणून प्रत्येक मनुष्यानें पहिलीं चरित्रें वाचावींत, दुसरीं चऱ्हाटें टाळावींत! शिरोलेखांत लिहिलेल्या सूर्याजीद्वयाच्या कृतींकडे पाहिलें असतां देशभक्ताच्या व देशभंजकाच्या कृतींतील फरक आमच्या प्रिय वाचकांच्या तेंव्हांच लक्षांत येईल. एकानें सिंहगड कमविला, तर दुसऱ्यानें रायगड गमविला! एकानें देशसेवा केली, तर दुसऱ्यानें आत्मसेवा केली! एकानें देशकार्य केलें, तर दुसऱ्यानें आत्मकार्य केलें! एकानें जन्मभूमीला हंसविलें, तर दुसऱ्यानें तिला ओक्साबोक्सीं रडविलें! एकानें " महात्मा " या स्पृहणीय पदवीची जोड करून घेतली, तर दुसऱ्यानें " नीचात्मा " ही बिनतोड पदवी संपादन केली! एक देशाभिमानाचा रम्य पुतळा होय, तर दुसरा देशद्रोहाचा हिडिस ठोकळा होय! पहिल्यानें आपलें " सूर्याजी " नांव सूर्याप्रमाणें महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर चकूमन सार्थ केलें, तर दुसऱ्यानें आपलें " पिसाळ " हें आडनांव पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें देशबांधवांच्या शरीराचे निष्कारण चावे घेऊन अन्वर्थक केलें! सारांश, या सूर्याजीद्वयाचीं चरित्रें अतिशय बोधपर व सन्मार्गदर्शक आहेत. त्यांच्या चरित्रांपासून आपण कोणता बोध घ्यावा, हें आम्ही आमच्या प्रिय महाराष्ट्रीय वाचकांस थोडक्यांत दाखविणार आहोंत.

सन १६७० नुकतांच सुरू झाला होता. मराठी स्वराज्याची मुहूर्तमेढ महाराष्ट्रभूमींत ठोकून अजून पुरें पाव शतकही झालें नव्हतें. महाराष्ट्रभूमीच्या राजकीय नभोमंडळाच्या क्षितिजावर मराठ्यांचा स्वातंत्र्यरवि आतां आपल्या बालकिरणांनीं प्रकाशूं लागला होता; व इस्लामी सत्तारूपी मेघावडंबर लवकरच या सूर्याच्या चंडकिरणांनीं वितळून जाऊन पारतंत्र्यानें गारठलेल्या महाराष्ट्रभूवर स्वातंत्र्याचें जीवनदायक ऊन पुनरपि पडण्याचा रंग येऊन ठेपला होता. या वेळीं महाराष्ट्रांत जागजागीं असलेल्या गडांच्या आधारानें मोंगली सत्ता जेमतेम तग धरून राहिली होती. या सत्तेला तेथून हुसकावून देऊन हे गड आपल्या हस्तगत करण्याचा उपक्रम शिवबानें सुरू केला होता, व त्या कामीं त्यांना जगदंबेच्या कृपेनें पूर्ण यश आलें होतें. हे गड काबीज करण्याच्या कामीं ज्या मराठे वीरांनीं आपल्या पराक्रमाची व मर्दुमकीची शर्थ केली, त्या सर्वांत अग्रणी तानाजी मालुसरे हे होत. त्यांनीं केलेल्या पराक्रमाला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं, व त्यांनीं केलेल्या देशसेवेला माप नाहीं ! सिंहगडावर मोंगलांचा रजपूत सरदार उदेभान यानें आपल्या हातांखालील शूर वीरांच्या जोरावर मुसलमानांचें हिरवें निशाण उभारलें होतें, तर रायगडवर मराठ्यांचा भगवाझेंडा त्याची जागा पटकविण्यासाठीं एकसारखा थयथय नाचत होता. पुण्यापासून दहा मैलांवर असलेल्या सिंहगडावर मुसलमानी चांद चमकतो आहे हें पाहून शिवबांच्या वीर्यशालिनी मातोश्रीला चैन पडेना व त्या शिवबाला स्वस्थ बसूं देईनात. वास्तविक रीतीनें पाहिलें असतां त्या क्षत्रिय कुलोत्पन्न वीरसू माऊलीला प्रत्यक्ष आपल्या व वाडवडिलांच्या मालकीच्या देशांत असलेल्या गडावर परकीयांच्या सत्तेचा अंमल सहन होऊं नये, यांत कांहीं वावगें नव्हतें. रायगडाप्रमाणें सिंह-

गडावरही मराठ्यांचा भगवा फडफडावा, अशी त्या साध्वीची उत्कट इच्छा होती व ती तिनें शिवबाला कळविली. आपल्या जन्मदात्या मातेचे कोड पुरविण्यास सदा तत्पर असणारे महाराज आईची इच्छा ऐकून स्वस्थ बसणारे नव्हते. त्यांनीं लागलीच आपल्या सरदारांपैकीं अति शूर व अति धाडशी असा सरदार जो तानाजी त्याला बोलावून आणिलें व सिंहगड जिंकण्यास त्याला आज्ञा केली. सतराव्या व अठराव्या शतकांत मर्दुमकीचें कृत्य करण्यास आज्ञा मिळाली असतां जितका आनंद मराठे सरदारांना होत असे, तितका आनंद दुसऱ्या कोणत्याही कृत्यानें होत नसे. शेंकडों दुसरीं कामें एकीकडे सारून मराठे वीर असे पराक्रम करण्यास उड्या घेत असत. मर्दुमकी गाजवून विजयश्रीच्या मर्दानी माळा गळ्यांत लटकावून ते एकतर धन्याला परत येऊन भेटत, नाहींतर असिधारातीर्थी कायमची जलसमाधि घेऊन आपला व आपल्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करीत.

सिंहगड हस्तगत करण्याची आज्ञा शिवबाकडून आल्याबरोबर चार दिवसांनीं होणाऱ्या मुलाच्या लग्नाची पर्वा न करतां तानाजीनें आपल्या हाताखालील हजार मराठे वीरांच्या तुकडीचे दोन भाग केले. एका भागाचें पुढारीपण त्यानें स्वतः स्वीकारिलें व दुसरा भाग त्यानें आपला कनिष्ठ बंधु जो सूर्याजी त्याच्या स्वाधीन केला. काळोखांतून मजल मारून मध्यरात्र उलटून गेल्यावर त्यानें सिंहगडाचा पायथा गांठला. घोरपडीच्या सहाय्यानें तटावर चढून आपल्या हाताखालील पांचशें वीर किल्ल्यांत घेतले. पण इतक्या लोकांची चाहूल किल्ल्यावरील रखवालदारांस लागून त्यांनीं भयसूचक कर्णा फुंकला. थोड्याच वेळांत किल्ल्यावरील मोंगली शिबंदीचें व त्या तानाजीच्या तुकडीचें तुमुल युद्ध

झुंपलें. उभयबाजूंच्या वीरांच्या मुखांवाटून रणगर्जना सुरू झाल्या. समशेरीवर समशेरी खणखणूं लागल्या, व चेंडूप्रमाणें वीरांचीं मस्तकें धडांपासून वर उडूं लागलीं. उदेभानाची व तानाजीची गांठ पडल्याबरोबर ते एकमेकांवर चित्त्याप्रमाणें तुटून पडले, व दोघांनींही थोड्याच वेळांत आपले मर्त्य देह तेथें टाकून देऊन सूर्यलोकाची वाट धरली. आपला सरदार पडला हें पाहून मराठे वीरांचें धैर्य पळालें. त्यांच्याच्यानें पुढें लढवेना व आपल्या तलवारी शत्रूवर चालवेनात. भयानें त्यांचीं हृदयें कांपूं लागलीं, व त्यांनीं शत्रूकडे पाठ वळवून पळावयास सुरुवात केली. तानाजीच्या तुकडींत पळापळ सुरू होण्याच्यापूर्वीच सूर्याजीची तुकडी तट चढून वरती आली होती. दुसऱ्या बाजूनें हल्ला चढविण्याची सूर्याजीची तयारी झाली होती. आतां तो हल्ला करण्याच्या पूर्वी " हर हर महादेव " म्हणण्याच्या अगदीं बेतांत होता. इतक्यांत आपण उभे आहोंत त्या दिशेनें कोणी धांवत येत आहे असा आवाज त्याला ऐकूं येऊं लागला. तो कानोसा घेत आहे इतक्यांत त्याला आपल्याकडे पळत येणारीं माणसें अस्पष्ट दिसूं लागलीं. आपल्या भावाच्या तुकडीनें दाणादाण केल्यामुळें किल्ल्यावरील शिबंदींतील लोक सैरावैरा पळताहेत असें समजून त्यानें आपली फार दिवस तान्हेलेली तलवार बाहेर काढली व ती पळत येणाऱ्या लोकांकडे दाखवून तो म्हणाला, " मराठ्यांनों, आतांच तुमच्या शूरत्वाची पारख आहे. तृषार्त झालेल्या तुमच्या तलवारींना शत्रूच्या रक्ताचें यथेच्छ प्राशन करवा." हे शब्द त्याच्या तोंडांतून पुरतेपणीं निघाले असतील किंवा नसतील, तोंच ते पळत येणारे शिपाई आतां अगदीं जवळ येऊन ठेपले. त्यानें आपली समशेर उभारली. आतां तो हरहर महादेव म्हणणार व तलवार चालविणार, तोंच त्याच्या डोळ्यांला विलक्षण

प्रकार दिसला व त्याच्या छातींत एकदम धसका बसला. त्यानें उभारलेली समशेर आपोआप खालीं आली, व त्याच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली. क्षणभर त्यानें डोळे मिटले व पुन्हां ते तत्काळ उघडले. आपल्या डोळ्यांपुढें जें दिसत आहे तें खरें आहे किंवा नाहीं, हें ठरविण्यासाठीं त्यानें त्यांच्यावरून हात फिरविला व गाढ अंधारांत नीट न्याहाळून पाहिलें. कधीं न घडलेली व कधीं न घडणारी गोष्ट पाहून त्याला मनस्वी राग आला. त्याचे डोळे रागानें लालबुंद झाले. त्याचें सर्व शरीर आंत उसळणाऱ्या त्वेषाच्या लाटांनीं थरथर कांपूं लागलें. तो आपला ओंठ क्रोधानें चावूं लागला, तेव्हां कर्दनकाळासारखा दिसूं लागला.

सूर्याजीच्या चेहेऱ्यांत हा फरक एकाएकीं कशामुळें पडला बरें? 'हरहर महादेव' म्हणून समशेर चालविण्याच्या ऐवजीं त्याला इतका अनावर राग येण्याचें कारण काय बरें असावें? त्याचे शिपाई शत्रूवर तुटून पडण्यास मागेंपुढें पाहूं लागले काय? छे:, तशांतला कांहीं एक प्रकार नव्हता. सूर्याजीसारखा पुढारी असतां ते कच खातील? असें कधींही घडून आलें नसतें. सूर्याजीच्या रागाचें कारण निराळेंच होतें. जे शिपाई त्याच्याकडे पळत आले व ज्यांचा खरपूस समाचार घेण्याकरितां तो इतका आतूर झाला होता. ते मोंगलांकडील शिपाई नव्हते. ते त्याचेच जातभाई होते. त्याच्याच वडील भावाच्या हाताखालील शिपाई होते. ते महाराष्ट्रभूमींत जन्मलेले व तिच्यावरच पोसलेले मराठे होते. सूर्याजीनें मराठे पळतांना आजपर्यंत पाहिले नव्हते. तो स्वतः कधीं पळाला नव्हता, व त्याचा युद्धकलेंतला गुरु श्रीछत्रपती-महाराज हेही कधीं पळाले नव्हते. मराठ्यांच्या शुभ्र कीर्तीला काजळाप्रमाणें काळा डाग लावणारे ते पळपुटे मराठे पाहून त्याच्या सर्वांगाचा भडका झाला. त्याच्या डोळ्यांत प्रकाशणाऱ्या

क्रोधाग्नीच्या प्रकाशांत त्याला आतां भयग्रस्त झालेल्या मराठ्यांचीं म्लान मुखें स्पष्ट दिसूं लागलीं. त्याला पळण्याचें कारण ताबडतोब कळलें, तरीपण त्याला दुःख झालें नाहीं. त्यानें एकही सुस्कारा टाकला नाहीं. वीर लोक समरभूमीवरच कायमचे निजतात, हें त्याला पूर्णपणें माहीत होतें. पण समरभूमीची मऊ व हवाशीर शय्या सोडून देऊन मराठे वीर—शिवबाच्या तालमींत कसलेले वीर—जेव्हां घरच्या संकटमय व कोंदट शय्येची इच्छा धरून पळतांना त्यानें प्रत्यक्ष पाहिले, तेव्हां तो क्रोधानें धडधड जळूं लागला. खालीं गळलेली तलवार वरती उचलून तो पळत येणाऱ्या मराठ्यांच्या वाटेच्या मध्यावर उभा राहिला व त्यानें बोलण्यास सुरुवात केली:—" षंढांनों हिडग्यांनों, शेंदाड शिपायांनों, आपल्या बापाला किल्ल्यावर मेलेला टाकून तुम्ही पळतां तरी कोठें ? हीं तुमचीं अपकीर्तीनें काळीं ठिक्कर पडलेलीं तोंडें तुम्ही शिवबाला कोणत्या तऱ्हेनें दाखविणार ? मृत्यूला भिणाऱ्या भेकडांनों, तुम्ही तटाकडे खुशाल पळा व खालीं पडून खुशाल मरा ! कारण, तटावरील शिड्यांचे दोर मी केव्हांच कांपून टाकले आहेत. पण हें एवढें खूप समजा कीं, तुमच्या या पळण्यानें, तुमच्या या नामर्दपणानें व तुमच्या या अक्षम्य भेकडपणानें तुम्ही स्वतःच्या व तुमच्या वाडवडिलांच्या शुभ्र कीर्तीला कायमचा व कधीं न जाणारा असा काळा डाग लावीत आहां ! पळपुट्यांनों, जोरानें पळा, व कवडीमोल जीव कृपणपणानें खुशाल जतन करून ठेवा ! "

सूर्याजीचें हें निर्भर्त्सनायुक्त भाषण ऐकल्यावर त्या पळणाऱ्या मराठी वीरांच्या अंगांत एकाएकीं वीरश्री संचरली. त्यांच्या शौर्यांगारांवर सांचलेली भीतीची रक्षा सूर्याजीच्या वीरश्रीयुक्त भाषणाच्या वायूनें पार उडून गेली व ते पुनरपि तेजःपुंज झाले. त्यांनीं आपलीं तोंडें फिरवून एकदां ' हरहर महादेव ' ची

गर्जना केली. ते व सूर्याजीच्या हातांखालील शिपाई किल्ल्यावरील शिबंदीवर लांडग्याप्रमाणें तुटून पडून त्यांनीं त्यांची एकसहा कत्तल करून टाकिली. तो सिंहगड किल्ला त्यांच्या स्वाधीन झाला, व मातोश्री जिजाबाईचा फारा दिवसांचा हेतु सफल झाला ! शत्रूच्या किल्ल्यावर, ऐन रात्रीचा प्रसंग असतां, प्रत्यक्ष थोरला भाऊ मरण पावला असतां, व त्याच्या टोळींत पळापळ सुरू झाली असतां ज्याचें धैर्य रतिभरही खचलें नाहीं व ज्याच्या मनांत देशसेवेशिवाय दुसरा विचार नव्हता, अशा या महाराष्ट्रीय वीरांमध्यें सूर्याप्रमाणें प्रकाशमान् होणाऱ्या सूर्याजी मालुसऱ्याचा अचाट पराक्रम पाहून त्याच्या कोणत्या सहृदय महाराष्ट्रीय वंशजाच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहणार नाहींत ? देशकार्यासाठीं देह अर्पण करणाऱ्या मर्दानी साधूंमध्यें सूर्याजीची गणना झाल्यावांचून कधींही राहणार नाहीं. सूर्याजीराव इहलोकीं आपल्या सर्व आबालवृद्ध देशबांधवांस प्रिय झाले; एवढेंच नव्हे तर त्यांची ही देशनिष्ठापूरित सत्कृति पाहून स्वर्गीं जगदीशाच्या हृदयांत सुद्धां आनंदोदधि उसळला असला पाहिजे.

* * * *

महाराष्ट्राच्या राजकीय नभोमंडळांत आपल्या सत्कृतीनें सूर्याप्रमाणें तळपणाऱ्या सूर्याजी मालुसऱ्याचें चरित्र जितकें बोधप्रद व आनंददायक आहे, तितकेंच पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें आपल्या देशबांधवांस विनाकारण अल्पस्वल्प स्वार्थासाठीं चावणाऱ्या सूर्याजी पिसाळाचें चरित्र कष्टप्रद व दुःखदायक आहे. संभाजीमहाराजांचा औरंगजेबाच्या हातून क्रूरपणानें वध झाला, व महाराष्ट्रांतील सर्व मराठ्यांची सुंता करण्याचा निश्चय त्या धर्मवेड्या व कडव्या बादशहानें करून आपल्या अफाट सेनेचा तळ त्यानें भीमेच्या कांठीं दिला. महाराष्ट्रांत जागजागीं मराठ्यांच्या

ताऱ्यांत असलेले किल्ले सर करून त्यांचीं पाळेंमुळें खणून टाकण्याचा दुष्ट विचार मनांत धरून त्यानें आपला शूर सरदार झुलफिकारखान रायगड किल्ला सर करण्यास पाठवून दिला. यावेळीं रायगडावर संभाजीची स्त्री येसूबाई व तिचा मुलगा शाहू महाराज हीं दोघें होतीं. किल्ल्याचें संरक्षण करण्याचें काम सूर्याजी पिसाळाकडे होतें. किल्ला इतका मजबूत होता व त्यांत धान्याची सामुग्री इतकी भरपूर होती कीं, दहा महिने झाले तरी किल्ला हस्तगत होईना व पुढें होण्याचा रंग दिसेना. परंतु एखादा अभेद्य किल्लाच नव्हे तर एखादें भक्कम राज्यही शत्रूच्या स्वाधीन अनायासें करून देणारा देशद्रोह त्या किल्ल्यांत आपलें डोकें वर काढूं लागला. ह्या देशद्रोहानें आजपर्यंत जितकीं दुष्ट व अनन्वित कृत्यें केलीं असतील, तितकीं तीं दुसऱ्या कोणीही केलीं नाहींत. हा देशद्रोह शत्रूच्या अफाट सेनेपेक्षां जास्त मारक आहे, व तोफांपेक्षां जास्त घातुक आहे. स्वदेशीयांची जूट धडाक्यासरशीं फोडून टाकणारा याच्यासारखा दुसरा सुरुंग नाहीं. स्वकीयांच्या स्वातंत्र्यमंदिराची बोलबोल म्हणतां साफ होळी करून टाकणारा याच्यासारखा दुसरा वणवा नाहीं. आप्तेष्ट मंडळींच्या सुखामृतांत जहाल मारकपणा उत्पन्न करणारें या देशद्रोहासारखें दुसरें विष नाहीं. या देशद्रोहाला दुसऱ्या कोणत्याही पापाची उपमा साजणार नाहीं. याच्यासारखें हें एकच पातक आहे व हें पाप करणारा मनुष्य पापकर्मांत अद्वितीय होय. असा एक घोर पातकी मनुष्य त्या किल्ल्यांत झुलफिकारखानाला सांपडला, व त्यानें त्याच्याकडून आपला डाव साधला.

सूर्याजी पिसाळ हा वांई येथील देशमुख घराण्यापैकीं असून, तेथील देशमुखी आपणा एकट्यास मिळावी अशी त्याची फार इच्छा होती. किल्ला स्वाधीन केल्यावर बादशहाकडून वांईची

देशमुखी देववितों अशी लालुच झुलफिकारखानाकडून आल्याबरोबर त्याच्या तोंडास पाणी सुटलें व त्याचें मन बिघडलें. आत्मकार्या-पुढें तो देशकार्य विसरला, व त्यानें झुलफिकारखानाचें म्हणणें कबूल केलें. सूर्याजी पिसाळा, शेवटपर्यंत किल्ल्याचें संरक्षण इमानेंइतबारें तूं केलें असतेंस, तर तुला वांईची देशमुखी राजाराम महाराजांच्याकडून मिळाली नसती काय? झुलफिकारखाना-प्रमाणें येसूबाईनें तुझी शिफारस केली नसती काय? देशबांधवांच्या सर्वस्वाचा होम पेटवून आपल्या घरांत स्वार्थाचा दिवा लावतांना तुझें काळीज दुभंगलें नाहीं ना? आपल्या क्षुल्लक स्वार्था-साठीं तूं शिवाजी महाराजांच्या सुनेला व नातवाला शत्रूच्या स्वाधीन केलेंस ना? तुझ्या या अधम करणीनें स्वर्गी शिवबांच्या आत्म्याला किती दुःख झालें असेल, हा विचार तुझ्या मनाला शिवला नाहीं ना? जा, नीचा जा; या लोकीं तुला आपल्या दुष्कर्माचीं कडू फळें चाखावयास मिळालीं, व पुढें सतरा वर्षांनीं शाहू महाराजांनीं तुझा पक्का सूड घेतला हें योग्यच झालें. परलोकींही तुझ्या आत्म्याला घोर यातना भोगाव्या लागतील. तुझ्या या निंद्य करणीनें तूं मराठ्यांच्या विमल नांवाला काळिमा आणलास! कोणीकडे देशभक्त सूर्याजी मालुसरे, व कोणीकडे तूं देश-भंजक सूर्याजी पिसाळ? तूं स्वार्थाच्या तुकड्यासाठीं देशबांधवांस डसलास, पण वरती तुझ्या आत्म्याला हजारों यमयातना सदैव डसत राहतील! सूर्याजी मालुसऱ्यानें सिंहगड कमविला, व त्यामुळें त्या महात्म्यानें येथें सुकीर्ति व वरती सद्गति कमविली! तूं रायगड गमविलास, म्हणून तूं येथें दुष्कृति व वरती दुर्गति संपादन केलीस!

## रत्न सहावें.

# प्रतापराव गुजर.

अभिमानधनस्य गत्वरै। रसुभिः स्थास्नु यशश्चिचीषतः ॥
अचिरांशुविलासचंचला। ननु लक्ष्मीः फलमानुषंगिकम् ॥

( क्षणभंगुर प्राण खर्ची घालून चिरकाल टिकणारें यश मिळवूं इच्छिणारा जो मानी पुरुष तो संपत्तीची मोठीशी पर्वा करतो असें नाहीं; कारण कीं, ती विद्युल्लतेप्रमाणें चंचल असून त्याच्या शौर्याचें केवळ अनुषंगिक फलच असतें. )

या मर्त्यलोकीं जीवयात्रा कंठीत असतांना मनुष्यावर कितीही अनर्थकारक प्रसंग कोसळले, तरी त्यानें सद्गुणांपासून कदापिही पराङ्मुख होऊं नये, व दुर्गुणांकडे आपल्या मनाचा केव्हांही कल होऊं देऊं नये. या जगांत दुर्गुणांची चलती व व सद्गुणांची उतरती कळा, असे देखावे वारंवार आपल्या दृष्टीस पडतात. दुर्गुणांनीं सडलेल्या अंतःकरणाच्या लोकांना ऐषआरामाचा यथेच्छ उपभोग घेतांना, व सद्गुणी लोकांना भिक्षापात्र घेऊन दारोदार हिंडतांना आपण नेहमीं पाहतों. पण यामुळें आपण दुर्गुणांकडे आपल्या मनाची प्रवृत्ति होऊं देतां कामा नये, किंवा सद्गुणांविषयीं आपल्या मनाची चलबिचल होऊं देणें उपयोगी नाहीं. दुर्गुणी व व्यसनी लोकांना ऐहिक सुखोत्पत्ति झालेली आपल्या दृष्टीस पडते, म्हणून ती स्वतःस करून घेण्याकरितां मनुष्याच्या मनाचा ओढा दुर्गुणांकडे व्हावा, हें अगदीं साहजिक आहे. पण शाश्वत व चिरंतन सद्गुणांची राखरांगोळी करून पापाचरणी मनुष्यांना मिळालेलें किंवा मिळणारें ऐहिक सौख्य

हें पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें नश्वर व क्षणैकास्थिर असतें, असा प्रत्येक मनुष्यानें नीट दूरवर विचार करावयास पाहिजे. वास्तविक पाहिलें असतां, हें जग, हें मानवी शरीर व सुखसंपादन करण्यास प्रधानभूत असा जो अर्थसंचय, हीं सर्व स्वरूपतः आहेत तरी काय? ज्याला आपण जग, जग असें म्हणतों, तें वस्तुतः परमेश्वरानें निर्माण केलेल्या अखिल व अगाध ब्रह्मांडाचा एक कोपरा आहे—तें आपल्याभोंवतीं पसरलेल्या अफाट व निर्मर्याद भवजलधींतील एक नुसता तुषार आहे—तें संसाररूपी वाळवंटांतील एक अतिशय सूक्ष्म रजःकण आहे! तसेंच, ज्या मानवी शरीराची आपण एवढी जोपासना करितों व बडेजाव ठेवितों, तें म्हटलें म्हणजे एक हाडामांसाचा गोळा आहे, तें साडेतीन हात लांबीचा एक मातीचा तुकडा आहे, तें एक बिनबुचाची कातड्याची पिशवी आहे! याच तात्विक दृष्टीनें पाहूं गेलें असतां, जो मिळविण्यासाठीं मनुष्यप्राणी वाटेल तीं अनन्वित व सैतानी कृत्यें करण्यास उद्युक्त होतो, तो द्रव्यसंचय तरी असा काय किंमतीचा आहे? जो पैसा मिळविण्यासाठीं जगाच्या आरंभापासून लोकांच्या आपापसांत एकसारख्या हाणामाऱ्या चालल्या आहेत, तो म्हणजे नुसती एक प्रकारची माती आहे! मग ती माती संपादण्यासाठीं एवढी धडपड ती कशाला करावयास पाहिजे, व एकमेकांच्या मुंड्या त्या कशाकरितां मुरगळावयास हव्यात? बरें, असें करून तरी कोणत्याही खऱ्या सुखाची प्राप्ति होण्याची आशा आहे काय? छेः, असणार कशी? मातीसारख्या ऐहिक अतएव भासमान् वस्तूपासून खरें व अक्षय्य सुख तें कसें प्राप्त होणार? कारणांत जी शक्ति नाहीं, ती कार्यांत तरी कशी उतरणार? असाच विचार करूनच आचार्यांनीं म्हटलें आहे कीं,

**'अर्थमनर्थं भावय नित्यं, नास्ति ततः सुखलेशः सत्यम्।'**

तेव्हां सांगावयाचें तें एवढेंच कीं, मानवी शरीर घेतलें काय, त्या शरीराला ऐहिक सुखोपभोग देणारा अर्थसंचय घेतला काय, किंवा या जगांतील दुसरी कोणतीही जडवस्तु घेतली काय, त्यांपासून म्हणजे दुर्गुणी मनुष्याला खऱ्या व शाश्वत सुखाचा लाभ होईल असें मुळींच नाहीं. जगांतील जडवस्तूंच्या प्राप्तीनें अगर सांनिध्यानें फार झालें तर अल्पकाळ टिकणारें असें दुःखसंमिश्रित सुख मिळेल, नाहीं असें नाहीं; पण तो कधींही निर्मळ व चिरकालीन सुखाचा वांटेकरी होऊं शकणार नाहीं. त्याला जर असल्या प्रकारचें सुख हवें असेल, तर तें त्यानें आपल्या सद्गुणांच्याच जोरावर मिळविलें पाहिजे, व त्याच जोरावर तें संपादन करणें कोणालाही शक्य आहे. ज्या सद्गुणांमुळें मनुष्याला स्वतःस स्वर्गीय सुखाची जोड करून घेतां येते, त्यांपैकींच स्वाभिमान, स्वजात्यभिमान व स्वदेशाभिमान हे प्रमुख होत! या गुणांमुळें मनुष्याला नुसतें उच्चतम दैवी सुख प्राप्त होतें असें नाहीं, तर नीचतम अशा ऐहिक सुखाचाही बऱ्हंशानें लाभ होतो. ज्या मनुष्याच्या ठायीं स्वतःविषयीं योग्य अभिमान सदैव जागृत आहे, व ज्याचें अंतःकरण उत्कट देशभक्तीनें उद्दीपित झालेलें आहे, त्याचा इतर लोकांवर वचक बसतो; इतकेंच नव्हे, तर तो इहलोकीं आपलें व आपल्या देशबांधवांचें अपरिमित कल्याण करून परलोकांतील परमपवित्र सुखाचा मालक होतो. गेलेलें स्वातंत्र्य पुन्हां परत मिळविण्याच्या कामीं व मिळविलेल्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याच्या कामीं स्वाभिमान व स्वदेशाभिमान या दोन दैवी गुणांचा जितका उपयोग होतो, तितका दुसऱ्या अनेक गुणांचा क्वचित्‌च होत असेल. ज्या राष्ट्रांतील लोकांत स्वाभिमान व देशाभिमान हे गुण पूर्णत्वानें बाणलेले आहेत, त्याच लोकांना स्वातंत्र्यासारखा स्पृह-

णीय ठेवा साध्य करून घेतां येईल, व तेच लोक कमाविलेलें स्वातंत्र्य जतन करूं शकतील. स्वाभिमानशून्य व देशहितविघातक लोकांच्या कपाळीं दुःख व पारतंत्र्य हीं केव्हांही हटकून याव-याचींच! म्हणून प्रत्येक मनुष्यानें स्वाभिमान व स्वदेशाभिमान हे दोन अमूल्य गुण पैदा करून घेण्याचा सतत प्रयत्न करावयास पाहिजे. असो.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांच्या काळांत स्वाभिमानी व देश-भक्त असे पुष्कळ लोक निपजले म्हणूनच त्यांना मराठी पाद-शाहीचा पाया घालतां आला, व म्हणूनच त्यांचे प्रयत्न सुफलित झाले. त्यांना जर हजारों अभिमानी व देशभक्त लोक येऊन मिळाले नसते, तर त्यांच्या एकट्याच्या हातून हिंदुपदपादशाही स्थापण्याचें जोखमीचें काम पार पडलें असतें किंवा नाहीं, या-बद्दल बरीच शंका आहे. स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामांत एक-टाच मनुष्य किंवा चार दोन लोक तरी असें काय करूं शक-णार आहेत? स्वातंत्र्यासाठीं रात्रंदिवस तळमळणाऱ्या एकट्या मनुष्याचे अवघे दोन डोळे राज्यकर्त्यांचीं अशीं कितीशीं छिद्रें व माऱ्याच्या जागा पाहूं शकतील? त्याचे सारे दोनच हात शत्रूच्या असंख्य हातांशीं असे किती वेळ लढतील? व त्याचे दोनच पाय शत्रूकडील कितीशा लोकांना तुडवतील? स्वातंत्र्य मिळवून स्वराज्य स्थापन करणें हें एकट्या दुकट्याला अगदीं अशक्य आहे. हें एकाचें काम नाहीं, तें अनेकांचें काम आहे. त्याला पुष्कळ देशभक्तांच्या हातांची व अंतःकरणांची जरूरी आहे. तें करण्याकरितां हजारों, लाखोंशें लोकांचें संगनमत व्हाव-यास पाहिजे. अशी एकजूट व एकजीव झाल्यावरच तें कार्य यशस्वी होण्याचा संभव आहे. महाराजांच्या निशाणाखालीं स्वाभिमानयुक्त व देशप्रीतीनें बेहोष झालेल्या लोकांचे थवेच्या

यवे जमा झाले, म्हणूनच त्यांना यवनी राज्यावर तीव्र आघात करून तें धुळीस मिळवितां आलें, व मराठी राज्याची इमारत अल्पावकाशांतच उभारतां आली. ही इमारत बांधण्याच्या कामीं ज्यानें पहिल्यापासून महाराजांना मनःपूर्वक मदत केली व सरतें-शेवटीं ज्यानें स्वाभिमानाच्या कुंडांत आपल्या देहाची आहुति टाकिली, त्या प्रतापराव गुजराच्या पराक्रमाचें थोडेंसें वर्णन आम्ही खालीं देत आहोंत.

सन १६७२ उलटून गेला होता. महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं पेरलेल्या स्वातंत्र्याच्या बीजाचा कोंब १६४७ त बाहेर पडला. त्या कोंबाच्या मूळाशीं अनेक मराठे वीरांनीं आपल्या रक्ताचें सिंचन केल्यामुळें व आपल्या मांसाचें खत घातल्यामुळें, तो फारच सोसाट्यानें वाढून त्याचा आतां एक सुरम्य व पल्लवयुक्त वृक्ष बनला होता; व त्या वृक्षाचीं मधुर फळें महाराष्ट्रीयांस लव-करच चाखावयास मिळतील, अशी प्रत्येकाच्या मनाची खात्री झाली होती. हा वृक्ष उलथून पाडण्यासाठीं मध्यंतरीं यवनी सैन्याच्या अनेक वावटळी महाराष्ट्राकडे आल्या. पण नानाविध संकटें सोसून वाढविलेल्या त्या वृक्षाचें संगोपन करण्याकरितां मराठे पठ्ठयांनीं आपल्या छातीचे अभेद्य कोट केल्यामुळें, त्या वृक्षाला त्या वावटळीपासून यत्किंचित्‌ही इजा पोहोंचली नाहीं. मराठी राज्याची फारच झपाट्यानें उभारली जाणारी इमारत जमिनदोस्त करण्याकरितां अवरंगजेबानें व विजापूरवाल्यांनीं आपली शिकस्त केली. पण त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ होऊन, मराठ्यांनीं आरंभिलेली स्वराज्याची इमारत जास्त जास्तच जोरानें उठत चालली. तरीपण अवरंगजेब किंवा विजापूरवाले नाउमेद झाले नाहींत. स्वातंत्र्यासाठीं मराठ्यांनीं सुरू केलेली धडपड जागच्या जागीं दडपून टाकण्यासाठीं ते योग्य वेळेची वाट

डोळयांत तेल घालून पाहत बसले होते. इतक्यांत सुरत शहर लुटून मोंगलांच्या मुलुखांत चौथाई व सरदेशमुखी हे हक्क मराठे वसूल करीत आहेत, ही बातमी अवरंगजेबाला कळली. शिवाजीचें हें कृत्य पाहून अवरंगजेबाच्या अंगाचा तिळपापड झाला; व जो आज आपल्या मुलुखाचे तुकडे तोडीत आहे, तो उद्यां दिल्लीस येऊन प्रत्यक्ष आपल्या शरीराचेही लचके काढण्यास कमी करणार नाहीं अशी त्याला भीति वाटून, तो त्या काफीर शिवाजीची चांगलीच खोड मोडण्याच्या तयारीस लागला. लागलीच त्यानें मोहबतखान यांस स्वतंत्र अधिकार देऊन दक्षिणेंत स्वारीवर पाठविलें, आणि त्याच्या हाताखालीं दिलेलखान व एकलासखान या दोन महापराक्रमी सरदारांस दिलें.

दक्षिणेंत आल्याबरोबर मोहबतखानानें मराठ्यांचे किल्ले घेण्यास प्रारंभ केला. लागलीच त्यानें औंध वगैरे किल्ले काबीज करून सालेरीस वेढा घातला. तिकडे जाण्यासाठीं दिलेलखानानें आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या करून तो रवळ्याजवळ्या किल्ल्यापाशीं आला व त्यानें त्या किल्ल्यास वेढा दिला. त्यानें जंगजंग पछाडले, परंतु गड त्याच्या हातीं आला नाहीं. इकडे एकलासखानानें सालेरीस वेढा घातला आहे ही बातमी महाराजांस कळतांच, त्यांनीं आपला प्रधान मोरोपंत पिंगळे व सेनापती प्रतापराव गुजर यांस मोंगली सरदारांचा खरपूस समाचार घेण्याविषयीं आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें ते सालेरीकडे आपापल्या फौजेनिशीं गेले; आणि प्रतापराव सरनोबतांच्या घोडेस्वारांनीं एका बाजूनें व मोरोपंताच्या मावळे लोकांनीं दुसऱ्या बाजूनें एकलासखानाच्या सैन्यावर एकदम हल्ले सुरू केले. मोंगली सैन्यामध्यें व मराठ्यांमध्यें चांगलीच खडाजंगी जुंपली. दोन्ही पक्षांकडील वीर मोठ्या शिकस्तीनें लढूं लागले व लढाईची एकच धुमाळी माजून राहिली. लढाई अशा

रीतीनें ऐन भरांत आली असतांना, प्रतापरावानें आपल्या घोडे-स्वारांस इशारा देऊन पराभव झाल्याचा आंव आणून पळ काढिला. पराभव झाल्यामुळें मराठे पळून जात आहेत असें एकलासखानास वाटून तो प्रतापरावाच्या स्वारांचा पाठलाग करूं लागला. प्रतापरावानें मोंगली सैन्य इच्छित स्थळीं आलेलें पाहतांच एकदम उलटून एकलासखानावर जोराचा हल्ला केला. तेव्हां फारच निकराची लढाई झाली. तींत मोंगलांचा संपूर्ण पराजय झाला. एकलासखान स्वतः जरी मोठ्या शौर्यानें लढला, तरी त्यास जबर जखमा झाल्यामुळें तो मराठ्यांच्या हातीं सांपडला. मराठ्यांनीं एकलासखानाची उडविलेली भंबेरी पाहून दिलेलखानानें अवशिष्ट राहिलेल्या मोंगली लोकांसह औरंगाबादेचा मार्ग सुधारला, व एकंदरींत मराठ्यांच्या स्वातंत्र्यावर उसळलेलें काहूर तेवढ्या-पुरतें निवळून गेलें.

सालेरच्या या घनघोर रणकंदनांत प्रतापराव गुजरानें जो ऋावा लढविला व जें शौर्य दाखविलें तें अद्वितीय तर खरेंच; तरी पण तें त्यानें पुढें केलेल्या पराक्रमाइतकें मनाला चटका लाविण्या-सारखें खास नाहीं. या लढाईंत मराठ्यांनीं जरी मोंगलांची चांगलीच रग जिरविली, व सूर्याजी काकड्यासारख्या एका नामांकित मराठे सरदारानें स्वातंत्र्यासाठीं रणांगणावर आपला देह ठेविला, तरी या लढाईस लष्करी दृष्ट्याच फार महत्त्व प्राप्त झालें आहे. मराठ्यांना ‘ गनिमी काव्यानें ’ लढतां येत असूनही, उघड मैदानावर शत्रूच्या फौजेवर राजरोस हल्ला करून तिचा पुरा चुथडा उडवून देतां येतो, हेंच या लढाईनें मोंगलांना कळून आलें, व याच दृष्टीनें या लढाईस आपण महत्त्व दिलें पाहिजे. पण सालेर येथें मोंगलांशीं झालेली लढाई संपल्यावर, लवकरच विजापूरकरांशीं मराठ्यांचें जें युद्ध सुरू झालें व त्यांत प्रतापराव

गुजरानें अलौकिक शौर्य गाजवून अखेरीस स्वतःस धारातीर्थी पुनीत करून घेतलें, त्या योगानें प्रत्येक इतिहासप्रिय मनुष्याच्या व विशेषतः महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांत उच्च मनोवृत्ति उचंबळल्याशिवाय कधींही राहणार नाहींत. सालेरच्या रणमैदानावर मोंगली सैन्याची हड्डी नरम करून जरा कोठें विश्रांति मिळते न मिळते तोंच, मराठ्यांना विजापूरकरांशीं दोन हात करून त्यांचा खरपूस समाचार घेण्याकरितां पुन्हां एकदां कंबर कसणें भाग पडलें. सन १६७२ त विजापूरचा बादशहा अल्ली आदिलशाहा मरण पावला, व त्यामुळें त्याच्या दरबारीं सेनापति अबदुल करीम पठाण व वजीर खवासखान या दोघांमध्यें लढा पडून दुफळी झाली. मोंगलांशीं सख्य करून शिवाजीचा बंदोबस्त करावा, किंबहुना त्याचा व त्यांनीं आरंभिलेल्या कार्याचा समूळ उच्छेद करावा, असें अबदुल करीमचें म्हणणें पडलें; तर शिवाजीच्या मदतीनें मोंगलांना नामोहरम करून टाकावें, असें खवासखान म्हणत होता. पठाणाच्या हातांत सर्व सैन्य असल्यामुळें, खवासखानाची बाजू अर्थात् लंगडी पडली, व त्याला स्वस्थ मूग गिळून बसणें प्राप्त झालें. विजापूरच्या दरबारीं आपली सरशी झाली आहे असें पाहतांच, अबदुल करीमनें पूर्वी १६६२ त शहाजीच्या मध्यस्थीनें शिवाजीशीं झालेला तह मोडून मराठ्यांच्या मुलुखास उपद्रव देण्यास प्रारंभ केला. आपल्या वडिलांच्या भीडेस्तव अल्ली अदिलशहाशीं केलेला तह गुंडाळून ठेऊन आपल्यावर स्वारी करण्याचा अबदुल करीमचा बेत आहे असें महाराजांस कळतांच, त्यांनीं शत्रूची वाट न पाहतां विजापूरकरांच्या ताब्यांतील किल्ले काबीज करण्याविषयीं व शहरें लुटून फस्त करण्याविषयीं आपल्या सरदारांस हुकूम केला. त्या हुकुमाप्रमाणें हुबळी शहर लुटण्यांत आलें. व पन्हाळा, नांदेगिरी, परळी वगैरे

किल्ले काबीज करण्यांत आले, ही बातमी विजापूरच्या दरबारीं जाऊन पोहोंचतांच, अबदुल करीमला एक कुरापत मिळाल्यासारखी होऊन तो ताबडतोब मोठी फौज बरोबर घेऊन शिवाजीचें पारिपत्य करण्याकरितां निघाला. विजापूरी सैन्याला तोंड देण्याकरितां महाराज अगदीं जय्यत तयारींतच होते. त्यांनीं प्रतापराव सरनोबत यांस बोलावून आणून त्यांची पठाणावर योजना केली. प्रतापराव काय, अगदीं नवशिखांत योद्धा असल्यामुळें त्याला आपली नेमणूक झालेली पाहून अतिशय आनंद झाला, आणि त्या आनंदाच्या भरांत तो पठाणाची खायखाय जिरविण्याकारितां, पठाण ज्या दिशेनें मराठ्यांवर चाल करून येत होता त्या दिशेकडे आपल्या सैन्यासह निघाला. उंबराणी येथें उभयपक्षांची गांठ पडून लागलेंच लढाईस तोंड लागलें. विजापूरी लोकांनीं मराठ्यांवर हल्ला केला, तर महाराष्ट्राची स्वातंत्र्यश्री चोरून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या त्या पठाणाच्या सैन्यावर मराठे गडी चित्याप्रमाणें खवळून तुटून पडले. सर्वत्र हाणाहाणी व कांपाकांपी सुरू झाली. रणगर्जनांनीं दाही दिशा दणाणून गेल्या. सारांश, साऱ्या दिवसभर मराठे व विजापूरकर या दोहोंमध्यें मोठ्या धडाक्याचें रण माजून राहिलें.

विजापूरी सैन्याशीं एकीकडे अशा निकरानें लढत असतांना, त्याला पाण्याचा एक थेंब सुद्धां मिळूं नये, अशी प्रतापरावानें दुसरीकडे व्यवस्था केली. पाणी न मिळाल्यामुळें अबदुल करीमचे लोक दीन व व्याकुळ होऊन जेव्हां पटापट प्राण सोडूं लागले, तेव्हां 'आम्हांस पाण्यावांचून मारूं नका, आम्ही इतःपर मराठ्यांकडे वुसल्या वांकड्या डोळ्यानेंही पाहणार नाहीं' अशी पठाणानें दीन स्वरानें प्रतापरावाची करुणा भाकिली. अबदुल करीमचे ते दीनपणाचे उद्गार ऐकून व पाण्या-

वांचून विजापूरी सैन्याला तडफडतांना पाहून, त्या शूर व उदारधी प्रतापरावाचें अंतःकरण द्रवलें, व त्यानें अबदुल करीमशीं तह करून त्याला व त्याच्या लोकांना मुबलक पाणी पुरविलें. शरणागतास मरण देऊं नये हें तत्व मराठयांच्या हाडीं मासीं जितकें खिळलेलें आहे, तितकें तें दुसऱ्या लोकांच्या कचित्‌च असेल! ही तहाची हकीगत महाराजांस समजतांच त्यांना अतिशयच वाईट वाटलें. कचाटींत सांपडलेल्या पठाणाचा चुराडा करण्याचें सोडून देऊन त्याच्याशीं आपणांस न विचारतां प्रतापरावानें तह केला म्हणून महाराजांना अतिशय राग आला, व रागाच्या आवेशांत ‘ करीमची पूर्ण खोड मोडल्याशिवाय आम्हांस तोंड दाखवूं नये ’ असा एक खरमरीत निरोप त्यांनीं प्रतापरावास पाठविला. हा निरोप येण्यापूर्वी प्रतापरावास असें वाटत होतें कीं, आपण केलेल्या सत्कृत्याबद्दल महाराज हे संतुष्ट होऊन आपली पाठ थोपटतील. पण जेव्हां त्याला हा निरोप कळला, तेव्हां त्याला आपल्यावर आकाश कोसळल्यासारखें वाटलें. ते निंदाव्यंजक शब्द त्याच्या हृदयांत शल्याप्रमाणें घुसले. महाराजांनीं केलेली निर्भर्त्सना त्याच्या मनाला डाचूं लागली. महाराजांनीं आपली मानखंडना केली असेंही एक वेळेस त्याला वाटूं लागलें. पण ज्यांची आपणावर अलोट प्रीति व ज्यांच्या हृदयाचा आपण कालिजा आहों, ते आपले पुण्यश्लोक शिवाजी महाराज आपणास उगीच असा निरोप कधींही धाडावयाचे नाहींत, असें त्याचें मन त्याला दुसऱ्याच क्षणीं सांगूं लागलें. तो बुचकळ्यांत पडला. त्याला यांतील इंगित कांहींच उमगेना. ज्या अबदुल करीमावर दया केल्याबद्दल महाराजांचा आपणावर इतका रोष झाला आहे, त्याच्या नरडीचा घोट घेऊन त्याच्या रक्तानें लालभडक झालेलें तोंड महाराजांस दाखवीन, एरवीं दाखविणार नाहीं, असा

त्यानें आपल्या मनाचा पक्का निश्चय केला, व तो पठाणावर झडप घालण्याकरितां वाट पहात बसला. त्याला तो पठाण आणि महाराजांचा तो मर्मभेदक निरोप यांशिवाय दुसरें कांहींही दिसेना. त्याला अन्न गोड लागेना व झोंप येईना. त्याच्या जीवाची एकसारखी तळमळ चालली.

इतक्यांत पठाणानें आपल्याबरोबर झालेला तह मोडून महाराजांच्या मुलुखास त्रास देण्याचा उपक्रम केला आहे, अशी त्यास बातमी लागली. ती बातमी कळतांच, आपण पठाणाची उगीच कींव केली, तो कचाटींत सांपडला असतांना त्याला चेंचून टाकिलें असतें तर फार बरें झालें असतें, असें त्यास वाटलें; व त्या सर्पाला मोकळें सोडल्याबद्दल महाराजांनीं जी आपली निंदा केली ती अगदीं यथार्थ आहे, अशी त्याची खात्री झाली. अगोदरच संतापानें त्याच्या सर्वांगाचा दाह झालेला, त्यांत पठाण मराठ्यांच्या मुलुखास उपद्रव करीत आहे असें कळतांच, आगींत तेल ओतल्याप्रमाणें होऊन त्या कपटी व विश्वासघातकी पठाणाचा कंठनाळ केव्हां एकदां चिरीन असें त्यास होऊन गेलें. लागलेंच तो पठाणावर त्वेषानें आपल्या सैन्याची नीट व्यवस्था न करतां चाल करून निघाला. आपल्या फौजेची नीट तयारी करण्याइतका त्या मानी व धाराशूर जवानमर्दाला दम होता कोठें? व खऱ्या मानधनाढ्य मनुष्याला तो असणार कसा? जेसरीपाशीं पठाणास गांठून त्यानें त्याजवर अचानक हल्ला केला. एकदांची लढाईस सुरुवात झाली. 'दीन दीन' व 'हरहर महादेव' या रणगर्जनांचा प्रचंड ध्वनि नभोमंडळ भेदून वर जाऊं लागला. रणसंग्रामाचा एकच धुमाकूळ उडून राहिला. रक्ताचे पूर वाहूं लागले. हाडामासांचा चिखल होऊन त्यांत उभयपक्षांकडील वीरांचे पाय रुतूं लागले. मुसल-

मानांच्या समशेरीनें व मराठ्यांच्या भाल्यानें हजारों लोकांचे बळी घेतले. त्या संग्रामाच्या दंगलींत प्रतापरावाच्या भाल्याच्या अचूक माऱ्यामुळें शेंकडों यवनांचीं डोकीं हवेंत चेंडूप्रमाणें उडूं लागलीं. तो प्रत्यक्ष कर्दनकाळासारखा भासूं लागला. त्याच्या शरीरावर मुसलमानांच्या समशेरीनें पुष्कळ जखमा केल्यामुळें जरी त्यांतून एकसारखा रक्तस्राव चालला होता, तरी त्यांस न जुमानतां तो पठाणाकडे रोंख धरून लढाईच्या गर्दींतून तसाच पुढें चालला. त्याच्या शरीरांतून त्या वेळेस वास्तविक रीतीनें रक्त वाहत नसून अतुल शौर्य, दृढ निश्चय व करारीपणा यांचा रसच बाहेर पडत होता असें म्हटलें पाहिजे! हजारों मुसलमानांचा सप्पा उडवीत तो तसाच निकरानें पुढें लढत गेला. परंतु पठाणाच्या लोकांनीं त्याला लवकरच गराडा घातला. मुसलमानांनीं आपणांस आतां चोहोंबाजूंनीं घेरलें आहे असें पाहतांच, त्याच्या वीरश्रीला दुप्पट जोर आला, व तो एखाद्या बेहोष व बेताल झालेल्या माणसाप्रमाणें लढूं लागला. त्याच्या नेत्रांतून बाहेर पडणाऱ्या संतापाच्या ठिणग्यांनीं पुष्कळ मुसलमान होरपळून गेले, व त्याच्या भाल्याच्या तीव्र टोंकापासून खळाळणाऱ्या पाण्यांत यवनी सैन्यांतील अनेक लोक बुडून ठार झाले. तरीपण त्याच्याभोंवतीं उसळलेल्या शत्रूच्या सेनासमुद्रापुढें त्याचें विशेषसें चालेना. तो जरी आपल्या भाल्याच्या आधारावर तो सेनासागर तरून आपलें इष्ट स्थळ जें अबदुल करीम तिकडे जाण्यासाठीं धडपडत होता, तरी त्याचे सारे प्रयत्न व्यर्थ गेले. त्याच्या शरीरावर झालेल्या जबर जखमांतून आतां रक्ताचे लोट वाहूं लागले. प्रतिक्षणीं तो जास्त जास्त व्याकूळ होत चालला. तो दीर्घ उसासे टाकूं लागला. अबदुल करीमचें रक्तानें माखलेलें शीर महाराजांच्या चरणांजवळ सादर करतां येत नाहीं,

म्हणून त्यास अत्यंत उद्वेग वाटला. तरीपण महाराजांनीं म्हटल्याप्रमाणें त्यांना आपलें काळवंडलेलें तोंड दाखवीत नाहीं असें वाटून त्याला आनंदही झाला. आनंद व उद्वेग, सुख व दुःख, या दोन परस्परविरोधी मनोविकारांनीं त्याच्या हृदयांत एकच काहूर उसळून दिलें. आस्ते आस्ते मरणकाळची ग्लानी त्याच्या शरीरावर दिसूं लागली. हातपाय गार पडत चालले. नाड्या सुटत चालल्या. श्वासोश्वासांत चलबिचल उडाली. लागलेल्या घरघरीच्या आवाजांत मंदत्व येऊं लागलें. व सरतेशेवटीं त्याच्या मर्त्य कुडींतील अमर्त्य ज्योत स्वर्गांतील ज्योतींत लीन होऊन गेली.

लढाईंत प्रतापराव पडलेला पाहिल्यावर मराठ्यांचा धीर सुटला व ते सैरावैरां पळूं लागले. पण इतक्यांत हंसाजी मोहिते नांवाचा एक पंचहजारी सरदार पुढें होऊन, पूर्वीं तानाजी पडला असतां सूर्याजीनें जसा पळणाऱ्या मराठ्यांना धीर देऊन मोठ्या पराक्रमानें सिंहगड काबीज केला, त्याचप्रमाणें त्यानें प्रतापरावाच्या लोकांची निर्भर्त्सना करून त्यांना परत फिरविलें, व शौर्याची शिकस्त करून पठाणाचा पुरा धुव्वा उडवून दिला. आपला आवडता प्रतापराव रणांगणावर पतन पावल्याची हकीगत महाराजांस समजतांच, त्यांना गहिंवर आला, त्यांचे डोळे पाण्यानें डबडबले, व त्यांच्या मुखांतून "आपण प्रतापरावास फत्ते न करतां तोंड दाखवूं नये असें जें लिहून पाठविलें, त्यासारखें त्यानें करून बरें म्हणविलें" असे दुःखोद्गार बाहेर पडले. पुढें त्यांनीं प्रतापरावाच्या अलौकिक शौर्याचें, स्वाभिमानाचें व करारीपणाचें स्मारक म्हणून त्याची कन्या जानकीबाई हिचा राजाराममहाराजांशीं विवाह केला! स्वाभिमानाला पेटून जेसरीच्या रणमैदानावर प्रतापरावानें जो अनुपम पराक्रम दाखविला, व अखेरीस असिधारातीर्थीं स्वतःस पावन करून घेतलें, त्याचें

वर्णन वाचल्यावर कोणता सहृदय महाराष्ट्रीय वाचक सद्गदित होऊन प्रेमातिशयानें ढसढसां रडूं लागणार नाहीं बरें? पुण्य-प्रतापी रावप्रतापा! जेसरीच्या रणांगणावर अद्वितीय शौर्य गाजवून तूं सतराव्या शतकांतील मराठ्यांच्या अंगीं बाणलेला स्वाभिमान जो व्यक्त केलास, त्याचें यथार्थ वर्णन करणें हें खरोखरच आम्हांस अशक्य आहे. आपली मानखंडना झाली असें वाटून महाराजांना आपलें तोंड न दाखविण्याकरितां तूं आपला देह रणांगणीं ठेविलास, व अक्षय्य सुखाचा उपभोग घेण्याकरितां तूं स्वर्गाची वाट धरलीस. पण तूं आपल्याबरोबर तेथें महाराष्ट्राचा स्वाभिमानही नेलास, असें आम्हांस वाटतें. नाहींतर अवघ्या शेंदीडशें वर्षांच्या अल्पावधींत तुझ्या अस्सल वंशजांच्या ठायीं या गुणाचा अत्यंताभाव काय म्हणून दृष्टीस पडावा? विसाव्या शतकांतील मराठे इतके निगरगट्ट, इतके लत्कोडगे, इतके स्वाभि-मानशून्य कां दिसावेत व असावेत? जुल्लम करणारांच्यापुढें गोंडा घोळण्याकडे आमच्या मनाची नीच प्रवृत्ति कां बरें असावी? आम्हांस छळणारांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्याइतक्या आमच्या जिभल्या आतुर कां व्हाव्यात? हरएक बाबतींत आम्हांस नागविणाऱ्यांना मदत करण्यासाठीं आमचे हात कां म्हणून तयार व्हावेत? तेव्हां प्रतापरावा! तूं आपल्या प्रतापांतील कांहींतरी अंश आपल्या वंशजांच्या ठायीं जागृत कर. मान गेली तरी बेहेत्तर आहे, पण आपला मान म्हणून कधींही गमवावयाचा नाहीं, ही स्फूर्ति तूं आमच्या अंतःकरणांत उत्पन्न कर, व आम्हांस खऱ्या देशाभि-मानाचा धडा शिकीव. परंतु तुझ्यासारख्या आमच्या रणशूर पूर्व-जांच्या अंगांतील गुण आमच्यासारख्या तुझ्या 'रणदूर' वंशजां-च्या ठायीं उतरण्याचा संभव आहे काय? खरोखरच, ज्या दिवशीं ते गुण आमच्यांत वास करावयास लागतील, तो महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासांतील सुदिन असा खचित समजला जाईल!

## रत्न सातवें.

# येसाजी कंक.

• भक्त्या कार्यधुरं वहन्ति कृतिनस्ते दुर्लभास्तादृशाः ॥

( केवळ निरपेक्ष बुद्धीनें जे स्वामिकार्यार्थ देह झिजवितात ते तुझ्यासारखे धन्य पुरुष या लोकीं दुर्लभ होत.)

सन १६४६ पासून तों सन १७०० पर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे एक नानाप्रकारच्या गुणी लोकांचा रत्नाकर होय. या खाणींतून त्या वेळीं नानागुणसंपन्न अशीं नररत्नें बाहेर पडलीं, व त्यांनीं आपल्या अंगांतील नैसर्गिक तेजानें महाराष्ट्रभूचें सर्वांग देदीप्यमान करून सोडलें. या चौपन्न वर्षांच्या अवधींत तत्कालीन महाराष्ट्रीय वीरांनीं व मुत्सद्यांनीं जीं शौर्याचीं व शहाणपणाचीं अचाट व अवजड कृत्यें केलीं, त्यांना जगांतील इतर देशांच्या इतिहासांत तोड सांपडावयाची नाहीं. हा चौपन्न वर्षांचा इतिहास म्हणजे एक सद्गुणांचा अवाढव्य सागर होय. या सागराला त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या तलवारबहादर मर्दांच्या व कलमबहादर मंत्र्यांच्या अनेक स्पृहणीय व राष्ट्रपोषक गुणांच्या नद्या जाऊन मिळाल्या आहेत. म्हणून ज्या कोणाला आपल्या अंगीं पूर्वजन्मींच्या पापांमुळें वसत असलेल्या दुर्गुणांचें अशेष क्षालन करावयाचें असेल, त्यानें महाराष्ट्राच्या या अर्ध शतकाच्या इतिहासोदधींत अवगाहन करावें, व अंगीं असलेल्या देशहितविघातक दुर्गुणांचें परिमार्जन करून घ्यावें. या चौपन्न वर्षांच्या अवधींत त्या वेळच्या आपल्या पूज्य पूर्वजांनीं जे शारिरीक व बौद्धिक पराक्रम करून आपल्यावर जे अनंत व अतर्क्य उपकार करून ठेविले आहेत, त्यांची आठवण झाली म्हणजे त्यांच्या ठायीं प्रत्येक रसिक व कृतज्ञ

महाराष्ट्रीयाचें मन तल्लीन होऊन जातें. कितीतरी अस्सल त्यांचा तो धर्माभिमान! कितीतरी प्रेमळ त्यांची ती देशभक्ति? व किती तरी तेजाळ त्यांचें तें आचरण? कोणत्याही दृष्टीनें त्यांच्या वंदनीय व अनुकरणीय कृतीकडे पाहिलें असतां मन तल्लीन होऊन जातें, वाणी बंद पडते व शरीराचे इतर व्यापार स्तब्ध होतात. त्यांनीं केलेल्या अमानुष व दैविक पराक्रमांचीं वर्णनें वाचून डोळे पाण्यानें डबडबून जातात, व ते कृतज्ञतापूर्वक त्यांचें उष्णोदकानें तर्पण करूं लागतात. श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनीं महाराष्ट्रधर्माचें प्रतिपादन करून जो नवीन “ धारकरी पंथ ” अस्तित्वांत आणला, त्या पंथाची दीक्षा घेऊन या चौपन्न वर्षांत शेंकडों महाराष्ट्रधर्मीय संतांनीं जगदंबेची व देशांबेची मनोभावें सेवा केली. उजव्या हातांत भाला व डाव्या हातांत ढाल घेऊन मुखावाटें ‘हरहर महादेव’ या अष्टाक्षरी मंत्राचा जप करीत या महाराष्ट्रीय गोंधळ्यांनीं जगदंबेचा व देशांबेचा गोंधळ अनेक रणमैदानांवर घातला. त्यांनीं या अंबिकाद्वयाला वेळोवेळीं आपल्या उष्ण रुधिरानें स्नान घालून आपल्या देहांचे महानैवेद्य त्यांना अर्पण केले. आपल्या भक्तांची ही अव्यभिचारिणी भक्ति पाहून जगदंबा व देशांबा या दोघीजणी प्रसन्न होऊन त्यांनीं प्रसाद म्हणून आपल्या शूर भक्तांच्या गळ्यांत स्वातंत्र्याचा बहुमोल हार घातला. या चौपन्न वर्षांच्या अवधींत ज्या महाराष्ट्रधर्मीय महासाधूंनीं धर्मासाठीं व देशासाठीं असिधारातीर्थांत कायमच्या बुड्या मारल्या, त्यांचीं सगळ्यांचीं नांवें येथें नमूद करणें शक्य नाहीं. त्या सर्वांनीं आपल्या मर्दानी भक्तीची कमाल करून सोडली. या सर्व संतांमध्यें एक त्रयी अशी आहे कीं, जिचें नामस्मरण प्रत्येक अस्सल बीजाच्या मराठ्यानें प्रेमळ अंतःकरणानें सांजसकाळ केलें पाहिजे. या त्रयीनें महाराष्ट्रावर जे अगणित उपकार केले आहेत, त्यांना माप

नाहीं. ते अनंत व अतर्क्य आहेत. जर ही त्रयी सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत महाराष्ट्रांत जन्मास आली नसती, तर एक तरी हिंदुधर्मीय मराठा जिवंत राहूं शकला असता किंवा नाहीं, याची आम्हांस जबर शंका आहे. या त्रयीनें महाराष्ट्रीयांच्या हिंदुत्वाचें रक्षण केलें, आणि म्हणूनच तिचें आपण सांजसकाळ स्मरण केलें पाहिजे. ही त्रयी म्हणजे श्रीसद्गुरू रामदासस्वामींचे शिवबा, तानबा व येसबा होत! सर्व भरतखंड फिरून आल्यावर हिंदुधर्माचें संरक्षण करण्याची शक्ति फक्त या आधुनिक ब्रह्मा, विष्णु व महेश यांमध्येंच आहे, अशी दासांच्या मनाची खात्री झाली, व त्यांनीं या त्रयीला हिंदुधर्माचें संरक्षण करण्यासाटीं प्रोत्साहन दिलें. श्रीसमर्थांसारखा अधिकारसंपन्न गुरू आणि त्यास शिवबा, तानबा व येसबा यांच्यासारखे सत्पात्र शिष्य मिळाल्यावर त्यांनीं हातीं घेतलेलें काम तडीस गेलें, यांत आश्चर्य तें कोणतें! जगदंबेनें त्यांच्यावर कृपा केली, व त्या कृपेच्या प्रभावानें हिंदुपदपादशाहीची स्थापना होऊन हिंदुधर्माचें संरक्षण झालें. दासांच्या तीन पट्टशिष्यांपैकीं एकानें म्हणजे येसबानें एका नाजूक प्रसंगीं दाखविलेल्या दुर्मिळ गुणांची हकीगत आम्ही येथें देण्याचें योजिलें आहे.

ती वेळ सन १६७७ सालांतील होती. महाराजांना राज्याभिषेक होऊन तीन वर्षें झालीं होतीं. फारा दिवसांनीं दक्षिणेंतील यवनी अंमल नाहींसा होऊन त्याच्या जागीं मराठी अंमल सुरू होण्याचा सुयोग आला होता. अशा वेळीं कर्नाटकांतील आपल्या वडिलार्जित जहागिरीची व्यवस्था आपले सावत्र बंधु व्यंकोजीमहाराज कसे काय चालवीत आहेत, हें प्रत्यक्ष पाहण्याकरितां महाराजांनीं कर्नाटकावर स्वारी करण्याचा बेत केला. तीस हजार स्वार व पन्नास हजार पायदळ बरोबर घेऊन शिवबांची

स्वारी कर्नाटकाची मोहीम करण्यास निघाली. ज्या महात्म्याजवळ अवघ्या तीस वर्षांपूर्वी तोरण्याचा किल्ला उघड रीतीनें हस्तगत करून घेण्यास पुरें पांचशें पायदळ नव्हतें, ज्या विभूतीला हा किल्ला युक्तीनें सर केल्यावर मोंगली दरबारांत व विजापुरी दरबारांत ‘ डोंगरांतील उंदीर ’ असें अस्पृहणीय व हिडीस टोपणनांव देण्यांत आलें होतें, व ज्या डोंगरांतल्या जिवंत उंदराला पकडून नेण्याकरितां विजापुरी दरबारांतून अफजुलखान बरोबर एक लोखंडी सांपळा घेऊन आला होता, त्याच महात्म्याजवळ आतां प्रतापगडावरील जगदंबेच्या कृपेनें ऐशीं हजार पागा झाली होती; त्याच डोंगरांतील उंदराला पाहून मोंगली व विजापुरी मांजरें भिऊं लागलीं; व त्याच महाराष्ट्रीय उंदरानें आपल्या काळदंतांनीं हीं यवनी तक्तें कुरतडून टाकण्याचा बहुतेक घाट घातला. छत्रपतींच्या या चरित्रावरून असें निःसंशय सिद्ध होतें कीं, मनुष्य आकाशस्थ परमेश्वरावर व हृदयस्थ सदसद्विवेकबुद्धीवर भरंवसा टाकून जर भगीरथ व भारदस्त प्रयत्न करील, तर त्याच्या प्रयत्नाला यश हटकून आलेंच पाहिजे. शिवचरित्रावरून असा एक दुसरा सिद्धांत निघतो कीं, कोणत्याही राष्ट्रीय प्रयत्नांत स्वार्थाचा लेश असतां कामा नये. शिवाजीमहाराजांचा हिंदुपदपादशाही स्थापन करण्याच्या उद्योगांत काडीचाही स्वार्थ नव्हता, हें कोणींही कबूल करील. त्यांचा हेतु इतका शुद्ध व निरभिलाषी होता म्हणूनच त्यांच्या प्रत्येक प्रयत्नाला जगदंबेनें यश दिलें, व म्हणूनच हिंदुपदपादशाहीची स्थापना झाली.

ज्या वेळीं महाराजांनीं कर्नाटकावर स्वारी करण्याचा बेत केला, त्या वेळीं गोवळकोंड्यास कुतुबशहा या नांवाचा बादशहा राज्य करीत होता. त्याच्या पदरीं मादण्णा व आकण्णा हे दोघे सख्खे भाऊ होते. कुतुबशहाचें व विजापुरी बादशहाचें वैमनस्य

असल्यामुळें प्रसंगविशेषीं आपणांस कोणाचा तरी पाठिंबा पाहिजे म्हणून त्या बादशाहानें शिवाजी महाराजांपाशीं तह करण्याचा आपला हेतु प्रदर्शित केला; आणि आपला दिवाण जो मादण्णा ऊर्फ मदनपंत यांच्या द्वारें कुतुबशहानें ही गोष्ट महाराजांच्या कानांवर घातली व महाराजांनीं त्या गोष्टीला रुकार दिला. कर्नाटकांत जातांना वाटेवर गोवळकोंड्यास जाण्याचा महाराजांनीं निश्चय केला, व त्याप्रमाणें सन १६७७ सालच्या मार्च महिन्यांत मराठी सैन्यानें आपले डेरे गोवळकोंड्याच्या बाहेर लाविले. रीतीप्रमाणें बादशहानें महाराजांचा पाहुणचार करून त्यांना मेजवान्या आणि बहुमोल व उत्तम उत्तम जडजवाहिराचे अलंकार दिले. एके दिवशीं गोवळकोंड्यांत बादशाही वाड्याच्या पुढील पटांगणांत बादशहा व महाराज आपआपल्या सर्व सरदारांसह बसले आहेत, बादशहाकडून मादण्णा निरनिराळ्या बादशाही कामांबद्दल प्रश्न विचारीत आहेत, व त्यांच्या प्रश्नांना महाराजांच्या तर्फे रघुनाथपंत हणमंते उत्तरें देत आहेत, असा प्रकार चालला असतां, एकदम बादशहानें रघुनाथपंतांना असा प्रश्न केला कीं, " शिपाईगिरीची, मनुष्याची तारीफ फार ऐकली; ती समक्ष पहावी असें आमचें मानस आहे." यावर पंतांनीं असें उत्तर दिलें कीं, " हजरत, एक एक शिपाई हत्तीचे बराबरीचा आहे." मग बादशहानें प्रत्युत्तर केलें कीं, " पंत, तुम्ही हत्तीचे बराबरीचे सांगतां, तरी हत्तीशीं झुंजेल काय?" हें ऐकून रघुनाथपंतानें असें उत्तर दिलें कीं, " अशक्य काय? हत्तीची पत्रो धरीत नाहींत." रघुनाथपंताच्या तोंडचें हें निर्भयतेचें वाक्य श्रवण करून बादशहाची असलीं हत्तीशीं झुंजणारीं माणसें पाहण्याची जिज्ञासा अतिशयच पेटून गेली. बादशहानें लागलींच " आज लढाई पाहूं, एक शिपाई आणावा," असें पंतांना सांगितलें.

बादशहानें प्रदर्शित केलेली इच्छा रघुनाथपंतांनीं महाराजांच्या कानांवर घातली, व तिला लागलीच महाराजांनीं रुकार दिला.

ती वेळ संध्याकाळची होती. दिवसभर आकाशपंथ चालून चालून दमले भागलेले सूर्यनारायण विश्रांति घेण्याकरितां आपल्या शयनमंदिरांत शिरण्याच्या अगदीं बेतांत होते. संध्याकाळीं देवदर्शनें घेऊन नरनारी आपआपल्या घरीं जात होत्या, आणि देवळांतून व मशिदींतून ठेवण्यांत आलेल्या नगाऱ्यांवर नुकतेंच टिपरूं पडलें होतें. अशा वेळीं एकदम राजवाड्यासमोर इशारतीची नौबद वाजूं लागली. एकाएकीं ही नौबद कां वाजूं लागली आहे, हें पाहण्याकरितां निरनिराळ्या रस्त्यांतून माणसांचे थवेच्या थवे व झुंडीच्या झुंडी राजवाड्याकडे लोटूं लागल्या. थोडा वेळ दम खाऊन दवंडीवाल्यानें तेथें जमलेल्या नगरवासी लोकांना असें सांगितलें कीं, " आज हत्तीची व माणसाची झुंज होणार आहे. तरी ज्यांना ती पहावयाची असेल, त्यानें राजवाड्यासमोरील पटांगणांत ताबडतोब यावें." दवंडीवाल्याचे हे शब्द कानीं पडतांच लोकांनीं घरची वाट न धरतां पटांगणाकडे आपलीं पावलें वळविलीं. थोड्याच वेळांत तें पटांगण माणसांनीं गच्च भरून गेलें. जिकडे तिकडे डोकींच डोकीं दिसूं लागलीं. मुंगीला फिरण्याला सुद्धां जागा उरली नाहीं. पटांगणांत जागा न मिळाल्यामुळें कांहीं हौशी व आतुर लोक पटांगणाशेजारीं असलेल्या झाडांच्या फांद्यांवर व दुबेळक्यांत जाऊन बसले. जिकडे तिकडे जागा न मिळाल्याबद्दल एकच कोलाहल उडून गेला. इतक्यांत पटांगणाच्या मध्यभागीं लोखंडी मेखा ठोकून व त्याला मोठमोठाले दोर बांधून एक तात्पुरता हौदा करण्यांत आला. बादशहाच्या हुकुमावरून हत्तीखान्यांतील एक मदोन्मत्त हत्ती आंत सोडण्यांत आला. ज्या वेळीं तो काळाभोर हत्ती पटांगणांत माहुतानें

आणिला, त्या वेळेस तेथें जमलेल्या लोकांना हें एक टेंकाड चालून येत आहे, असा भास झाला. त्या हत्तीची ती जमिनीवर लोळणारी शुंडा, त्याचे ते दोन दोन हात पुढें आलेले दांत, दगडाच्या खांबांसारखे त्याचे ते सळनळीत पाय, व एखाद्या भल्यामोठ्या कणगीप्रमाणें त्याचें तें अगडबंब पोट पाहून जमलेल्या मंडळींच्या चेहेऱ्यावर भयाची छटा दिसूं लागली. मनुष्य कितीही उंच व जोरदार असला तरी त्याच्याच्यानें माजलेल्या हत्तीशीं तर राहूंद्याच, पण एखाद्या रोडावलेल्या हत्तीशीं सुद्धां झुंज करवावयाची नाहीं, हा प्रेमळ विचार मनांत येऊन तेथें जमलेल्या लोकांचे चेहेरे निस्तेज व फिक्के पडले. अशा मस्त हत्तीशीं झुंज खेळणाऱ्या इसमाला बायको असेल ना? त्याच्या पदरीं दोन कच्चींबच्चीं असतील ना? त्याच्या वृद्ध आईबापांना तोच म्हातारपणीं आधार असेल ना? तरमग मौजेखातर व फक्त चैनीसाठीं अशा मनुष्याला बळी पाडण्यांत कांहीं हंशील नाहीं. अशा तऱ्हेचा प्रेमळ विचार मनांत येऊन कांहींजण ही झुंज बंद ठेवावी म्हणून बादशहाची विनंति करण्यासाठीं आपल्या जागेवरून उठले सुद्धां. पण इतक्यांत हत्तीशीं झुंजणारा तो मर्द पटांगणाच्या उलट बाजूला येऊन उभा राहिला. तो बुटकाच होता; पण तालमीनें त्याचें अंग चांगलें कसलेलें होतें. त्याची ती पेलेदार छाती, विळखर दंड, भरलेली गर्दन, फिरलेल्या मांड्या व कपाळावरील घट्टा, हे त्याच्या तालिमबाजपणाची साक्ष देत होते. त्याचें वय चाळिशीच्या आंत बाहेर होतें; तरीपण तो एखाद्या तरुण बांडाप्रमाणें तेजःपुंज व तरतरीत दिसत होता. त्याच्या उजव्या हातांत एक पल्लेदार पट्टा असून, डाव्या हाताला एक रुमाल गुंडाळलेला होता. जरी त्या मर्दाचें शरीर पिळलेलें होतें, तरी त्या पर्वतप्राय हत्तीपुढें तो किचकट दिसत होता. त्याच्या-

कडे पाहून व त्या हत्तीकडे पाहून तेथें जमलेल्या प्रत्येकजणाची छाती धडधडूं लागली. त्या शूर पण लहान जवानाची आतां धडगत नाहीं, असें प्रत्येकाच्या मनानें घेतलें. पुढें भयंकर व शोककारक परिणाम होणार, अशी प्रत्येकानें आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली. देवा, तूं त्याचें रक्षण कर, अशी जो तो परमेश्वराची मनांतल्या मनांत प्रार्थना करूं लागला. सर्वांचे डोळे आळीपाळीनें त्या जवानाकडे व त्या हत्तीकडे लागून राहिले लोकांच्या मनांत अशी खळबळ उडून राहिली असतां, त्या जवानाच्या चेहऱ्यावर भीतीची अस्पष्टही छटा दिसली नाहीं; त्याच्या चेहऱ्यांत मुळींच चलबिचल झाली नाहीं अगर त्याच्या अंगांत कांपरें भरलें नाहीं. धिम्मेपणानें व ऐटीनें पावलें टाकीत टाकीत त्यानें बादशहापुढें जाऊन अदबीनें सलाम केला. बादशहाला सलाम केल्यावर त्यानें आपले धनी जे शिवाजीमहाराज त्यांच्यापुढें प्रेमानें व प्रीतीनें दंडवत घातलें. व चोहोंबाजूला फिरून त्यानें तेथें जमलेल्या सर्व मंडळींना रामराम केला. याप्रमाणें सर्वांना रामराम करून त्या जवानानें आपल्या उजव्या हातांतील पट्ट्याला एक झटका दिला, व हत्तीकडे तोंड करून तो पवित्र्यावर उभा राहिला. हा हत्तीशीं झुंजण्यास तयार झालेला जवान कोण असावा बरें ? तो कोणीतरी धर्मवेडानें बहकलेला मर्द असला पाहिजे. तो देशभक्तीनें चेतलेला वीर असला पाहिजे. त्या वेळीं तर असे मर्द किंवा वीर महाराष्ट्रांत फक्त तीनच होते. पैकीं शिवबा तर बादशहाशेजारीं बसले होते. तानबांनीं तर सिंहगडावर अति पावन व पवित्र अशा असिधारातीर्थांत कायमची बुडी मारून केव्हांच मोक्षपदाची जोड करून घेतली होती. राहतां राहिले येसबा. आणि खरोखर हत्तीशीं झुंजण्यास येसबांशिवाय दुसरा कोण मायेचा पूत तयार होणार बरें ?

आतां बादशहानें हुकूम दिला, व लागलीच हत्तीच्या गंडस्थळावर बसलेल्या माहुतानें खालीं उडी टाकली. भाल्याच्या तिखट टोंकांनीं त्या हत्तीला चिडविण्यांत येऊन त्याला येसबांच्या अंगावर सोडण्यांत आलें. एकमेकांनीं एकमेकांकडे एक क्षणभर लक्ष लावून पाहिलें, व तत्काळ ते एकमेकांच्या अंगावर धांवून गेले. हत्तीच्या सोंडेंत न सांपडतां येसबांची त्याच्यावर वार करण्याची कुशलता पाहून तेथें जमलेल्या मंडळींना आश्चर्य व आनंद वाटला. येसबांच्या पट्ट्याच्या सफाईदार वारांनीं त्या हत्तीच्या सर्वांगाला जागजागीं चिरा पडून त्यांतून रक्ताचे पाट वाहूं लागले. तें रक्त जमिनीवर सांडून धुरळ्यांत मिसळून सर्व पटांगण तांबड्या लाल चिखलानें भरून गेलें. पट्ट्याच्या असह्य मारानें तो हत्ती फारच चवताळला होता. तो आतां बेलाशक येसबांच्या अंगावर तुटून पडूं लागला. इकडे येसबांची स्थिति फारच भयंकर होत चालली. बराच वेळ सर्व पटांगणभर धांवल्यामुळें त्यांचें शरीर घामानें चिंब झालें. चुकून माकून मध्येंच त्यांचा पाय घसरे, व कैक वेळां ते मोठ्या मुष्किलीनें त्या हत्तीच्या सोंडेच्या टप्प्यांतून सुटले. आतां अगदीं निकराची वेळ येऊन ठेपली. तो हत्ती अगदीं बेफाम झाला आणि तो पट्ट्याच्या माराला न जुमानतां बेधडक येसबांच्या अंगावर तुटून पडूं लागला. थोड्याच वेळांत हत्तीनें येसबाला अगदीं एका कोंपऱ्यांत गाठलें. येसबा पल्लेदार उडी मारून निसटून जाणार तोंच त्यांचा पाय घसरला. झोंक सांवरून पळणार तोंच हत्तीनें त्यांना गांठलें, व आपल्या सोंडेंत गुरफटलें. हें पाहतांच सगळीकडे एकच हाहा:कार झाला. 'मेला, मेला' अशी एकच आरोळी झाली. कोमल अंत:करणाच्या माणसांना रडूं कोसळलें. प्रत्यक्ष शिवबांच्या डोळ्यांतून दोन टप्पुरे थेंब खालीं पडले. पण

महाराजांची पुण्याई पडली बलवत्तर व येसबांचें नशिब पडलें शिकंदर ! सोंडेच्या विळख्यांतून येसबांनीं आपलें अंग झट्दिशीं काढून घेऊन उलट तोंड फिरवून असा एक सफाईदार वार सोंडेवर केला कीं, ती सपशेल उतरून टाकिली. सोंड तुटल्यामुळें हत्तीच्या अंगांतून रक्ताचा लोट वाहूं लागला. थोड्याच वेळांत त्यानें तडफड करून प्राण सोडला. येसबा सुरक्षित आहेत हें पाहून व हत्ती पुरा चित झाला हें पाहून तेथें जमलेल्या मंडळींनीं टाळ्यांचा प्रचंड गजर केला. ते हल्लींच्याप्रमाणें परमेश्वराकडून मोफत मिळालेल्या हातांनीं नुसत्या बिनखर्चाच्या टाळ्याच वाजवून गप्प बसले नाहींत. तर त्यांच्यापैकीं कांहींनीं अंगावरील रेशमी उपरणीं, शेले व शालजोड्या काढून त्या येसबांच्या अंगावर प्रेमानें घातल्या. कांहींनीं त्यांना आपल्या बोटांतील आंगठ्या व हातांतील सलकडीं दिलीं. कांहींनीं येसबांच्या नांवाचा जयघोष करून आकाशमंडळ दणाणून सोडलें. याप्रमाणें तेथें जमलेले लोक निरनिराळ्या तऱ्हांनीं आपला आनंद व्यक्त करूं लागले. आपल्या परमप्रिय मित्रानें अजब मर्दुमकी गाजवून मराठ्यांचें नांव राखिलें, हें पाहून शिवबांच्या आनंदाला भरतें आलें. ते आपल्या जागेवरून उठले व आपल्याकडे धांवत येणाऱ्या येसबाला त्यांनीं दृढ प्रेमालिंगन दिलें. शिवबांनीं आपल्या मित्राचें सर्वांग आपल्या अंगावरील जरतारी शेल्यानें स्वतः पुसलें. पण येसबांचें कोरडें झालेलें अंग पुन्हां पूर्ववत् ओलेंचिंब झालें. येसबांचें अंग पुन्हां ओलें होण्याचें कारण कोणतें बरें? त्यांचें अंग भिजण्यास आतां पाणी कोठून आलें व तें त्यांच्या अंगावर कोणी ओतलें? पण याबद्दल वाचकांनीं गोंधळून जाण्याचें कारण नाहीं. कारण, येसबांची मर्दुमकी पाहून शिवबांच्या हृदयाला एकाएकीं पाझर फुटला. त्या पाझराच्या दोन

धारा त्यांच्या डोळ्यांतून वाहूं लागल्या. त्यामुळें येसबांचें सर्वांग भिजून गेलें. धन्य तें प्राणी कीं, ज्यांच्या देहावर असा प्रेमाभिषेक होतो! भाग्यवान् ते पुरुष कीं, जे आपल्या मित्रांच्या प्रेमाश्रूंनीं न्हाले जातात!

• कुतुबशहा बादशहानें हा अद्वितीय पराक्रम पाहून तोंडाला रुमाल लावून बहुत आश्चर्य केलें, व तोंडानें असें म्हटलें कीं, " दैववान् शिवाजी म्हणून अशा मनुष्यांची जोड त्यास झाली." आनंदाच्या भरांत त्यानें त्याला हांक मारली व इनामादाखल पांच हजार रुपये उत्पन्नाच्या गांवची सनद येसबांच्या नांवानें करून दिली. उजव्या हातांत सनद घेऊन बादशहानें ती येसबांपुढें केली. पण त्या निर्लोभी महात्म्यानें ती सनद घेण्याकरितां आपला हात पुढें केला नाहीं. हात जोडून त्यानें बादशहाची अशी विनंति केली कीं, " अन्न महाराजांचें खातो, तें आपलेंच आहे. त्यांचे आज्ञेनें आलों व बक्षीस मी घेणें मार्गाचें नाहीं. आम्हांस महाराजांनीं काय उणें केलें आहे? तें तुमचें घेऊन निर्वाह करावा. अस्थि मात्र तुमच्या, परंतु मांस मात्र महाराजांचे अन्नाचें आहे. त्यास आपलें अन्न सेवन केलें असतां आमची बुद्धि भ्रष्ट होईल. जें देणें तें महाराजांकडे द्यावें. चाकरी करणें हा आमचा धर्म." शिवदिग्विजयकार म्हणतात कीं, " याप्रमाणें ऐकून हजरत समाधान पावले." आम्हांस तर असें वाटतें कीं, असलें उत्तर ऐकून हजरतांप्रमाणें महाराज व तेथें असलेला प्रत्येकजण समाधान पावला असला पाहिजे; एवढेंच नव्हे, तर हें उत्तर वाचून सव्वा दोनशें वर्षांनंतर हल्लीं जिवंत असलेला व पुढें जन्मास येणारा येसबांचा प्रत्येक वंशज समाधान पावेल. कारण, येसबांच्या या उत्तरांत किती उच्च उदात्तपणा भरलेला आहे? या उत्तरांत कितीतरी निर्लोभी निरभिलाष सांठविलेला आहे?

या उत्तरांत कितीतरी सप्रेम स्वामिभक्ति दिसून येत आहे! येसबांच्यासारखी देशभक्ति आज जर दृष्टीस पडेल, तर हिंदुस्थानचा इतिहास झट्दिशीं फिरूं शकेल. पण भरतभूच्या दुर्दैवानें हल्लीं स्वार्थसाधु लोकांचें रान इतकें दाट माजलें आहे कीं, येसबासारखा एखादाही आम्रवृक्ष दृग्गोचर होत नाहीं! तानबा, येसबांसारखीं रत्नें शिवबांच्या पदरीं होतीं, म्हणूनच त्यांचा प्रकाश राजकीय क्षितिजावर पडला! म्हणूनच त्या नरमार्तंडानें आपल्या असह्य तेजाच्या लोटानें मुसलमानी दिवाभीतांना जागजागीं दडून बसावयास लाविलें! जे येसबा हत्तीशीं झुंजले, ते तर स्वर्गवासी झाले. त्यांच्या तोंडचा प्रत्यक्ष उपदेश ऐकावयास मिळणें शक्य नाहीं. पण त्यांनीं बादशहाला दिलेलें उत्तर शिवदिग्विजयकारांच्या रसिकतेमुळें आज आपणां सर्वांस उपलब्ध झालें आहे. हें उत्तर प्रत्येक मराठ्यानें आपल्या हृत्पटलावर सोनेरी अक्षरांनीं लिहून ठेवावें, व तें नेहमीं वाचीत रहावें. त्यांनीं नेहमीं असेंच म्हणावें कीं, 'मायदेशाची चाकरी करणें हा आमचा धर्म.' याप्रमाणें ते बोलले व त्याप्रमाणें त्यांनीं कृति केली, तर शिवबांचें शिकंदर भाग्य त्यांच्याही वांटयास खात्रीनें येईलच येईल!

## रत्न आठवें.

# धनाजी व हंबीरराव

**हीं मनुष्यें प्रतिसृष्टि निर्माण करतील.**

—श्रीशिवाजी महाराज.

व्यक्तीला काय किंवा राष्ट्राला काय, दोघांनाही षड्विकारांनीं पछाडलें आहे. ज्याप्रमाणें एखाद्या मनुष्याची भरभराट व चलती होऊं लागली म्हणजे दुसऱ्यांना त्याच्याबद्दल हेवा उत्पन्न होतो, त्याप्रमाणेंच एखादें राष्ट्र वैभवसंपन्न होऊं लागलें म्हणजे त्याची स्पर्धा इतर राष्ट्रें करूं लागतात. कांहीं राष्ट्रांच्या मनांत नीच मनोविकारांची उत्पत्ति झाली, तर कांहींच्या मनांत उच्च वृत्तींचा प्रादुर्भाव होतो; व अशा वैभवशाली राष्ट्राची स्थिति आपणांस प्राप्त व्हावी अशा आशेचे अंकूर इतर राष्ट्रांच्या मनोभूमींतून उगवूं लागतात. एखादें राष्ट्र जगदीशकृपेनें ऐश्वर्यसंपन्न झाल्यावर आपलीही त्याप्रमाणें प्रगति व्हावी अशी इच्छा इतर राष्ट्रांना होणें साहाजिक आहे. आपल्या राष्ट्राचें वैभव वाढावें, त्याला या जगांतील इतर राष्ट्रांकडून मान मिळावा व हरएक बाजूनें त्याची प्रगति व्हावी, अशी इच्छा कोणता मनुष्य करणार नाहीं? तशांतून जे लोक एकाएकीं वैभवगिरीच्या शिखरावरून ढांसळून अधोगतीच्या खड्ड्याच्या तळावर जाऊन आदळले आहेत, अशा लोकांनीं दुसऱ्या लोकांना वरती येतांना पाहिलें असतां आपणांसही तशी सुस्थिति प्राप्त व्हावी, अशी इच्छा धरल्यास त्यांनीं एखादें पापकर्म करण्याचें योजिलें आहे,

असें म्हणतां यावयाचें नाहीं. मनुष्याला काय किंवा राष्ट्राला काय, सुख हें सदैव पाहिजे असतेंच; व तें सुख ज्या व्यक्तीला किंवा राष्ट्राला मिळत असेल, त्याच्याबद्दल एक प्रकारची क्षम्य स्पर्धा उत्पन्न होणें हें इष्टच आहे. त्या स्पर्धेचें पर्यवसान ईर्षेत होऊन त्याचा परिणाम कृतींत झाला म्हणजे फलप्राप्ति हट-कून व्हावयाचीच.

आजकाल जपानी लोकांवर परमात्म्याची बहाल मर्जी आहे, यांत संशय नाहीं. प्रत्येक गोष्टींत त्यांचें पाऊल पुढें पडत आहे. अपयशाचें नांवही त्यांना माहित नाहीं. जलयुद्ध करा किंवा स्थलयुद्ध करा, एखादा नवीन उद्योग काढा किंवा दुसरें एखादें कृत्य आरंभा, त्यांत त्यांना यशःप्राप्ति हटकून मिळावयाचीच. तीच हिंदुस्थानवासीयांची स्थिति पहा. कांहींही करा, कसेही झटा व कोणत्याही प्रकारें वागा, कमनशीब, अपयश व फजिती ही त्रयी आमच्या पाठीमागें एकसारखी हात धुवून लागली आहे. जपान व हिंदुस्थान या दोन पौर्वात्य देशांच्या नशिबांतील हा भेद पाहून हिंदुस्थानांतील लोकांचीं अंतःकरणें दुःखाग्नीनें कर-पून गेलीं, तर त्यांत नवल तें काय? जर आज एखाद्या मनुष्यानें जपानी लोकांच्या अंतःकरणाचे फोटो घेतले, तर ते कितीतरी चित्ताकर्षक व मनमोहक दिसतील? आनंद, आशा, उमेद इत्यादि सुखकर मनोवृत्तींच्या रंगांनीं ते कितीतरी खुलले असतील? पण त्याच मनुष्यानें जर हिंदी लोकांच्या अंतःकरणांचे फोटो घेतले, तर ते अत्यंत विद्रूप व व हिडिस दिसूं लागतील. दुःख, निराशा, नाउमेद इत्यादि दुःखकर मनोवृत्तींच्या काजळानें ते काळे-कुट्ट झालेले दृष्टीस पडतील. सारांश, जपानी लोकांच्या वांटयाला सुख व आमच्या वांटयाला दुःख, अशी योजना परमेश्वरानें करून ठेवलेली दिसते. त्यांना सर्व जगांत मान, आमचा जेथें तेथें अप-

मान; त्यांची सर्व तऱ्हेनें प्रगति, आमची प्रत्येक बाबतींत अधो-गति; त्यांना सदोदित आनंद, आमच्या नशिबीं एकसारखी रड! परमेश्वराला असा फरक करण्याचें कारण काय? हें आम्हांस समजत नाहीं. आमच्या हातून व आमच्या पूर्वजांच्या हातून कांहीं लहानसहान पातकें घडलीं असतील. नसतील असें आम्ही म्हणत नाहीं. तरीपण त्यांचें इतकें कडू फळ आम्हांस मिळावें, अशीं घोर पातकें तीं खात्रीनें नसावींत! कसेंही असो. दयासागर परमेश्वरानें आमच्या व आमच्या पूर्वजांच्या लहान मोठ्या पातकांबद्दल आम्हांस क्षमा करून आम्हांस सुखाचे दिवस दाख-वावेत, अशी त्याजजवळ आमची प्रार्थना आहे.

गेल्या दहा बारा वर्षांत जपानी वीरांनीं जे अपूर्व जय मिळविले, त्यांबद्दल ते जगाच्या स्तुतीस व प्रशंसेस पात्र आहेत, याबद्दल दोन मतें असणें शक्य नाहीं. पण जपानी लोकांच्या शौर्याबद्दल स्तुति करतांना तिला पूर्णता किंवा झणझणीतपणा आणण्या-करितां स्वतःच्या देशबांधवांची निंदा करणें जरूर आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. त्यांच्या देशाभिमानाचें वर्णन करतांना आपल्या देशाभिमानशून्यतेची टिमकी जगासमोर वाजविलीच पाहिजे असें नाहीं. त्यांनीं मर्दुमकीचीं कृत्यें केलीं म्हणून आमच्या नामर्दपणाचा डांगोरा सर्व जगभर आम्हींच पिटावा हें कांहीं श्रेयस्कर नाहीं. त्यांनीं स्वार्थत्याग व स्वासुत्याग करून आपल्या जन्मभूमीची सेवा केली म्हणून आमच्या स्वार्थसाधुपणाचें ढोलकें आम्ही बडविलेंच पाहिजे, अशांतली गोष्ट नाहीं. पर-निंदा जितकी अयोग्य, तितकीच आत्मनिंदा आहे, असें आमचें मत आहे. तशांतून आत्मनिंदेच्या योगानें मनुष्याचा मनोभंग होऊन अवशिष्ट राहिलेल्या उत्साहाचें, उमेदीचें वाटोळें होतें, हें कोणीही विसरतां कामा नये. आज ज्यानें उठावें त्यानें आम्हांस

शहाणपण शिकविण्यास लागावें; आमचे दोष आमच्या पदरांत टाकण्याचा आव घालावा; व आम्हांस सुधारणुकीचे मार्ग दाखविण्याचा डौल आणावा. पण अशा स्वबांधवनिंदकांना आम्ही असें सांगतों कीं, तुमचें वाक्पांडित्य आम्ही ऐकिलें, आमचे दोष आमच्या निदर्शनास आले, व आमच्या उन्नतीच्या मार्गांची आम्हांस पूर्ण ओळख झाली. पण इष्ट हेतु साध्य करून घेण्यास अत्यवश्यक असें जें सहानुभूतिपूर्ण सरकार तें तुम्ही आम्हांस मिळवून देऊं शकाल काय? अनुकूल सरकाराशिवाय कोणत्या राष्ट्राची सुधारणा झाली आहे? अनुकूल सरकार मिळाल्यावर हिंदुस्थानची सुधारणा होणें अशक्य आहे काय? प्रतिकूल सरकार असल्यावर जपानी लोकांची हल्लींची उन्नत स्थिति टिकूं शकेल काय? जपान व हिंदुस्थान या दोन देशांच्या स्थितींत जें अंतर आज दृग्गोचर होत आहे, त्याचें कारण या दोन्ही देशांच्या बादशहांच्या हृदयांमधील भिन्नत्व होय. बादशहा मिकॅडोच्या अंतःकरणांत जपानी लोकांबद्दल जी सहानभूति व कळकळ होती, तिच्या शतांश सहानुभूति व कळकळ जर आमचे बादशहा व बादशाहीण यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली असती, तर याच नादान हिंदुस्थानचें निराळें स्वरूप दृष्टीस पडलें असतें. सारांश, आमच्या अवनतीचें खरें कारण न शोधतां, किंवा तें कळलें असतां उघड बोलण्याची धमक नसल्यामुळें, गरीब बिचाऱ्या सहनशील हिंदी लोकांवर वाटतील ते कुत्सित आरोप लादण्यास प्रवृत्त होणें, यासारखा बेशरमपणा दुसरा कोणताही नाही. आमच्या देशबांधवांसंबंधानें निःपक्षपातबुद्धीनें आम्ही असें सांगूं शकूं कीं, जगांतील कोणत्याही लोकांपेक्षां ते बुद्धीनें, शक्तीनें किंवा अन्य तऱ्हेनें कमी दर्जाचे नाहीत. इतर लोकांप्रमाणें आमच्यांतही कांहीं दोष आहेत. पण सर्वदोषविवर्जित असे लोक जगतांत कोण आहेत? एवढेंच नव्हे,

तर इतर लोकांत नसलेला एक गुण मात्र आमच्या अंगांत विशेष रीतीनें आहे. तो गुण म्हणजे आमचा टिकाऊपणा होय. परचक्राखालीं बांगडीप्रमाणें भंगलेल्या राष्ट्रांचीं उदाहरणें इतिहासांतून पुष्कळ देतां येतील. पण हा देश एवढा जुनाट व वृद्ध असतां, व परचक्रांचे एवढे जबर आघात त्याच्यावर झाले असतां, त्यानें इतका टिकाव धरला आहे, ही गोष्ट खरोखर अभिमानाची व आनंदाची आहे. अशा राष्ट्रांतील लोकांना दूषणें लावणें म्हणजे आपल्या गुणग्राहकताशून्यतेचें हिडिस प्रदर्शन करणें होय.

दहा बारा वर्षांपूर्वीं जपानी वीरांनीं जिंकलेल्या लढायांचीं वर्णनें ऐकून प्रत्येक हिंदुस्थानवासियाला आनंदाचें भरतें येत होतें. यालू, नॅन्शान, लेओटेंग व मुकडेन या चार ठिकाणीं जपानी शिपायांनीं गाजविलेली मर्दुमकी खरोखरच अलैकिक होती, यांत संशय नाहीं. आज जपानांत जिकडे तिकडे स्वदेश, बादशहा व बांझई या त्रयीचा सारखा घोष चालला आहे. प्रत्येक जपानी पुरुष, स्त्री व मूल हीं देशभक्तिवारुणीनें पुरीं झिंगलीं आहेत; व या देशप्रेमाच्या उमाळ्यांत जपानी लोक मानवशक्तीच्या बाहेर अशीं कृत्यें प्रत्यहीं करीत आहेत. विसाव्या शतकांत जगाच्या, निदान आशियाखंडाच्या इतिहासांत आपल्या पराक्रमाचा एक स्वतंत्र निराळा खंड जपानी शिपायांनीं लिहून ठेविला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा खंड लिहून ठेवण्याच्या कामीं या जपानी बखरकारांनीं अगदीं निराळ्याच सामुग्रीचा उपयोग केला आहे. नेहमींप्रमाणें बोरूच्या लेखणीचा उपयोग न करतां त्यांच्या जागीं त्यांनीं बंदुकींच्या नळ्यांचा उपयोग केला आहे! हा खंड लिहितांना नेहमींची काळी शाई न वापरतां रशियन शिपायांच्या शरीरांच्या दौतींतून असलेली तांबडी शाई वापरण्यांत आली आहे! हा खंड चिंध्यांनीं किंवा गवतानें केलेल्या कागदावर न लिहितां

जपानी लोकांच्या हृदयरूपी जाड कागदावर लिहिला आहे! आतां यापुढें प्रत्येक जपानी पिढी हा खंड आनंदानें वाचील व जगाला वाचून दाखवील. पण हा खंड वाचून दाखवितांना जपानी मनुष्य जिभेचा उपयोग करण्याच्या ऐवजीं आपल्या हाताचा उपयोग करील. जपानी बखरकारांनीं लिहिलेला हा अत्युपयोगी खंड फार लांबलचक नसून, त्यांच्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें तो अतिशय लहान आहे; किंबहुना तो फक्त एकाच वाक्यानें बनलेला आहे. पण त्या एका वाक्यांत मोठमोठ्या अगडबंब ऐतिहासिक पुस्तकांतील सार ओतलें गेलेलें आहे. तें वाक्य हेंच कीं, "सक्रिय (active) देशाभिमानाशिवाय देशोन्नति कधींही व्हावयाची नाहीं." जपानी लोकांप्रमाणें मराठ्यांनींही सतराव्या शतकांत आशियाखंडाच्या इतिहासांत एक खंड स्वहस्तें लिहून ठेविला आहे. त्या खंडांत आपल्या पराक्रमी पूर्वजांनीं केलेलीं अचाट मर्दुमकीचीं कृत्यें सुरस रीतीनें वर्णिलीं आहेत. त्यांपैकीं एकाची हकीगत आज आमच्या वाचकांना देण्याचें आम्ही योजिलें आहे. खालीं वर्णन करण्यांत येणारी मराठ्यांनीं जिंकलेली लढाई नैन्शान, मुकडेन वगैरे लढायांच्या तोडीची होती, व त्या लढाईचा परिणामही या लढायांसारखाच झाला.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांना रायगडीं अभिषेक होऊन नुकतींच चार वर्षें झालीं होतीं, व हिंदुपदपादशाहीच्या छत्राच्या आश्रयाखालीं चार पांच शतकें त्रस्त व जमिनदोस्त झालेली हिंदु प्रजा नुकतीच वर मान काढूं लागली होती. गोवध बंद होऊन हिंदूंचीं देवालयें दैविक वृत्तींचा प्रसार करण्यासाठीं पुनरपि आपलीं डोकीं वरतीं करूं लागलीं. सर्व महाराष्ट्रभर आशा व आनंद या मनोवृत्तींची लाट उसळून, त्या लाटेवर देशप्रेमानें भारलेले देशभक्त हेलकावे खात इकडे तिकडे अनिरुद्ध संचार

करूं लागले. आतां थोडयाच अवधींत सर्व महाराष्ट्रांत हिंदुत्वाचें पूर्ण साम्राज्य होऊन फार दिवस नष्ट झालेली शांतता पुन्हां नांदूं लागेल, अशी आशा महाराष्ट्रीयांना वाटूं लागली. पण या आशेचा भंग करण्यासाठीं अहोरात्र टपलेल्या दोन शक्ति जिवंत राहिल्या होत्या. त्या शक्ति म्हटल्या म्हणजे एक विजापूरचें राज्य व दुसरें मोंगलांचें राज्य. मराठयांचा उत्कर्ष ह्या दोन शक्तींना सहन न होऊन, त्यांपैकीं विजापूरकरांनीं मराठेशाही नामशेष करून टाकण्याचा निश्चय केला. सन १६७८ सालीं आपला युसूफखान नांवाचा सरदार कृष्णा व तुंगभद्रा या दोन नद्यां-मधील मराठ्यांच्या ताब्यांतील प्रदेशावर स्वारी करण्यास त्यांनीं पाठवून दिला. हा युसूफ्खान प्रसिद्ध अफजुलखानाला कनिष्ठ बंधु शोभेल असा होता. गोवध करणें, देवळें जमिनदोस्त करणें, घरेंदारें जाळणें, लुटालूट करणें, इत्यादि राक्षसी दुष्कृत्यांत आनंद मानणारा हा नराधम मराठयांच्या मुलुखावर स्वारी करून आला. पण मराठयांचे सरदार हंबीरराव मोहिते यांनीं त्याचा पाडाव करून त्याला कैद केलें. ही बातमी विजापुरास कळतांच सूड उगविण्याचे हेतूनें विजापूराहून तीस चाळीस हजार फौज रवाना झाली. फौजेची व हंबीररावांची गांठ सावनूर येथें पडली व लढाई-चें तोंड लागलें. हंबीररावाजवळील सरंजाम अगदीं बेताबाता-चाच होता. फार झालें तर तीन चार हजार मराठे वीर असतील नसतील. अशा छोटेखानी फौजेनिशीं विजापुराकडील चाळीस हजार फौजेशीं सामना देण्यास त्या मराठी वीरांनीं दंड थोपटले आणि खरोखरच शिवबांच्या चाळीस वर्षांच्या अमदानीचें अव-लोकन केलें तर असें कळून येईल कीं, दसपट किंवा वीसपट शत्रूंशीं टक्कर देऊन त्यांचा चक्काचूर उडविण्याच्या कामांत शिव-कालीन मराठे वीरांची बरोबरी जगांतील दुसऱ्या कोणत्याही लोकांना

आजपर्यंत करतां आली नाहीं. सिंहगडावरील मर्दुमकीची तोड जगांतील कोणत्या देशाच्या इतिहासांत सांपडूं शकेल ? पावन-खिंडींत असिधारातीर्थी स्वतःला पावन करून घेणाऱ्या बाजी प्रभू देशपांड्यासारखा पराक्रम आजपर्यंत कोणी केला आहे ? किंवा आम्हीं आतां वर्णन करीत असलेल्या सावनूरच्या लढाईसारखी लढाई या घटकेपर्यंत कोणती झाली ? जग जपानी लोकांची स्तुति त्यांच्या शौर्याबद्दल करीत आहे तें योग्यच आहे. पण सतराव्या शतकांतील मराठे वीर जपानी वीरांपेक्षां जास्त स्तुत्यर्ह आहेत, हें कोणीही निःपक्षपाती मनुष्य कबूल करील.

चाळीस हजार विजापुरी फौजेचें व चार हजार मराठी फौजेचें लढण्याचें तोंड लागलें; व कांपाकांपी, छाटाछाटी, तोडातोडी सुरू झाली. मुसलमानांच्या समशेरी व मराठ्यांचे भाले एकमेकां-वर घांसून त्यांतून ठिणग्या निघूं लागल्या. हजारों लोकांचीं शिर-कमलें चेंडूप्रमाणें आकाशांत उडूं लागलीं. कोणाचे हात तुटले, तर कोणाचे पाय कांपले गेले. कोणाच्या छातींत भाले खुपसले गेले, तर कोणाला समशेरीचे तीव्र वार लागले. याप्रमाणें एकच दंगल उडून गेली; " दीन दीन " व " हर हर महादेव " या आरो-ळ्यांनीं दशदिशा दणाणून गेल्या. सकाळपासून एकसारखी धुम-श्चक्री चालली असून आतां टळटळीत दुपार झाली. भगवान् सूर्यनारायण आकाशमध्यांत आरूढ होऊन खालीं चाललेल्या तुमुल रणाकडे आपल्या तेजःपुंज नेत्रांनीं न्याहाळूं लागला. लवकरच सुग्रास पंचपक्वान्नी मेजवानी मिळेल या आशेनें हिंस्र पक्ष्यांच्या झुंडीच्या झुंडी सभोंवतालील वृक्षशाखांवरून रणमैदानाकडे टक लावून बसल्या होत्या. हजारों आसन्नमरण वीर सूर्यतापानें विव्हळ-ळत, शेवटीं भगवा फडकतो कीं चांद चमकतो, हें पाहण्याकरितां कसाबसा जीव धरून भूमातेच्या मांडीवर लोळत होते. सारांश,


" दीन दीन " दीन होऊन दांतीं तृण धरून पळून जातो, कीं " हर हर " चा डुर्या होऊन मराठ्यांची होळी होते, इकडे नजर लागून राहिली होती. अशा समयीं मराठ्यांचे सेनापति हंबीरराव मोहिते यांच्या रणधूलिमलिन चेहेऱ्यावर आशा व निराशा या दोहोंच्या छटा एकसमयावच्छेदेंकरून दिसूं लागल्या. क्षणोक्षणीं ते मागें उलटून पहात, व तितक्याच वेळां ते " हर हर " गर्जत शत्रूवर तुटून पडत. पण आतां अगदीं निकराची वेळ येऊन ठेपली. सकाळपासून लढणाऱ्या मराठे वीरांची संख्या कमी कमी होत चालली होती. त्यांच्या भोंवतीं विजापुरी सेनेचा समुद्र एकसारखा खवळत होता, व त्या सेनासमुद्रांतून पैलतीरीं पोहून जाण्याची ताकद त्या अवशिष्ट राहिलेल्या वीरांच्या अंगांत नव्हती. तरी अशा आणीबाणीच्या प्रसंगीं भगव्या झेंड्याचा आश्रय धरून मराठे वीर एकसारखे लढत होते. वाऱ्याच्या सोसाट्यानें भगवा फडकूं लागला म्हणजे त्यांचीं अंतःकरणेंही आशेनें फडफडूं लागत. सर्वांची नजर त्या भगव्या झेंड्याकडे लागली होती, व तशी त्याजकडे टक लागणें साहजिक होतें. कारण, त्या भगव्या झेंड्याकडून त्यांना कितीतरी प्रोत्साहन मिळत होतें ! त्या झेंड्याच्या प्रत्येक टोंकाला मुसलमान लोकांनीं कांपलेल्या हजारों गाईंच्या जिभा फुटून त्या त्यांना सूड घेण्याकरितां हंबरडा फोडून सांगत होत्या ! त्या भगव्या झेंड्याचा भगवा रंग आपल्या देशबांधवांच्या शिखानष्टांनीं सांडलेल्या रक्ताची आठवण त्यांना देत होता ! तो भगवा झेंडा समर्थांच्या " जीवित तृणवत् मानावें " या मर्दानी ओंवीचा उपदेश आपल्या फडफडण्यानें मराठी योध्यांना करीत होता ! असा तो भगवा झेंडा दृष्टिसमोर असतां कोणता अस्सल मराठा वीर लढण्यास कच खाईल ?

आतां एकाएकीं लढाई थांबली. भगव्या झेंड्याभोंवतीं आपल्या

शरीरांचा कोट करून लढणाऱ्या मराठे पठ्यांशीं झुंजणारे मुसलमान मर्द एकाएकीं पळून जाऊं लागले. ते कां पळूं लागले? त्यांना मराठ्यांची भीति वाटली काय? लढाई पुढें चालू ठेवण्याची त्यांची इच्छा नव्हती काय? छेः, तसें कांहीं नव्हतें. ते एकाएकीं पळून गेले याचें कारण निराळेंच होतें. त्यांचा मोड झाला नसून; उलट मराठ्यांचा पक्का नाश करून टाकण्याची त्यांची इच्छा होती. म्हणून आतांपर्यंत लढून लढून थकलेले मुसलमान वीर एकीकडे सरले, व पुढें लढण्याचें काम सकाळपासून स्वस्थ बसलेल्या ताजातवान्या दहा हजार घोडेस्वारांच्या टोळीकडे सोंपविण्यांत आलें. ती दहाहजार घोडेस्वारांची मांड त्या भगव्या झेंड्याकडे चौखुरी दौडत येऊं लागली. ती आतां अगदींच जवळ आली, थोड्याच वेळांत ती येऊन भिडणार असें पाहून हंबीरराव मोहित्यांनीं पुन्हां एकदां पाठीमागें उलटून पाहिलें, व लागलीच त्यांनीं घोड्यावरून खालीं उडी टाकली. त्यांनीं भगवा झेंडा आपल्या डाव्या हातांत घेतला, भाला फेंकून देऊन त्यांनीं आतां तलवार धारण केली, व एकदां "हर हर" हे शब्द मोठ्यानें उच्चारून ते आपल्या टोळीच्या अग्रस्थानीं येऊन उभे राहिले. कदाचित् जो भगवा झेंडा आजपर्यंत शत्रूच्या छातीवर थयथय नाचला, तोच कदाचित् आज शत्रूकडून तुडविला जाईल, असा हृदयभेदक विचार त्यांच्या मनांत येऊन त्यांचे डोळे पाण्यानें डबडबून गेले. त्यांचें सर्व शरीर थरथर कांपूं लागलें. आपल्या भोंवतालील मराठे वीरांकडे एक क्षणभर दृष्टि फेंकून त्यांनीं एक लांब सुस्कारा टाकिला, व शिकस्तीशीं लढतां लढतां भगव्या-झेंड्याच्या शीतल छायेखालीं सदैव निजण्याचा त्यांनीं निश्चय केला. आतां पुन्हां लढाई जुंपणार, इतक्यांत चकमक उडणार, लवकरच कत्तलीला सुरवात होणार, तोंच हंबीरराव ज्या दिशेकडे

क्षणोक्षणीं उलटून पहात होते, तिकडून अस्पष्ट आवाज ऐकूं येऊं लागला. क्षणोक्षणीं तो जास्त स्पष्ट होऊं लागला. जसाजसा तो जवळ जवळ येऊं लागला, तसतसा तो घोड्यांच्या टापांचा आवाज आहे असें वाटूं लागलें. इतक्यांत धुळीचे पर्वतप्राय लोट आकाशांत पसरूं लागले. आतां मात्र तो टापांचा आवाज अगदींच जवळ आला, व एकाएकीं जवळच्या झाडींतून तीन हजार जवानमर्द घोडेस्वारांची टोळी दौडत बाहेर पडली. ती टोळी वेगानें—वायु-वेगानें—उधळत येत होती. तिनें थेट भगव्या झेंड्याकडे आपला रोख धरला. आतां ती अगदीं जवळ आली व तिनें एकाएकीं "हरहर महादेव" अशी आरोळी ठोकली. ती टोळी लागलीच दुभंगली, व हंबीररावाच्या उजव्या व डाव्या बगलांकडून वळून ती चित्त्या-प्रमाणें त्या ताज्यातवान्या दहा हजार विजापुरी घोडेस्वारांवर तुटून पडली. ज्याची आपण क्षणोक्षणीं चातकाप्रमाणें वाट पहात होतों, तो वीर ऐन प्रसंगीं येऊन धडकला हें पाहून हंबीररावानेंही आपली समशेर मुसलमानांवर यथेच्छ चालविली. एकानिमिषांत त्या वीराचें नांव त्या रणभूमीवर दुमदुमूं लागलें. "धनाजी आला, धनाजी आला!" असा एकच पुकारा जिकडे तिकडे झाला. ज्याचें नुसतें नांव ऐकल्यावरोबर मुसलमानांचे घोडेसुद्धां भयभीत होऊन सैरावैरां पळत असत, तो वीर प्रत्यक्ष धडकल्या-वर कोणता मुसलमानी शिपाई रणभूमीवर टिकाव धरील? पुढें काय झालें हें सांगण्याची जरूरी नाहीं. मृगराजाची स्वारी आल्यावर ज्याप्रमाणें लांडग्यांची पळापळ होते, त्याप्रमाणें विजापुरी फौजेची गत झाली. शिवदिग्विजयकार लिहितात, "आईस लेंकरूं, लेंकरास आई ओळखीना. आपला जीव वांचला म्हणजे सर्व कांहीं मिळालें. पुन्हां मराठ्यांशीं लढाईची गांठ ईश्वरा, घालूं नकोस, म्हणून अंतःकरणीं विचार करते झाले." या

सावनूरच्या लढाईची बातमी रायगडीं महाराजांस लागतांच त्यांनीं धनाजी जाधवरावास रायगडीं बोलावून नेलें, व अनाजी रंगनाथाच्या तोंडावाटें सर्व हकीकत ऐकल्यावर महाराजांनीं सिंहासनावरून खालीं उडी टाकली. त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्यां धारा वाहूं लागल्या व धनाजीला प्रेमालिंगन देऊन म्हणाले कीं, "हीं मनुष्यें प्रतिसृष्टि निर्माण करतील; आमच्या साह्यार्थ हे देवलोकींहून मनुष्यरूपी निर्माण झाले." खरोखर सतराव्या शतकांत मराठ्यांनीं देवाप्रमाणें अतुल पराक्रम केले, म्हणूनच ते आपल्या प्रेमास व आदरास पात्र झाले आहेत.



## रत्न नववें.

# प्रयागजी अनंत व खंडेराव गुजर.

Sacrifice is the first element of religion.
( स्वार्थत्याग धर्माचा पाया होय. )

तो सन १६९९ होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्यरवीवर उसळलेलीं मेघावडंबरें पार वितळून जाऊन, तो थोरल्या महाराजांच्या कारकीर्दीतल्यापेक्षांही जास्त प्रखरतेनें व तेजस्वीपणानें तळपूं लागला होता. स्वराज्य, स्वधर्म व स्वजन यांचें संरक्षण करण्याकरितां अतर्क्य व अनन्वित हाल सोसून कडव्या व धर्मवेड्या औरंगजेबाच्या क्रोधाग्नींत आनंदानें आपल्या प्राणांची आहुति देणारा गोब्राह्मणप्रतिपालक श्रीशिवरायांचा सुपुत्र संभाजीमहाराज यांच्या वधानें मराठी राज्याची घडी जरी विस्कळित झाली होती, तरी पूर्वी कधींही प्रादुर्भूत झाला नव्हता इतका आवेश, करारीपणा व अवरंगजेबाची हड्डी नरम करण्याचा जोम प्रत्येक स्वातंत्र्यभक्त मराठ्याच्या ठायीं पूर्णपणें बाणून गेला होता. मराठ्यांची मूर्त स्वातंत्र्यश्री जे राजाराममहाराज त्यांची जिंजीच्या सहा वर्षांच्या वेढ्यांतून सुटका होऊन, सातारा मुक्कामीं त्यांची छत्रपति म्हणून पुन्हां प्राणप्रतिष्ठा झाली होती. संताजी व धनाजी या अद्वितीय दुकलीच्या झंझावाताप्रमाणें होणाऱ्या माऱ्यामुळें अवरंगजेब अगोदरच चिडून गेला होता. त्यांत आपल्या मनोराज्याची इमारत लाथाडून देऊन व जिंजीचा वेढा फोडून राजाराममहाराजांनीं साताऱ्यास मराठेशाहीची संस्थापना केली; एवढेंच

नव्हे, तर तालनेर मुक्कामीं हुसेन अल्लीखानाचा पुरा मोड करून मराठे सरदार उत्तरेकडील आपल्या मुलुखांत लूट मारीत आणि चौथाई व सरदेशमुखी हे हक्क बजावीत चालले आहेत, ही बातमी त्याला समजतांच तो अर्धवट ठेंचलेल्या नागाप्रमाणें खवळून जाऊन मराठ्यांना नामशेष तरी करीन, नाहींतर मी जगांतून कायमचें काळें करून तरी जाईन, अशी त्यानें घोर प्रतिज्ञा केली. अवरंगजेब म्हटला म्हणजे मराठ्यांचा कट्टा दुस्मान्, त्याच्याजवळ अपार संपत्ति व अगणित सेना, आणि त्यांतल्या त्यांत मराठ्यांना काबीज करण्याचें काम पूर्वीप्रमाणें आपल्या हाताखालील खानदानीच्या व चुकारतट्टु सरदारांच्या अंगावर न सोंपवितां प्रत्यक्ष आपल्या शिरावर घेण्याचा त्यानें केलेला पक्का निर्धार, यांमुळें मराठे मंडळींना मोठी धास्ती पडली; आणि नागोजी मान्याच्या खाजगी वैराला संताजी घोरपड्यासारख्या एकनिष्ठ जवानमर्द व रणझुंझार मराठे वीराचा बळी पडून मोंगली सैन्यावर अचानक हल्ले करून बादशहाला सळो कां पळो करण्याची कामगिरी सर्वस्वीं एकट्या धनाजीवरच पडल्यामुळें, राजाराममहाराजांपासून तों तहत साधारण सैनिकापर्यंत सर्व मंडळी जराशी चिंताक्रांत झाली. पण श्रीसद्गुरू रामदासस्वामींच्या महाराष्ट्रधर्माची दीक्षा घेऊन "स्वदेशाकरतां आणि स्वातंत्र्याकरतां फकीर बनलेल्या" व त्यांचे पट्टशिष्य जे शिवाजीमहाराज त्यांच्या तालमींत कसलेल्या मराठ्यांची ती चिंता फार वेळ टिकली नाहीं. आणि खरोखर पाहिलें असतां ती टिकावी कां ? कारण, कोणत्याही व्यक्तीनें किंवा व्यक्तिसमुदायानें स्वतंत्रता संपादन करण्याचा एकदां कां ठाम निश्चय केला कीं, तो हाणून पाडणें कोणत्याही प्रचंड शक्तीला किंवा बलाढ्य बादशहाला शक्य नसतें; मनुष्यानें किंवा राष्ट्रानें स्वतंत्र असावयाचें कां पारतंत्र्यांत

कुजत पडावयाचें, हें दुसऱ्याच्या कर्तबगारीपेक्षां त्याच्या मनाच्या प्रवृत्तीवरच नेहमीं जास्त अवलंबून असतें. आपण नादान, दुबळे व कुमकवत असल्याविषयींची भावना मावळून तिच्या जागीं स्वतः-च्या शौर्याची, सामर्थ्याची व कार्यक्षमतेची आत्मप्रतीति अधिष्ठित झाली कीं, लोक आज नाहीं उद्यां स्वतंत्र झाले, असें खुशाल समजावें. स्वतंत्रता कमविण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी हा आत्म-प्रत्यय लोकांच्याठायीं जागृत झाला पाहिजे, व त्यांच्या हृदयांत या 'भगवंताचें आधीं अधिष्ठान' झालें पाहिजे. परतंत्रता ही जनते-च्या मनावरील निव्वळ भुरळ असल्यामुळें ती नाहींशी होऊन मन स्वतंत्र झालें कीं, शरीरही आगेमागें स्वतंत्र झाल्याविना रहात नाहीं.

सतराव्या शतकांतील मराठ्यांच्या मनावरची बादशाही सत्तेची मोहनी दूर होऊन त्यांच्या ठायीं हा आत्मप्रत्यय व आत्मविश्वास उत्पन्न झाला होता, म्हणूनच अवरंगजेबानें केलेल्या प्रतिज्ञेची त्यांना विशेषशी फिकीर वाटली नाहीं, व त्याच्या सेनासमुद्राला चौफेर तंग देऊन 'तोबा तोबा' करीत त्याला दिल्लीच्या बाजूला पिटाळून लावण्याची त्यांनींही तयारी चालविली. केलेल्या प्रतिज्ञे-प्रमाणें १६९९ सालांत अवरंगजेब बादशहा मराठ्यांच्या सत्तेचीं केंद्रस्थानें जे किल्ले ते काबीज करून मराठ्यांना रानोमाळ हुसका-वून लावण्याच्या इराद्यानें ब्रह्मपुरी सोडून जातीनिशीं निघाला, व साताऱ्याच्या दक्षिणेस सुमारें तीन मैलांवर असलेल्या वसंतगडा-खालीं आपल्या अलोट सेनासमुद्राचा तळ देऊन बसला. कित्येक मैलपर्यंत पसरलेल्या बादशहाच्या सैन्याचा तो विस्तार पाहून गडावरील किल्लेदाराचें व शिबंदीचें तर धाबें दणाणून गेलें, व आपल्या मूठभर शिबंदीनिशीं किल्ला लढविण्यांत परिणामीं हित होणार नाहीं असा दूरवर विचार करून, त्या किल्लेदारानें अंधेऱ्या रात्रीं किल्ल्यावरील सर्व लोकांना बरोबर घेऊन तो

मोकळा केला. दुसऱ्या दिवशीं किल्ला हस्तगत केल्यावर बादशहाची स्वारी संतोषित मनानें मिरज येथें येऊन दाखल झाली, व कांहीं दिवसांनीं शहाजादा अजीमशहा त्यास येऊन मिळाला.

त्याच सुमारास राजाराममहाराज उत्तरेकडील स्वारींत गुंतले असल्यामुळें महाराष्ट्रांतील किल्ल्यांचा व मराठेशाहीचा सांभाळ करण्याची सर्व जोखीम रामचंद्रपंतावर येऊन पडली होती. त्याप्रमाणें पन्हाळा किल्ला मिरजेच्या नजीक असल्यामुळें बादशहाच्या सैन्याची धाड त्या किल्ल्यावर जाऊन आदळेल, अशा अदमासानें पंतांनीं त्याचा उत्तम बंदोबस्त केला होता. पण अवरंगजेब कांहीं लहानसहान धोरणी व चाणाक्ष नव्हता. आपल्या सैन्याशीं टक्कर देण्याकरितां मराठ्यांचें सैन्य पन्हाळ्यावर एकीकृत झालें असून इतर ठिकाणांविषयीं तें गाफिल राहिलेलें पाहतांच, बादशहाची स्वारी एकदम झुकांडी देऊन साताऱ्याकडे वळली, व किल्ल्याजवळ आल्याबरोबर चोहोंबाजूंनीं मोर्चे लावून उत्तरेस आपली छावणी, पश्चिमेस अजिमशहाचें सैन्य व दुसऱ्या दोन बाजूस तर्बियतखान व सर्जेखान यांचीं पथकें अशी आपल्या सैन्याची विभागणी करून त्यानें किल्ल्याची नाकेबंदी केली. त्या अफाट बादशाही सैन्याचा गराडा पाहून किल्ल्याच्या हवालदार सुभानजी लावंघरे याची तर छाती फाटून गेली, व कांहीं झालें तरी किल्ला निकरानें लढवावयाचा किंवा मुकाट्यानें तो अवरंगजेबाच्या स्वाधीन करून दुसऱ्या एखाद्या बंदोबस्ताच्या जागीं निघून जावयाचें, याविषयीं सल्ला विचारण्याकरितां त्यानें रामचंद्रपंतांकडे जासूद पाठविले. आपल्या अंदाजाप्रमाणें बादशहानें पन्हाळ्याचा रोख धरून कूच न करतां साताऱ्याला वेढा दिल्याचें वर्तमान पंतांना समजतांच, त्यांनीं त्या प्रांताचा सुभेदार प्रयागजी अनंत याला निकडीनें निवडक फौजेसुद्धां साताऱ्यास

जाण्याचा हुकूम केला, व सुभानजीनें धाडलेल्या जासुदांना ती हकीकत कळवून किल्ला शर्थीनें व शिस्तीनें झुंजविण्याविषयीं त्याला निरोप पाठविला. रामचंद्रपंताच्या आज्ञेप्रमाणें प्रयागजी अनंत मजल दरमजल करीत सुभानजीच्या मदतीकरतां आपल्या कणखर व रणशूर फौजेसह किल्ल्यावर येऊन पोहोंचला, व पाहतो तों किल्ल्यावरील अन्नपाण्याची सामुग्री संपुष्टांत आली असून तटबंदीही नीटशी नसलेली त्याच्या दृष्टोत्पत्तीस आली. तथापि संकटें व खडतर अनुभव यांच्या शाळेंत त्यांचें मन सुसंस्कृत झालें असल्यामुळें तो रतिभरही डगमगला नाहीं. आपल्या जन्मभूमीचें स्वातंत्र्यरूप सौभाग्य हिरावून नेणाऱ्या परकीयांच्या राजसत्तेविरुद्ध श्रीशिवरायांनीं आपल्या संवगड्यांसह बंडाचें निशाण उभारल्या दिवसापासून तों त्यावेळेपर्यंत त्यानें बिकट प्रसंगांतून मराठ्यांचा भगवा झेंडा स्वातंत्र्याच्या पैलतीरीं नेण्याच्या मंगल कार्यास हातभार लाविला असल्यामुळें, ती एकंदर स्थिति अवलोकन करून प्रयागजीला अधिक स्फुरण चढलें, व मराठ्यांच्या अंगचें तेज, पराक्रम, चिकाटी, स्वातंत्र्यप्रियता वगैरे सद्गुणांचें प्रत्यंतर बादशहाच्या प्रत्यक्ष नजरेस आणून देण्याचा दृढसंकल्प करून, त्यानें सामानसुमानाची जुळवाजुळव करण्यास प्रारंभ केला.

मराठ्यांच्या इतिहासाच्या पूर्वार्धाचा विशेष म्हटला म्हणजे अत्युत्कट स्वातंत्र्यलालसा व अलौकिक धाडसांचीं व छातीठोक कामें करण्याची त्यांची तत्परता हा होय. स्वराज्यसंपादनार्थ त्यांनीं विजापूरच्या किंवा दिल्लीच्या बादशहाजवळ तोंड वेंगाडलें नाहीं, तर तें मिळविण्याकरतां त्यांनीं जिवापाड मेहनत केली, आणि सत्कार्याला आपल्या कृपेचें पाठबळ देणाऱ्या परमेश्वरानें त्यांचे सर्व प्रयत्न यशस्वी केले. परमेश्वराप्रमाणें स्वातंत्र्य हें प्रत्येक मनुष्याजवळच आहे, मात्र तें साध्य करून घेण्याकरतां त्यानें संकटरूपी टाकीचे

घांव सोसण्यास तयार झालें पाहिजे व असे घांव सोसल्याशिवाय ते कधींही चिरंजीव स्वरूपाचें होणार नाहीं, अशी इतर मराठे स्वातंत्र्यभक्तांप्रमाणें प्रयागजी अनंत याचीही समजूत असल्यामुळें, त्याच्या अंगांत विलक्षण वीरश्री संचारली, व किल्ल्याच्या संरक्षणाचें काम त्यानें फारच चतुराईनें चालविलें. अशा रीतीनें उभयपक्षांकडील जय्यत तयारी झाल्यावर लढाईला तोंड लागलें, आणि स्वतंत्रतादेवीचे निस्सीम उपासक मराठे वीर व तिला पारतंत्र्याच्या नरकांत ढकलूं पाहणारे बादशहाचे पगारी मारेकरी यांच्यामध्यें तुमूल घनचक्कर जुंपलें. हल्ला करून किल्ला सर करण्याकरतां बादशहाच्या फौजेनें आपली शिकस्त केली. खुद्द औरंगजेब आपल्या शिपायांना किल्ल्यावर चढाई करून जाण्याविषयीं एकसारखा प्रोत्साहन देत होता. पण किल्ल्यावरील मराठे पठ्ठ्यांनीं त्यांची डाळ शिजूं दिली नाहीं. मोंगली सैन्य नेट धरून वर येऊं लागतां क्षणींच प्रयागजी अनंताचे नेकजात व धाराशूर अनुयायी त्यांच्यावर दगडांचा व गोळ्यांचा इतक्या कडाक्याचा वर्षाव करीत कीं, त्यांना नाइलाज होऊन मागें हटावें लागत असे; एवढेंच नव्हे, तर साप, विंचू, नाग इत्यादि विषारी प्राण्यांनीं भरलेले रांजण गडावरील लोकांनीं सैनिकांवर फेंकून ते जमिनीवर आपटून आंतील प्राणी सैरावैरां धावूं लागले कीं, त्यांना पळतां भुई थोडी होत असे.

मोंगलांचे हल्ले मागें परतविण्याचा क्रम गडावरील शिबंदीनें एकीकडे चालू ठेविला असतां, दुसरीकडे परशुराम त्रिंबक प्रतिनिधि यांच्या हातांखालील लोकांनीं भोंवतालचा वीस कोसपर्यंत सर्व प्रदेश उद्‌ध्वस्त करून व मोंगलांच्या छावणींत येणारी रसद लुटून फस्त करून बादशहाला जेरीस आणण्याचा प्रयत्न चालविला होता. गडावरील धान्य सरत आल्यामुळें प्रयागजी अनंतही

अगदीं मेटाकुटीस आला होता. परंतु पश्चिमेकडील मोंगली सरदाराला फितुर करून परशुराम त्रिंबक यांनीं किल्ल्यावर धान्याच्या गोण्या चढविल्या, तेव्हां किल्ल्यावरील मराठ्यांस नवा दम येऊन ते मोठ्या आवेशानें लढूं लागले. समोरून हल्ले करून किल्ला ताब्यांत येत नाहीं, मराठ्यांच्या गनिमी काव्यामुळें आपल्या छावणींत धान्यसामुग्रीचा तुटवडा पडत चालला आहे, पावसाळा तर जोरानें सुरू झाला आहे, व वेढ्याचें काम लवकर फत्ते न झाल्यास आपणांवर उपासमारीनें मरण्याची पाळी निःसंशय येणार, असा विचार करून बादशहानें सुरुंग लावून किल्ला जमीनदोस्त करण्याची युक्ति काढली, व तिजप्रमाणें तर्बीयतखानानें मंगळाईच्या बुरुजाखालीं दोन मोठाले सुरुंग तयार केले. ही बातमी किल्ल्यावरील लोकांना समजतांच त्यांची पांचावर धारण बसली, व आपण सर्वजण किल्ल्याखालीं गारद होऊन जाणार, अशी त्यांची खात्री झाली. आपल्या देशबांधवांवर वरील प्रकारानें येणारें मरण चुकविण्याच्या इराद्यानें इतर मराठ्यांनीं बादशहाच्या सैन्यावर वारंवार छापे घालून त्याचें मन सुरुंग उडविण्याच्या कृत्यापासून दुसरीकडे आकर्षून घेण्याचे भगीरथ प्रयत्न केले; पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सुरुंग तयार झाल्यावर त्यांना बत्ती लावण्यास औरंगजेबानें इषारा दिला, व किल्ल्यावरील लोकांच्या कशा ठिकऱ्या उडतात ही मौज पाहण्यासाठीं तो सुरक्षित जागीं उभा राहिला. एका सुरुंगाला बत्ती दिल्याबरोबर आकाशमंडळ भेदून टाकण्यासारखा भयंकर आवाज झाला, धुळीचे पर्वतप्राय लोट हवेंत उसळले, व डोंगराचा एक भलामोठा कडा वरील बुरुजासह एकदम जोरानें वर आकाशांत उडून किल्ल्यांत पडला. त्यामुळें शेंकडों मराठे प्राणास मुकले, व बाकीच्यांमध्यें धांवपळ सुरू झाली. ती संधी साधून मोंगली फौज वर